
# महाभारत

मराठी अनुवाद

श्री. अशोक कोठारे

खंड ४०

शांतीपर्व



# महाभारत

## महाभारत खंड चाळीसावा

## शांती पर्व भाग पांचवा

## मोक्ष धर्म पर्व

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381 2350.html

# महाभारत

मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० मे २०२१**

# अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा चाळीसावा खंड, शांती पर्व भाग पांचवा, मोक्ष धर्म पर्व, आपण आता वाचणार अहात. ह्या खंडामध्ये शुद्ध अध्यात्म विद्या सांगितली आहे. ह्या आधीच्या शांती पर्वांतील खंडांतून नितीशास्त्र समजावून सांगितले आहे. हिंदू धर्माचे हे दोन भाग आहेत. त्यानंतर कर्मकांड येते परंतु, त्यावर महाभारतात विशेष चर्चा केलेली नाही. कर्मकांड आगम शास्त्रातून तयार झाली आहेत.

शांती पर्वात हिंदू धर्माचे मूलभूत ज्ञान सांगितले आहे. त्यात नितीशास्त्र, अध्यात्म विद्या आणि कर्मकांड अशा तीन विभागात ते दिलेले आहे. युधिष्ठीर व भिष्म ह्यांच्या संवादाच्या रुपात ते दिलेले आहे. नितीशास्त्रात माणसांने इतर लोकांशी, प्राण्यांशी व वस्तुमात्रांशी कसे व्यवहार करावेत त्याचे विवरण आहे. अध्यात्मविद्येत माणसांने त्याच्यामध्ये असलेल्या आत्म्याला कसे समजून घ्यावयाचे त्याची चर्चा केलेली आहे. कर्मकांड माणसाला त्याचे भाग्य बदलण्याची इच्छा असते त्यासाठी विविध देवतांना कसे खूष करावयाचे त्यासाठी काय करावे त्याची माहिती आहे. कर्मकांड हा एकाप्रकारे भ्रष्टाचाराचा भाग आहे. देवतांना वशिले लावून आपले भाग्य सुधारता येते अशा संकल्पनेतून हा भाग विकसित झाला आहे. कर्मकांड कितपत माणसाचे दैव सुधारू शकते हा विवाद्य विषय आहे. मनुष्य आशावादी असतो व म्हणून तो कृत युगापासून त्या वशिलेबाजीत रमलेला आहे. कृतयुगात प्रामुख्याने यज्ञ त्यासाठी सांगितले आहेत. परंतु, कलीयुगात त्याचे स्वरुप बदलून सामान्य पुजा विधीमध्ये ते रुपांतरीत झालेले आपण पहातो. उपास तापास, व्रतवैकल्ये, शाकाहार करणे अशी आणखीन कांहीं रुप कर्मकांडात आपण पहातो. शुद्ध हिंदू धर्मात कर्मकांडाला महत्व नसते. त्यात पहिले दोन म्हणजे नितीशास्त्र आणि अध्यात्मविद्या ह्यांच्यावर भर असतो. कर्मकांडाचे महत्व पुरोहित वर्गांने त्यांच्या स्वार्थासाठी अवास्तव प्रमाणात वाढवले आहे आणि कर्मकांडातील विधी करणे म्हणजेच हिंदू धर्म असा एक गैरसमज पसरवण्यात ते यशस्वी झालेले आहेत हे आपल्याला दिसते. त्यासाठी अनेक संघटना पुरोहीत वर्गाने यशस्वीपणे कार्यरत केल्या आहेत. समर्थ रामदासांनी तीनशे वर्षापूर्वीच त्यांच्या दासबोधात ते सगळे दिले आहे परंतु, त्याकडे हिंदू

समाजाचे त्याच्या अशिक्षित रहाण्याच्या प्रवृत्तीमुळे दुर्लक्ष झालेले आहे. प्रत्येक हिंदूंने त्याला त्याचा धर्म समजून घ्यावयाचा असेल तर शांतीपर्व चांगले लक्ष देऊन वाचावे.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत

त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राजांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. कर्मकांडासाठी आगम शास्त्रांचा अभ्यास करावा लागतो ते महाभारतात नाही. अध्यात्मविद्येत माणसाने स्वतामधील परमेश्वर कसा पहावा कसा त्याच्याशी संपर्क करावा त्याचे शिक्षण असते तो विषय शांतीपर्वात विशेषकरून सविस्तरपणे पाहिलेला आहे. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ असला तरी भक्तीमार्गी निश्चितच नाही, तो ज्ञानमार्गी आहे. असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

# - शांती पर्व भाग पांचवा –

## - मोक्ष धर्म पर्व -

## भाग एक

युधिष्ठीर विचारतो, "मला सांगा राजाची पवित्र कामं कोणती ज्यामुळे चार वर्णांचे व्यवस्थापन चांगले होईल"?

भिष्म सांगतात, "त्यांचे अनेक प्रकार सांगितले आहेत. प्रत्येक वर्णाची कर्तव्ये निराळी आहेत, त्याची फळ ह्याजन्मात प्राप्त होत नाहीत. ती पुढच्या जन्मी मिळतात. परंतु तपस्येची फळ ह्याच जन्मात मिळतात. भक्तीने जे तुम्ही करता त्यात जे श्रेय आहे त्याचे महत्व मोठे असते. जेव्हां तो ते मिळवतो त्याला समजते कीं, हे जग व्यर्थ आहे. त्यामुळे नंतर त्याचे जगाच्या व्यवहारातील लक्ष कमी होते. हे जग अनेक दोषांनी भरलेले आहे, म्हणून शहाणा मनुष्य त्यात स्वताला जास्त न गुंतून ठेवता मोक्षमार्गाचा विचार करणे योग्य समजतो".

युधिष्ठीर विचारतो, "अशी कोणती मनस्थिती योग्य आहे ज्यात रहाणे चांगले असते जेव्हां मोठी आपत्ती त्याच्यावर आली असेल, ते सांगा".

भिष्म सांगतात, "त्यासाठी मी तुला एक कथा सांगतो ज्यात राजा सेंजिताला एक ब्राह्मण सांगतो जेव्हां सेंजिताचा मुलगा मेला होता. तो ब्राह्मण त्या राजाला बोलतो, थोडे दिवस तू शोक करशिल. कारण सगळ्यांना मरावयाचे असते. कांहीं दिवसांनी इतर लोक तुझ्या मरण्यावर शोक करणार आहेत. येथे असलेले सगळे एक दिवस मरणार आहेत".

सेंजित त्यावर बोलतो, "मला ते व्रत सांगा ज्या करण्याने माझे दुःख कमी होईल".

ब्राह्मण सांगतो, "पहा ते सगळे प्राणी उच्च, मध्यम आणि नीच योग्यतेचे. ते सगळे त्यांच्या चुकीच्या कर्मामुळे कांही ना कांही अडचणीत आहेत. हे माझे ते माझे असे मी समजत नाही, मी समजतो कीं, ते सगळे ब्रह्माचे आहे व आपण सगळे त्याचे रखवालदार आहोत. तसे एकदा मान्य केले कीं, त्या गोष्टी मिळाल्यामुळे अथवा न मिळाल्यामुळे कांहीं आनंद अथवा दुःख होत नाही. जे गेले ते ब्रह्माच्या मर्जीने गेले व जे मिळाले तेसुद्धा ब्रह्माच्या मर्जीने मिळाले अशी धारणा ठेवल्याने मनाची शांती अढळ रहाते. जे कांहीं होत आहे ते

ब्रह्माच्या मर्जीने होते हे निश्चितपणे मान्य केले तुझ्या मनाने कीं, सगळी दुःख नाहीशी होतात. सगळे मानण्या न मान्यावर असते प्रत्यक्षात कांहींच नसते. मनुष्य त्याच्या मनाच्या कल्पनांमुळे आनंदी अथवा दुःखी होत असतो. एकदा अशी मनाची व्यवस्था झाली कीं आपण कधी दुःखी किंवा सुखी असे होण्याचे बंद होते व त्यानंतर तो इसम शांतपणे राहू शकतो. तुझा मुलगा कोठून आला तुझ्या पोटी व आता मेल्यावर कोठे गेला तुला माहीत नाही. असे असतांना आपण त्यांना आपले म्हणतो ते कां तर कारण तो तुझ्या पोटी जन्मला. हा केवळ अपघात असतो कीं, तो तुझ्या पोटी जन्मला होता. तरी आपण त्या बंधनात स्वताला गुंतवून ठेवत असतो. ज्या ज्या गोष्टीत आपण स्वताला गुंतवू त्या त्या गोष्टी आपल्याला त्रास देऊ लागतात. जितके कमी गुंतवू तितके कमी त्रास होतो. आपल्या इच्छा आपल्याला सतावत असतात. ज्याला कशाचीच इच्छा नाही त्याला कशाचेच दुःख अथवा सुख होत नसते. शरीर व जीव एकत्र जन्मतात व एकत्र मरतात. त्यात आत्मा आल्याने त्यांना चैतन्य प्राप्त होत असते. आत्मा त्यातून गेला कीं, ते दोनही चैतन्यहीन होतात. जे तुम्ही भोगता ते तुमचे प्राक्तन असते त्याला तुमचे आप्त, मित्र अथवा शत्रू कारणमात्र असतात. मुख्य असते ते तुमचे भाग्य म्हणून जे करावयाचे ते समजून करावयाचे असते. फक्त शहाणे हे ओळखतात. तू शहाणा आहेस कां मूर्ख, भित्रा कां धीट, शिकलेला कां अशिक्षित ह्याचा तुझ्या भाग्याशी कांहीं संबंध नसतो. तुझे भाग्य तुझ्या आधीच्या जन्माच्या कर्माचा परिणाम असतो. जो येणार्या सुखदुःखाच्या अनुभवाने प्रभावित होत नाहीत तो खर्या अर्थाने सुखी होतो. सुखाची अपेक्षा करणारे त्या अपेक्षेमुळे दुःखी होत असतात. ज्याना कशाचीच अपेक्षा नसते ते त्यामुळें खर्या अर्थाने सुखी झालेले असतात. कारण, त्यांना माहीत असते कीं, सुख व दुःख ह्या माणसाच्या मनाच्या कल्पना असतात त्यांत सत्यांश नसतो. त्याना कशाचीच अपेक्षा नसते ज्यांना कांहीं मिळेले म्हणून अथवा न मिळाले म्हणून विशेष फरक पडत नाही. असे लोक सुख व दुःख ह्याच्या पलिकडील अवस्थेत असतात. जे चतुर असतात ते नेहमी समृद्ध होतात. जो चतूर नसतो तो सतत अनेक अडचणीत सापडत असतो. जे शहाण्याच्या सल्ल्याने त्यांची कामं करतात ते कधी अडचणीत सापडत नाहीत. अपेक्षाभंगातून क्रोध उत्पन्न होत असतो हा आणखीन एक दोष अपेक्षांचा असतो. शरीराच्या गरजांपुर्ती अपेक्षा ठेवल्यास अपेक्षाभंग

सहसा होत नसतो. त्यापेक्षा जास्तची अपेक्षा करण्याने सगळे प्रश्न सुरू होत असतात. क्रोधामुळें माणसाची अध्यात्मिक उर्जा कमी होत असते म्हणून जेव्हां क्रोध येतो तेव्हां त्याच्या कारणाचा विचार करावयाचा असतो. क्रोधाला मर्यादेत ठेवल्याने अध्यात्मिक उर्जा वाढत असते. ज्याला कसलीच इच्छा उरली नाही तो ब्राह्माच्या जवळ गेला असे समजले जाते". ते सांगतांना राजा पिंगलाने गायलेले कवन ऐकतो. त्यात ती कशाप्रकारे अतिशय वाईट परिस्थितीत सुद्धा ब्राह्माशी एकरुप होते ते सांगितले होते. पिंगला तिच्या प्रियकराच्या पासून विभक्त होते त्या दुःखात असतांना ती सगळ्या अपेक्षांचा त्याग करण्याचे ठरवते व तसें केल्याने तिला ब्रह्मज्ञान प्राप्त होते. एका अपेक्षाभंगातून ती मुक्तीच्या दिशेने जाते. म्हणून योग्य उपयोग केला तर अपेक्षा भंग माणसाच्या उद्धारासाठी चांगला समजला जातो हे लक्षात घे. अपेक्षाभंगातून ऐहीक जीवनातील निरर्थकता ज्याला समजली तो खरा शहाणा समजावा. भोगांत रमणारे कधींच ब्रह्माला समजू शकत नाही. ऐहीक सुखं ही जरी आवडत असली तरी ते सगळे नरकाचे दरवाजे असतात हे जो समजला तो खरी अध्यात्मिक प्रगती करत असतो. त्या सुखांत शरीराच्या गरजेपेक्षा जास्त जो रमत नाही तो खरा शहाणा समजावा.

भिष्म पुढे सांगतात, "अशारीतीने त्या ब्राह्मणाने राजा सेंजिताला समजावल्यावर त्याला शांती प्राप्त झाली. त्याचे दुःख कमी झाले. त्याला मुलाच्या मृत्यूचे दुःख राहीले नाही. तो समाधानी झाला".

मोक्ष धर्म पर्व भाग एक संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग दोन

युधिष्ठीर पुढे विचारतो, सर्व गोष्टीचा नाश करणारा काळ सतत पुढे सरकत असतो. अशा परिस्थितीत कोणत्या गोष्टी माणसाने केल्या पाहिजेत ते मला सांगा.

भिष्म त्याला सांगतात कीं, अशा बाबत एक कथा सांगतो ती ऐक. त्यात ब्राह्मदेव आणि एक ब्राह्मण ह्यांच्यात झालेले संवाद सांगतो.

पार्थ नावांचा एक मेधावत पुत्र त्या ब्राह्मणाला झाला जो मोठा वेदशास्त्र संपन्न होता. तो पार्थ सगळे वेद जाणत होता. तो त्याच्या पित्याला विचारतो, "मला सांगा माणसाचे जीवन झपाट्याने संपत असते. अशा स्थितीत माणसाने कोणते यज्ञकार्य करण्याचे ठरवले पाहिजे"? त्याचा पिता त्याला सांगतो, ब्रह्मचर्य हा मोठा यज्ञ आहे तो त्यांनी आचरावयाचा असतो. त्यानंतर वेदांचा अभ्यास करावयाचा असतो. त्यानंतर तो वंशाचा दिवा लावण्याचा प्रयत्न करेल. अग्नी प्रज्वलित केल्यानंतर तो मोक्षाच्या दिशेने जाऊ लागेल.

पार्थ विचारतो, "परंतु, सर्व कडून अनेक घातक घटनांचा मारा होत असतांना कोणी इतक्या शांतपणे कसे हे सगळे करू शकेल"?

पिता सांगतो, "कोणत्या घातक घटनांचा तू उल्लेख करत आहेस? त्या घटनांना तू असा कां घाबरत आहेस"?

पार्थ बोलतो, "मृत्यूबद्दल मी बोलत आहे. सगळ्यांना मृत्यूला सामोरी जावे लागते. येणारी प्रत्येक रात्र आपले जीवन संपत असल्याचे खुणवत असते, त्यामुळें आपला अंत समीप येत आहे ते घाबरवणारे नाही कां? अशा परिस्थितीत ज्ञानानेसुद्धा मी शांत कसा होणार? मृत्यूच्या अशारितीने जवळ येण्याच्या जाणीवेने शहाणपण असहाय होणार हे निश्चित. माणसाच्या विविध लालसा पूर्ण होण्या आधीच तो काळ त्याला पकडणार नाही ह्याची कोणतीही खात्री नसते. सुखोपभोग घेत असतांना तो त्याला केव्हां पकडेल ते सांगता येत नाही, हांच घातक प्रकार नाहीं कां? म्हणून शहाणे सांगतात, जे उद्या करावयाचे ते आजच करून टाका. भर तारुण्यातच माणसांने सगळ्या लालसा व्यर्थ असल्याचे समजून त्याचे जीवन जगले पाहिजे असा त्याचा अर्थ समजावा कां? त्यासाठी चांगुलपणा, भूतदया व

माणूसकी असे उत्तम गुण (त्याला सत्य मार्ग असें समजले जाते) अंगिकारणे व त्याद्वारा पुण्य करणे हेंच जीवनाचे आद्य कर्तव्य समजावे कां? ते सोडून आपल्या मुला बायकात रमण्याची चूक तो करतो. त्यासाठी अनेक कुक्रुत्य करत रहातो. त्यांत तो आणखीन जास्त अडकत जातो. जसे झोपलेल्या हरणाला वाघ पकडून नेतो, मृत्यू कोणालाही सोडत नाही. मग तो ब्राह्मण असो, क्षत्रिय अथवा वैश्य नाहीतर शुद्र असो. तो बलवानाला व कमजोराला सुद्धा पकडत असतो. कोणीही असो, मृत्यू धरणारच. तो कोणत्याही रुपाने अवतरत असतो. रोग, अपंगत्व, अपघात, वृद्धत्व अशा विविध रुपाने तो येणारच. जन्म झाल्यावर लागलीच कांहीं दोष माणसाला धरू लागतात ज्याच्या मागे मृत्यू असतो. हे सगळे श्रृतींमध्ये सांगितले आहे. जे लोक ही जीवनाची मर्यादा समजून मोक्षाकडे जाण्याचा प्रयत्न करतात ते वाचतात पण जे ते समजत नाहीत आणि सुखोपभोगामागे धावत रहातात ते मात्र नष्ट होतात. मृत्यूला कोणी थांबवू शकत नाही. फक्त सत्याचा (परमेश्वराबद्दलची आस्था) आग्रह त्याला अडवू शकतो असे वाटते. म्हणून नेहमी त्याला धरून जे जगतात त्यांना मृत्यूची भिती नसते. आपल्या वासनांना आवरून त्यांतून मिळणार्या अध्यात्मिक उर्जेने पुढे येणारा मृत्यू नियंत्रित करता येतो असे मला वाटते. त्या द्वारा अमरत्व कदाचित माणसाला प्राप्त होईल. सत्य मार्गाच्या अज्ञानामुळें मृत्यू येत असतो असे मला वाटते. मी मनाचा त्याग करीन (व्यर्थ विचारांचा त्याग करीन) ब्रह्मयज्ञ करीन (सोहंम जप करणे), कर्म यज्ञ करीन (कर्माच्या बंधनात रहाणार नाही). माझ्या सारखा जाणकार कर्मकांडात रमणार नाही. भूत, पिशाच्च, ह्यांना आळवणी करणार नाही. कारण त्यातून मनुष्य वासनांच्या जाळ्यात अडकत असतो. त्या ऐवजी मी ध्यान साधना, तपस्या (तपस्या), त्याग, योगसाधना अशांमध्ये माझा समय घालवीन. ज्ञानाच्या चक्षूंनी मी सगळे जग पहाण्याचा प्रयत्न करीन. मी ज्या ब्रह्मामधून आलो त्याचाच फक्त ध्यास धरीन. त्यातच सुख मानीन. माझ्या उद्धारासाठी मला पुत्र लागणार नाही. म्हणून मी लग्नसुद्धा करणार नाही. ब्राह्मणाला धन जमवायचे नसते म्हणून मी ते जमवणार नाही. मला कुटूंब करावयाचे नाही. कारण मी संसार करणार नाही. कोण आपले व कोण परके असे मला नसेल, मी गुहेत जाऊन तपस्या करण्यात माझे जीवन घालवणार आहे".

भिष्म पुढे सांगतात, "अरे युधिष्ठीरा, तुला ह्या पार्थाप्रमाणे जीवन जगण्याची इच्छा आहे कां"?

मोक्ष धर्म पर्व भाग दोन संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग तीन

युधिष्ठीर पुढे बोलतात, "अहो पितामह मला सांगा, श्रीमंताला व गरीबाला केव्हां सुख अथवा दुःख अनुभवाला येते"?

भिष्म सांगतात, "ह्या संदर्भात एक कथा मला आठवते ती सांगतो. ती संपकाने सांगितली आहे जो मोक्षपदी पोहोचला होता. ती कथा अशी, एक ब्राह्मण त्याच्या पत्नीच्या जाचक वागण्यामुळे दुःखी झाला होता. तो व्रतस्थ जीवन जगत होता. तो ब्राह्मण सांगतो कीं, जन्माच्या क्षणापासून माणसाला विविध प्रकारची सुख व दुःख भोगावी लागत असतात. तो त्यासाठी त्याच्या दैवाला जबाबदार समजत असतो. तसे समजत असल्यामुळे त्याला त्यांचे जास्त कांहीं वाटत नसते कारण ती त्याच्याच कर्माची फळं असतात. त्यामुळे तो मोक्षाच्या दिशेने कांहीं काम करू शकत नसतो. त्याकारणाने तो खरे सुख अनुभवू शकत नसतो. त्या ऐहीक सुख दुःखांच्या गदारोळांत तो फसलेला असतो. ऐहीक सुखाच्या अपेक्षा करणारा अध्यात्मिक आनंद तशा परिस्थितीत अनुभवू शकत नाही. ऐहीक वैभव आणि दारिद्रीपणा त्याला सारखाच असतो. परंतु, कारण गरीबीमुळें मनुष्य अध्यात्माकडे लवकर खेचला जातो म्हणून ते जास्त श्रेयस्कर समजले जाते. त्याकरतां ब्राह्मणांना गरीब रहाण्यास सांगितले आहे. गरीबाला चोरांची भिती नसते. त्याचे नुकसान होण्यासारखे नसते त्यामुळे तशा प्रकारच्या विवंचना त्याला नसतात. तरी जर तो रजो अथवा तमोगुणी असेल तर मात्र त्याला त्याच्या लालसांमुळे ती गरीबी जाचक ठरत असते. तसा हलक्या प्रवृत्तीचा ब्राह्मण पाप करण्यास प्रवृत्त होतो. मोक्षापासून दूर जातो. अशा माणसात असुरीसंपदा वाढत जाते. त्याचे ऐहीक गोष्टींतील गुंतणे वाढत असते. त्याची संपन्नता त्याला अध्यात्मिक दृष्ट्या हानिकारक ठरते. त्याला जे ऐहीक यश प्राप्त झाले ते त्याच्या अध्यात्मिक र्हासास कारण ठरत असते. म्हणून अध्यात्मिक दृष्ट्या गरीबी श्रेयस्कर समजली जाते. तसा मनुष्य जर राजा असेल तर त्याच्या प्रजेचे फार हाल होत असतात. तसे होऊ नये असे जर वाटत असेल तर आपल्या बुद्धीचा योग्य उपयोग करून तो त्याची संपत्तिक परिस्थिती नियंत्रित करून नेमस्त जीवन जगत रहातो. नसत्या अभिलाषा

वाढवत नाही ज्यांमुळे तो ऐहीक गोष्टींत अडकणार नाही. ऐहीक गोष्टींत न अडकता मर्यादीत जीवन जगणारा खर्या अर्थाने अध्यात्मिक दृष्ट्या सुखी ठरतो. असे मला त्या ब्राह्मणाने हस्तीनापुरात सांगितले जे ऋषी संपक त्याच्या कवनांतून गात असे. म्हणून अनावश्यक गोष्टींचा हव्यास न धरता जीवन जगण्याला त्यागपूर्ण जीवन समजले जाते. तसे जगणे श्रेष्ठ दर्जाचे जीवन समजले जाते. जीवन जगणे म्हणजे शरीराच्या नैमित्तिक आणि प्रासंगिक गरजा पूर्ण करणे असा अर्थ आहे, जसें प्राणी जगत असतात.

मोक्ष धर्म पर्व भाग तीन संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग चौथा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "जर कोणी इसम त्याग करण्याचे ठरवतो, परंतु, धनाची अभिलाषा त्याला त्रास देत असेल तर त्यानी स्वताला कसे आवरावे ते सांगा".

भिष्म सांगतात, "जो सुख, दुःख आणि सर्व प्रकारचे आनंद सारखेच समजतो त्याला ते साध्य करणे सोपे असते. त्यासाठी त्याची जीवनाकडे पहाण्याची दृष्टी वैराग्यपूर्ण असली पाहिजे. त्याच्या वागण्यात चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया त्याशिवाय सत्याची चाड असली पाहिजे. असा मनुष्य पृथ्वीवर स्वर्गमय जीवन जगू शकतो. त्याबद्दलची एक कथा मी तुला सांगतो. जी मनकीने सांगितली आहे. ती ऐक, ऐहीक सुखाच्या हव्यासांने पिडलेला मनकी सतत येणार्या अपयशांने त्रस्त झाला होता. अखेरीस उरलेल्या धनाचा उपयोग करून तो एक बैल जोडी खरेदी करतो शेत नांगरण्यासाठी. एके दिवशी तो त्यांना नांगराला जुंपून शेतावर घेऊन जातो. रस्त्यातून जातांना त्याला दिसते कीं, एक उंट वाटेत निजला आहे. ते पाहून त्याचे बैल त्या उंटाच्या अंगावर जातात, ते त्याच्या मानेवर पडतात. त्यामुळे तो प्रचंड आकाराचा उंट ताडकन उठतो व रस्त्याने धावू लागतो. ते बैल बांधलेले असल्याने त्या उंटाच्या मानेवर दोन बाजूने लोंबकळत असतात व तो उंट त्यांना घेऊन दूर धावत असतो. त्याचे दोनही बैल त्यांचे गळे दाबल्यामुळे मरतात. ते पाहून मनकी स्वताच्या मनात बोलतो, "जर माझ्या दैवात धन योग नसेल तर ते मला कधींच मिळणार नाही. मी कितीही प्रयत्न केले व कितीही कसब दाखवली तरी ते मला मिळणार नाही. त्याचे मेलेले दोन बैल पाहून तो हळहळत असतो. मी कितीही प्रयत्न केले तरी त्यात मला यश येणार नाही असें दिसते. असे म्हणतात कीं, मेहनतीने दैव सुधारता येते परंतु, ते योग्य नाही असे मला दिसत आहे. दैव हेंच सर्वश्रेष्ठ आहे. ज्याला खरोखरच कांहीं लालसा नाहीत तो शांतपणे झोपू शकतो. शुक तसे सांगतो जेव्हां तो वनात तपस्या करण्यासाठी गेला. आपल्या सगळ्या इच्छा पूर्ण झाल्याने संतुष्ट झालेला व ज्यांने सगळ्या इच्छांचा त्याग केला म्हणून संतुष्ट असलेला ह्या दोघांत दुसरा जास्त श्रेष्ठ असतो असे शुक सांगतात. शरीराच्या गरजांतून जीवाने ज्या इच्छा पूर्ण करण्याचे ठरवले त्यात मी,

म्हणजे आत्म्यांने, गुंतून घ्यावयाचे नसते. ते न समजणारे सतत शरीराच्या वासनांमध्ये गुंतून घेतात व त्या पूर्ण न झाल्याने दुःखी होतात. मी व माझे शरीर हे वेगळे आहेत हे समजण्यासाठी जे शहाणपण असावे लागते ते नसलेला असांच सतत दुःखी होत असतो. शरीराच्या गरजांमध्ये गुतणारे अध्यात्मिक दृष्ट्या कमजोर होत असतात. त्यामध्ये आत्म्याबरोबर असलेला त्याचा साथी लिंगदेह त्यात त्याला गुंतून घेण्यास प्रवृत्त करत असतो. म्हणून मला माझा लिंगदेह नियंत्रित करावा लागतो. ते ज्याला समजत नाही तो मूर्ख समजला पाहिजे. कोणीही त्याच्या सगळ्या इच्छा पूर्ण करू शकत नसतो. त्यासाठी इच्छा करण्याचे व्यसन माणसाने त्याला लागणार नाही अशा प्रकारे त्याच्या विचारांना आळा घालावयाचा असतो. जो अशाबाबत सावध झाला त्याचा मोक्षमार्ग सुकर होतो. शरीराच्या विविध गरजांना आवश्यकतेपेक्षा जास्त न वाढवणे हे त्यासाठी बुद्धीचे काम असते. एकदा ते जमले कीं, पुढचा प्रवास सोपा होतो. संपत्ती जमा करणारा ती सांभाळण्याच्या विवंचनेत असतो त्यामुळें तो सतत त्रस्त झालेला असतो. आपण जमवलेली संपत्ती आपल्या हातून जाणार नाही ह्या विचारात तो इतर अधिक महत्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतो. त्या विवंचना त्याला सतत दुःखी करत असतात. मृत्यूपेक्षा ते जास्त तापदायक असते. रजोगुणी व तमोगुणी त्यांच्या शरीराच्या, जीवाच्या इच्छांमध्ये अधिक प्रमाणात गुंतून रहातात. सात्त्विक त्या मानाने तशांत कमी गुंतत असतात. म्हणून मोक्षार्थी सात्त्विक प्रवृत्तीचा असला पाहिजे. तो त्याच्या इच्छाना जाण्यास सांगतो. त्यांचे व्यसन लागणे मोक्षार्थीसाठी हानिकारक असते. त्या माझ्या इच्छा नाहीत, त्या माझ्या जीवाच्या शरीराच्या आहेत व म्हणून मी आत्मा, त्यांत गुंतणे अयोग्य आहे असे सतत विचार जो बाळगतो तो त्यांच्या इच्छांच्या व्यसनांतून मुक्त होतो. जो इच्छांच्या पूर्ततेसाठी धडपडत असतो, त्याच्याबद्दल ब्रह्माला आकर्षण नसते. चांगुलपणा व माणूसकी आणि भूतदया जे त्यांच्या जीवनांत आचरतात ते ब्रह्माला प्रिय असतात. त्या विचारसरणीला योग समजले जाते. नेहमी ब्रह्माला प्रिय रहाणे खर्या मोक्षार्थीसाठी आवश्यक असते. त्यात तुझे मन व बुद्धी गुंतली गेली पाहिजे. मी जर इच्छांच्या व्यसनात गुंतून राहीलो तर माझा मोक्षमार्ग कुंठीत होईल व ते मला मान्य नाही . माझ्याकडे धन नसल्यामुळे माझे आप्त मला विसरतील. त्यामुळे माझे कांहीं बिघडत नाही. धन नसल्याने जे माझे नुकसान होईल

त्यापेक्षा धनाच्या येण्या व जाण्यामुळे जे दुःख मला होईल ते कितीतरी जास्त त्रासदायक असेल. धन नसल्यामुळे मला चोरांची भिती नसेल. राजाच्या संरक्षणाची मला आवश्यकता नसेल. इच्छांच्या पूर्ततेसाठी जी शक्ती मी खर्च करणार ती जर मी ब्रह्माच्या साधनेत खर्च केली तर ते जास्त हितकारक असेल. कारण ब्रह्माची प्राप्ती झाली कीं, मला धनाची आवश्यकता नसेल. इच्छांच्या पूर्ततेसाठी कितीही मेहनत करा. तरी त्यात अंतिम सुख नसते. म्हणून अरे वासनांच्या इच्छांनो, मी तुमचा आजपासून त्याग करणार आहे. ह्या कामात माझा देह मला पूर्ण सहकर्य देईल अशी माझी खात्री आहे. कारण तो माझा देह माझ्या अंतिम हितासाठी झटत असतो. तो त्याच्या सगळ्या गरजा मर्यादेत ठेवील. त्यामुळे मला शांतता मिळेल. मला कोणत्याही गोष्टीचे आकर्षण वाटणार नाही अशी माझी दृष्टी असेल. माझ्या शरीराच्या सगळ्या गरजा किमान पातळीवर मी ठेवणार आहे व त्यात मला माझे मन व बुद्धी मदत करणार आहेत. त्या तशा राखण्याचे सुख मी प्राप्त करणार आहे. मला इच्छाच नसल्यामुळे त्या न मिळण्याचे दुःखसुद्धा मला होणार नाही. इच्छाच नसण्याचे विलक्षण सुख मी आता अनुभवणार आहे. मी खर्या अर्थाने जास्त सुखी झालो आहे.

अशा प्रवृत्तीचा विकास मनकीने स्वीकारल्याने तो मोठा त्यागी झाला. माणसाच्या इच्छा त्याचा खरा शत्रू असतो हे सत्य त्याला उमगले. निरीच्छ जीवन जगणे हांच मोक्षाचा मार्ग आहे हे मनकी समजला. त्या मार्गाने मनकी शेवटी मोक्षाला जातो.

मोक्ष धर्म पर्व भाग चौथा संपला.

*गौतम बुद्धाला तेंच ज्ञान नंतर अनेक शतकानंतर प्राप्त झाले त्यातून त्याची विचारप्रणाली पुढे आली, त्याला हल्ली बुद्ध धर्म म्हणून सांगतात.*

# मोक्ष धर्म पर्व

## भाग पांचवा

भिष्म पुढे सांगतात, आत्म शांती प्राप्त झालेले विदेहचे राजा जनक ह्यांची एक कथा मी तुला सांगतो. राजा जनक सांगतात कीं, त्यांच्या कडे अगणित संपत्ती असूनही ते खर्या अर्थाने निर्धन आहेत. कारण त्या संपत्तीमध्ये ते गुंतलेले नाहीत. सगळी संपत्ती जरी नष्ट झाली तरी त्यांच्या मनाला कांहीं दुःख होणार नाही.

भिष्म सांगतात, ह्या संदर्भात आणखीन एक कथा सांगतो. एकदा राजा ययाति ऋषी व्याधाला विचारतो, अहो ऋषी मला खर्या मनःशांतीचा मार्ग सांगा. ऋषी सांगतात कीं, खर्या मनःशांतीसाठी माणूस चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ह्या धोरणांने त्याचे जीवन जगत असला पाहिजे. त्याशिवाय निरिच्छ असणे जरूरीचे असते. त्यासाठी इतर प्राणी कसे जगतात ते त्यांने निरीक्षण करून शिकले पाहिजे. कारण ते कोणत्याही इच्छेशिवाय जगत असतात. ते त्यांच्या जीवाच्या प्रेरणेने त्यांच्या किमान (नैमित्तीक) गरजा भागवत असतात. इच्छा व त्याच्या पूर्ततेची आशा माणसाला सगळ्या प्रकारच्या बंधनात अडकवत असतात. त्यासाठी त्यांचा त्याग करणे मोक्षार्थीसाठी आवश्यक असते. सवयीने ते शक्य होते. त्यासाठी त्यांचा निर्धार असला पाहिजे. मनाच्या पूर्ण तयारीनेच ते शक्य होत असते.

मोक्ष धर्म पर्व भाग पांचवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग सहावा

युधिष्ठीर बोलतो, "अहो पितामह, तुम्ही लोकांच्या वागणूकीचा चांगला अभ्यास केला आहे. मला सांगा, जीवनात यशस्वी होण्यासाठी माणसाने कसे वागले पाहिजे"?

भिष्म पुढे सांगतात, "ह्या संदर्भात मी तुला एक कथा सांगतो, ती प्रह्लाद आणि अजगराची आहे. एके काळी राजा प्रह्लाद एका भटकणार्या ब्राह्मणांला प्रश्न विचारतो, सर्व इच्छांच्या पासून परावृत्त झालेला, नम्र असलेला, मधूर वाणी असलेला, कोणावरही राग (क्रोध) नसलेला, उत्तम वागणूक असलेला, बुद्धीने निर्णय घेणारा, लहान मुलासारखा निर्मळ मन असलेला, ज्याला स्वार्थ उरला नाही असा, आणि म्हणून, दुःख विरहीत असा ब्राह्मण जगातील कोणत्याही गोष्टीने उत्तेजित होत नाही. त्याला हित आणि पुण्य ह्यात पुण्य जास्त महत्वाचे वाटत असते. असा सदैव शांत वृत्तीत असतो. तो कशानेही अस्वस्थ होत नाही. त्याच्या शरीराच्या गरजा नेमस्त असतात. तू असे कसे राहू शकतोस ते मला सांग.

भिष्म पुढे सांगतात, तो बुद्धिमान ब्राह्मण त्याला सांगतो, "अरे प्रल्हादा, जीवांच्या निर्मितीचे कारण आपण आपल्या प्रज्ञेने समजू शकत नाही. म्हणून मी कोणत्याही सुखाच्या आणि दुःखाच्या विचारांत रमत नाही. आपली सुख व दुःख आपल्या कल्पनांचे खेळ असतात. त्यांना विशेष महत्व द्यावयाचे नसते. हे ज्याला समजले तो सुखांत व दुःखांत अडकत नाही. ह्या जगात जे कांहीं घडते ते त्या संबंधीत प्राण्याच्या स्वभावाशी निगडीत असते. त्यांचे कांहीं खास स्वभाव असतात त्यानुसार त्या घडतात. ते माहीत असल्यामुळे मी तशांमुळे प्रभावित होत नाही. त्यांकडे तटस्थपणे मी पहात असतो. त्या घडणार्या गोष्टींशी माझे कांहीं नाते नसते. घडणार्या गोष्टी त्यांच्या स्वभावानुसार होत असतात. त्या होणे अगर न होणे, बिघडणे अथवा पुन्हा होणे असें सतत होत असते कारण ते सृष्टीच्या नियमानुसार होत रहाणार हे मी जाणतो म्हणून मी त्यांचा विचार करत नाही. त्या माझ्यावर प्रभाव टाकू शकत नाहीत. ज्या निर्माण झाल्या त्या नष्ट होणार हे माहीत असतांना त्या नष्ट झाल्या म्हणून मी कां दुःख करू"? कोणीही किती मोठे असो अथवा लहान असो त्यांचे जीवित कार्य ठरलेले आहे व त्याप्रमाणे ते होत असते त्यात फारसा

बदल कोणी करू शकत नाही. एकाद्या आपसूक चालणार्या अजस्त्र यंत्रासारखी ही सृष्टी तिचे कार्य करत असते त्याबद्दल मी जास्त विचार करत नाही. फक्त एकच गोष्ट नित्य आहे ती म्हणजे बदल होत रहाणे. मी ते बदल पहात सृष्टीचे कौतुक करत असतो. त्यातच माझा विरंगुळा असतो. कधी मला उत्तम खाणे लोक खाण्यास देतात तर कधी खराब खाणे मला खाण्यास मिळते परंतु, त्यामुळे मी प्रभावित होत नाही. कधी मला उत्तम बिछान्यावर निजावयास मिळते तर कधी मी तृणशय्येवर झोपतो पण ते मला प्रभावित करत नाहीत. कधी मी फाटके कपडे घालतो कधी चांगले वस्त्र मी नेसतो जसे लोक मला देतात. त्यांचा मी कधी विचार करत नाही. चांगले मिळाले म्हणून जास्त खूष व्हावयाचे व खराब मिळाले म्हणून नाराज व्हावयाचे असे माझे होत नाही कारण ते सगळे काळाच्या प्रभावामुळें होत असते असे मी समजतो. माझ्यासाठी ते सगळे सारखेच असतात. माझे ध्यानात रहाणे त्या सगळ्या गोष्टींपेक्षा जास्त महत्वाचे असते माझ्यासाठी. मातीवर चालणार्या मुंग्यांच्या हालचाली जसे लहान बालक निरागसपणे पहात असते तसा मी त्या सगळ्यां गोष्टींकडे पहात असतो. त्यांत मी गुंतत नाही. सगळे दैवाच्या गतिने होत असते. ज्याचे गत कर्म जसे तसे तो ते भोगत असतो. पुढील जन्माचे दैव मनुष्य ह्या जन्मात त्याच्या कर्मानेे व विचारांने लिहीत असतो. आपली प्रत्येक कृती व विचार आपले पुढील भाग्य ठरवत असते हे जो जाणतो तो त्याची वागणूक सावधगिरीने करत असतो. माझ्यासारखा व्रतस्थ जीवन जगणारा काय खातो ते महत्वाचे नसते तो काय करतो व काय विचार त्याच्या मनात येतात ते महत्वाचे असते. येणारा प्रत्येक विचार आपले पुढील भाग्य घडवत असते. मनात येणार्या प्रत्येक विचारांचा अभ्यास करावयाचा असतो व ते विचार कां उत्पन्न झाले त्यावर चिंतन करणे व ते योग्य कीं, अयोग्य त्याचा निष्कर्ष काढून त्यानुसार आपण आपले विचार ठरवावयाचे असतात. तसे चिंतन योग्याला मार्गदर्शन करत असते म्हणून ते फार महत्वाचे असते. इच्छांच्या आहारी गेलेल्या लोकांचे होणारे हाल मी पहात असतो. त्यातून मी शिकत असतो. सत्याच्या दृष्टीने जर तू रहात असशिल तर तू समजशिल कीं, सुख, दुःख, त्याग, मोह, मृत्यू आणि एकंदर जीवन हे सगळे त्यांच्या त्यांच्या कर्माची फळं असतात. ज्याने उत्तम कर्म केले त्याचे पुढील जीवन आनंदमय झालेले मी पहातो व जे लोभात मोहात अडकून चुकीच्या गोष्टीत गुंततात त्यांचे पुढील जीवन अस्वत्थ करणारे झालेले

सुद्धा मी पहात असतो. त्या निरीक्षणातून मी शिकत असतो. माझे विचार व विहार त्यामुळे जास्त शुद्ध करण्यात मला मदत होत असते. अशी माझी वागणूक असते प्रह्लादा. मूर्ख माणसें ते समजत नाहीत व नको त्या लोभात, मोहात अडकत असतात. त्यातून सुद्धा मी शिकत असतो. मी लोकांचे निरीक्षण करून त्यांतून शिकत असतो.

भिष्म पुढे सांगतात, तो निर्वाज जीवन जगणारा ज्ञानी ब्राह्मण जो भिती, लालच, मूर्खपणा, क्रोध अशांपासून मुक्त झालेला एकाद्या अजगरा सारखा शांत जीवन जगत होता म्हणून त्या ऋषीला अजगर म्हणत होते. प्रह्लाद त्याच्या मार्गदर्शनाने संतुष्ट होतो तसा तू सुद्धा हो असे भिष्म युधिष्ठीराला सांगतात.

मोक्ष धर्म पर्व भाग सहावा संपला

# मोक्ष धर्म पर्व

## भाग सातवा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "मला सांगा अडचणीत असलेला कोणत्या गोष्टीवर जसे, आप्त, संपत्ती, शहाणपणा, ह्यांपैकी विसंबून राहू शकतो"?

भिष्म सांगतात, शहाणपणा हा खरा आधार असतो. शहाणपणा हा सर्वोत्तम गुण आहे. त्याने मनुष्य त्याचे सगळे प्रश्न सोडवू शकतो. शहाणपणामुळे तू मोक्षाकडे जाऊ शकतोस. त्या गुणामुळे प्राचीन काळी वली, प्रह्लाद, नमुची, मनकी असे अनेक त्यांचा उद्धार करून राहीले आहेत. जेव्हां ते ऐहीक ऐश्वर्य घालवून बसले होते तेव्हां त्यांना त्यांच्या शहाणपणाने मार्ग दाखवला होता. आप्त व संपत्ती सापेक्ष असतात त्या उपयोगी येतीलच असे सांगता येत नाही. त्या संदर्भात मी तुला इंद्र आणि काश्यप ऋषी ह्याच्यातील संवाद झाला होता तो सांगतो. एकेकाळी एक समृद्ध वैश्य त्याच्या संपन्नतेच्या गर्वात रहात होता. त्याच्या रथाच्या चाकाखाली एकदा काश्यप ऋषीचा मुलगा सापडला. तो जमिनीवर वेदनांनी तडफडत पडला होता. तो संतापाच्या भरात त्या वैश्याला शाप देतो व उद्वेगांने म्हणतो कीं, माझ्या सारख्या दरिद्री ब्राह्मणाची ह्या जगाला गरज नाही. मी माझी जीवन यात्रा संपवतो. तेथे तो मरणासंन्न अवस्थेत मृत्यूची अपेक्षा बोलत असतांना स्वर्गातून इंद्र तेथे एका कोल्ह्याच्या रुपात येतो. इंद्राला त्याचे ते उद्वेगांने बोलणे आवडत नाही. तो त्या ब्राह्मणाला बोलतो,

"सगळे खालच्या प्रजातीतील प्राणी माणसाच्या जन्माची अपेक्षा करत असतात. त्यात पुन्हा ते ब्राह्मणाचा जन्म मांगत असतात. तू एक ब्राह्मणाच्या कुळात जन्मला असून त्यात पुन्हा वेदशास्त्र संपन्न आहेस. जे सहसा कोणाला जमत नाही. अशा परिस्थितीत तू मरण स्वीकारणे योग्य होणार नाही. तो मूर्खपणा होईल. त्या संदर्भात श्रृती जे सांगते ते लक्षात घे. तू जे प्राप्त झाले त्यात समाधानी आहेस असे दिसते. तरी मरण अशारितीने स्वीकारणे तुला शोभत नाही. तुला तुझ्या जीवनाबद्दल थोडीतरी लालसा असवयाला पाहिजे. तुझे जीवनातील यश हाताशी आलेले असतांना तुझे मरणे चांगले नाही. तुला हात आहेत जे आम्हाला नाहीत. आम्ही हात असावेत म्हणून प्रार्थना करत असतो. हात असण्यासारखे

सुख नाही. आता पहा माझ्या पायात जो काटा घुसला आहे तो मी काढू  शकत नाही. जर मला हात असते तर तो काटा मी काढून टाकला असता. ते डांस मच्छर मला सतावतात त्यांना मी हाकलू शकत नाही. ज्यांना दोन हात व प्रत्येक हाताला पांच बोटे दिली आहेत ते त्यांच्यासाठी घर बांधू शकतात. जे आम्ही कधीच करू शकत नाही. त्या दोन हातामुळे तुम्ही माणसं इतर प्राण्यांना नियंत्रणात आणू शकता. तुम्हाला वाचा आहे त्यामुळे तुम्ही बोलू शकता. एकमेकांना कांहीं सांगू शकता. आम्हा इतर प्राण्यांना त्यांची दुःख व आनंद व्यक्त करता येत नाही कारण, आम्ही तुमच्या सारखे बोलू शकत नाही. तुला नशीबाने ते सगळे प्राप्त झाले आहे. कारण तू एक मानव जन्म घेतला आहेस. अशासाठी तुला तुझ्या जन्माचा अभिमान वाटला पाहिजे. त्यात पुन्हा तू ब्राह्मण कुळात जन्मला आहेस ह्याचा तुला विशेष अभिमान वाटला पाहिजे. तू मरण स्वीकारू नकोस कारण ते पाप ठरेल. तुझे अजून बरेच आयुष्य बाकी आहे. ते तू जगला पाहिजेस. मी ज्या कोल्ह्याच्या कुळात जन्मलो आहे ते तरी बरे आहे, त्या पेक्षा जास्त दयनीय अशी कुळ आहेत. जर तू मेलास व त्यानंतर तू तशा दयनीय कुळात जन्मलास तर कल्पना करं तुझे किती नुकसान होईल. त्यापेक्षा ह्या जन्माचे सार्थक करणे जास्त हितकारक आहे हे लक्षात घे. पुढे तो कोल्ह्याच्या रुपात आलेला इंद्र बोलतो, त्याला माहित नाही कीं, कोणी प्रजाती पूर्ण सुखी आहे. प्रत्येक प्रजातीच्या कुळाची सुख आणि दुःख असतात त्यांबद्दल तक्रार करण्यात तथ्य नसते. आहे त्यात समाधान मानून स्वताचा उद्धार कसा होईल त्याच्यावर लक्ष द्यावयाचे असते. मनुष्य समृद्ध झाल्यावर त्यापेक्षा जास्त समृद्ध होण्याचा प्रयत्न करत असतो. त्यानंतर तो देवांच्या श्रेणाला जाण्याचा प्रयत्न करतो. परंतु, तू आधीच ब्राह्मण कुळात जन्मला आहेस. ब्राह्मण म्हणजे देवांच्या योग्यतेचे मनुष्य असे समजले जाते. त्यात तुझे समाधान का होत नाही. तहान जास्त पाणी प्याल्याने भागत नाही उलट ती वाढत जाते जसे वासनांचे होते. त्या कधीच पूर्णपणे शांत होत नाहीत. त्या भागवल्याने आणखीन वाढत असतात. तेंच सुखांचे व आनंदाचे असते. ते कधींच कायम तृप्त होत नाहीत. त्यासाठी त्यांच्याबाबत केव्हां तरी थांबावयाचे असते. तसें थांबवले कीं, त्या वाढण्याचे थांबते, एरव्ही नाही. तू मद्य वारुणी प्याला आहेस कां? तू लाव्हा पक्षाचे मांस खाल्ले आहेस कां? अशी अनेक सुख अजून तू उपभोगली नाहीस. म्हणजे तुझ्या मानव जन्माच्या

कित्येक सुखांची तुला साधी कल्पनासुद्धा नाही. अशा स्थितीत तू मरणे चुकीचे आहे. तशा सुखांचा अनुभव घेतल्यानंतर त्यांचा मनाने त्याग करण्यात खरी साधना असते. त्यासाठी माणसाला ब्रह्माने गृहस्थाश्रम सांगितला आहे. जी सुख तुला माहीत नाहीत त्यांच्या त्याग करण्याच्या गोष्टी करणे हास्यास्पद असते. कारण तो त्याग भ्रामक असतो त्यामुळे कांहींच फायदा होत नसतो. सुख अनुभवल्यानंतर त्यांच्या व्यर्थपणाची जाणीव होणे ह्यालाच खरा त्याग समजले जाते. दोन हात असलेला प्राणी त्याच्या सारख्या इतर कमजोर लोकांवर राज्य करतो जे हात नसलेल्या प्राण्यात होत नाही. तो त्यांना त्रास देतो, छळ सुद्धा करतो ते इतर प्राण्यात होत नाही. त्यात त्याला दानवी आनंद मिळतो. हे झाले तामसी लोकांचे, जे सात्त्विक आहेत ते इतर प्रकारे त्याच्या हातांचा, उपयोग करून ज्ञान मिळवतात. सगळे त्यांच्या त्यांच्या गत जन्माच्या कर्माने बांधलेले असतात. तुझ्या जातीतील जे अपंग आहेत त्यांना पहा. ते तसे असले तरी जगू इच्छित असतात. त्यातून ते सुख मिळवण्याचा प्रयत्न करत असतात. मरण्याची इच्छा करणे हे पराजयाचे लक्षण समजले जाते. जो मत्यू स्वाभाविकपणे येणार तो खरा मृत्यू असतो. इतर मृत्यू पापकारक असतात म्हणून तशी इच्छा तू धरू नकोस. तुला ह्या अपघातातून बाहेर यावयाचे आहे व पुढची प्रगती करावयाची आहे. म्हणून तू उठ व पुन्हा जगण्याच्या कामाला लाग. हा अपघात तुझ्या कर्माचा परिणाम आहे एरवी तो घडला नसता हे सुद्धा तू लक्षात घे. वेदांचा अभ्यास करण्यास सुरूवात कर. इतरांशी तू तुझी कधी तुलना करू नकोस. त्यामुळे कांहीं मिळत नसते हे लक्षात असू दे. स्वताची प्रगती किती झाली तेवढाच विचार करत त्यात प्रगती करत रहा. तुलना करावयाची तर ती स्वताच्या अवस्थेची करत जा म्हणजे तू किती प्रगती केलीस कां नाही ते समजेल, ते तुला पुढच्या कामात उपयोगाचे असेल. तसे केलेस तर तू गर्व आणि मत्सर ह्या दोषांपासून मुक्त रहाशिल. जे शुभ राशीवर जन्मतात ते सात्त्विक असतात व त्यांचा उद्धार होत असतो व जे अशुभ राशीवर जन्मतात ते रजो अथवा तमोगुणी असतात त्यांचा उद्धार मुष्किलीने होत असतो. माझेच पहा, गेल्या माझ्या जन्मात मी नास्तिक होतो. कधी देव मानला नाही. जरी वेदाचा अभ्यास केला केवळ रिवाज म्हणून, तरी त्यात दिलेल्या गोष्टी मी कधी मानल्या नाहीत. मी ब्राह्मण कुळात जन्मलो पण शुद्रा सारखा विचार करत होतो. मी कधी त्या गोष्टींवर विश्वास ठेवला नाही

ज्या गोष्टी शहाणे लोक समजून घेत असतात. तरी मी वेदाच्या गोष्टी करत होतो, सगळे ते थोतांड होते. मनातल्या मनात मी त्यांची टींगल टवाळी करत होतो. त्या माहितीचा मला कधी अनुभव आला नाही म्हणून त्यांवर माझा विश्वास नव्हता. अखेरीस मृत्यूनंतर मी कोल्हा म्हणून जन्मलो आहे. मला कळले आहे मी किती मोठी चूक केली, आता मी त्या पश्चात्तापामुळे तरी पुन्हा मानव जन्मात जाईन अशी आशा धरून आहे. मी श्रद्धेने वेदांची शिकवणूक स्वीकारणार आहे".

ते ऐकल्यावर तो काश्यप कुळातील ब्राह्मण उठला. त्याला मरण्यात अर्थ नाही हे समजले. त्याला समजले कीं, तो कोल्ह्याच्या रुपात साक्षात इंद्र त्याला सावध करण्यासाठी आला आहे. तो ब्राह्मण त्या साचीच्या पतिची पुजा करतो. तो धन्य होतो. इंद्राची परवानगी घेऊन तो त्याच्या निवासस्थानी निघून जातो.

मोक्ष धर्म पर्व भाग सातवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग आठवा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "अहो पितामह मला सांगा, दान, यज्ञ तपस्या आणि गुरूची केलेली कर्तव्य तत्पर सेवा ह्यामुळे शहाणपणा आणि परमानंद मिळतो हे खरे आहे कां"?

भिष्म पुढे सांगतात, "अनावश्यक गरजा उत्पन्न करणे, त्यातून प्राप्त होणारा क्रोध व इतर प्रतिक्रीया ह्यामुळे मनुष्य पाप करत असतो. अशारितीने पापात रमणारा पुढे मृत्यूनंतर सततच्या वेदनामय अशा अवस्थेत रहात असतो. अशा पापी लोकांचे पुढचे जन्म अशा ठिकाणी होतात जेथे दुष्काळ, शत्रूंचे साम्राज्य आणि यातनामय जीवन असते. ज्यांनी पुण्य मार्ग अवलंबिला ते उच्च कुळात जन्मतात. त्यांना स्वर्ग प्राप्त होतो. पुण्याच्या मार्गाबद्दल तुच्छता बाळगणारे भयमय अशा लोकांत जन्म घेतात. त्यांच्या मनाला शांती नसते. त्यांच्या कुकर्माचे परिणाम ते यथेच्छ भोगत रहातात. त्याचे वर्णन करता येणार नाही. त्या ऐवजी चांगुलपणा, माणूसकी व भूतदया असे जगणारे सर्व प्रकारच्या सुखात त्यांचे जीवन व्यतीत करत असतात. हे सगळे त्यांच्याच आधीच्या जन्मातील चुकांचे परिणाम म्हणून त्यांना भोगावे लागतात. त्यातून मुक्ती मिळवण्यासाठी देवतांची उपासना आगम विद्येत सांगितली आहे त्यासाठी कर्मकांड दिलेले आहे. त्यांच्या उपयोगांने कदाचित त्या वाईट भोगांपासून त्याची सुटका होते असे वेदाचार्य सांगतात. परंतु, ते कर्मकांड सगळ्यांना करता येईलच ह्याची शाश्वती नसते. आधी पाप करावयाचे व नंतर त्या पासून मुक्ती मिळवण्यासाठी कर्मकांड करावयाचे ह्या उपद्व्यापापेक्षा पुण्य मार्गात रहाणे केव्हांही जास्त श्रेयस्कर असते हे तू लक्षात ठेव. आपले कर्म व आपले विचार आपला पाठलाग करत असतात हे जो समजून त्याचे जीवन जगतो त्याला कधी पश्चात्ताप करण्याची वेळ येत नाही. ह्या जन्मात केलेल्या कुकर्माचा परिणाम त्याला पुढच्या जन्मात भोगावा लागत असल्याने त्याची जास्त दखल मूर्ख मनुष्य घेत नाही. परंतु, शहाणा ते चांगले समजून त्याची सगळी कामं व विचार दक्षतापूर्वकपणे करत असतो. माणसाला त्याच्या कर्माची फळ भोगावीच लागतात जरी त्यांने देवतांना कर्मकांडाच्या यज्ञयागाने प्रसन्न केले, त्याचे असे असते कीं, त्या देवता कुकर्माचे भोग आणखीन पुढच्या जन्मात ढकलण्याचे काम

करत असतात. त्यामुळे ते भोग नष्ट झाले असे अज्ञानी मनुष्य समजत असतो. म्हणून अरे पांडवा, कर्मकांड व त्यातून होणारे यज्ञ आदी केवळ वेळ मारण्याचे काम करत असतात. म्हणून त्यात तू फसू नकोस. कर्मकांड हा एक प्रकारचा भ्रष्टाचार आहे. तो खरा मार्ग नसतो. म्हणून त्यात शहाणे जास्त रमत नाहीत. चांगल्या अथवा वाईट कर्माची फळं भोगल्यानंतरच ते नष्ट होतात. तरी त्यांच्या प्रभावामुळे (लिंगदेहात त्याची नोंद झालेली असल्यामुळे) मनुष्य पुन्हा पुन्हा जन्म घेतच रहातो. खर्या पश्चात्तापाने जो तपस्या करतो व त्या मार्गाने त्याची अध्यात्मिक उर्जा वाढवतो तो कदाचित त्या वाढलेल्या अध्यात्मिक उर्जेच्या प्रभावामुळे त्याची पाप धूत असतो. पण ते तितकेसे सहज नसते. म्हणून मुळात पाप न करणे हेंच श्रेयस्कर असते. आधी वासनांच्या प्रभावाखाली पाप करावयाचे व नंतर ते नष्ट करण्यासाठी तपस्या करावयाची हा उपद्व्याप निरर्थक समजला आहे ज्ञानी लोकांनी. आधी वस्त्र मळवावयाचे व नंतर धुण्याचा सोपस्कार करावयाचा हा द्राविडी प्राणायम शहाणपणात बसत नाही. ह्या योगाला कर्मविपाक असे म्हणतात. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, आपल्या कर्माचा विपाक (परिणाम) आपल्याला भोगावाच लागतो त्याशिवाय पाप पुण्याचे गणित पूर्ण होत नाही. अद्वैत, कर्मविपाक आणि पुनर्जन्म हे तीन सिद्धांत वेदांत सांगितले आहेत ते लक्षात ठेव. ज्याने हे लक्षात ठेवून जीवन जगण्याचा निर्धार केला तो कधी भ्रष्ट होत नाही. तोंच खरा शहाणपणा आहे.

मोक्ष धर्म पर्व भाग आठवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग नववा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "मला सांगा अहो पितामह ही चराचरांनी भरलेली सृष्टी कोणी योजली व केव्हां"? तिचा अंत केव्हा होणार ते सांगा. त्या सृष्टीतील यच्चयावत गोष्टी जसें समुद्र, वन, पहाड, नद्या, अग्नी, वारे, जमीन व त्यात वावरणारे प्राणी आणि वनस्पती कसे उत्पन्न झाले त्याचे गुपित मला तुमच्या कडून समजून घ्यावयाचे आहे. शुद्धता व अशुद्धता हे प्रकार कसे ठरले ते सांगा. जन्म आणि मृत्यू ह्यांचे क्रम कसे ठरले ते सांगा. हे सगळे आपण जाणता म्हणून ते मला तुमच्या कडून समजून घ्यावयाचे आहे.

भिष्म सांगतात, "ते मी तुला सांगतो, प्राचीन ऋषी भृगू ह्यांच्या शब्दात, ते नीटपणे ऐक. प्राचीन काळी ऋषी भारद्वाजानी हांच प्रश्न ऋषी भृगूंना विचारला होता.

कैलास पर्वतावर भृगू बसले होते तेव्हां भारद्वाज त्यांना विचारतात, "कोणी व कां ही सृष्टी उत्पन्न केली ते मला सांगा. त्यात शुद्धता व अशुद्धता कशी उत्पन्न झाली ते सांगा. त्यामुळे पाप व पुण्याचे गणित कसे सुरू झाले ते सांगा. प्राण्यात जीव कसा येतो ते सांगा. तो कां मरतो ते सांगा, प्रथम लहान जन्मून तो कां वाढतो ते सांगा. आपण सगळे जाणता म्हणून मी आपल्याला ते विचारत आहे.

ब्रह्मासारखे ज्ञानी असलेले भृगू बोलतात, "मनसा नावाच्या प्राचीन ऋषीचा कोणाला जन्म आणि मृत्यू माहीत नाही. त्याला कोणतेही शस्त्र भेदू शकत नव्हते. त्याच्यात वृद्धत्व नव्हते. तो कोणाला दिसत नव्हता. तो अभेद्य, अनंत, शाश्वत असा होता, त्याच्या इच्छेतून व त्याच्यातून ही सृष्टी उत्पन्न झाली असे कांहीं ऋषी सांगतात. त्याने प्रथम महत नांवाचे तत्त्व उत्पन्न केले. त्यात प्रथम जागृती (मीपणा) उपजला. त्यातून आकाश बनले. त्यात विचाराचे पाणी तयार झाले. त्या पाण्यातून सगळे चराचर जीव उपजले. त्याच वेळी अग्नी आणि वायू तयार झाले. त्यांच्या संयोगातून पृथ्वी तयार झाली. मनसाने एक कमळ निर्माण केले ज्यातून ब्रह्मदेव उत्पन्न झाले. त्यात सगळी अध्यात्मिक उर्जा होती. त्यात जे ज्ञान होते ज्यातून वेद तयार झाले. त्यालाच विचार सागर असे म्हणतात ज्यामुळे विचार सगळीकडे संचारत होते. त्यातील पहिला विचार होता, "तो मी आहे", त्यातच जागृती व

अहंकार होता. मनसाच्या हाडांतून जमीन व वास्तविक पाणी तयार झाले. समुद्र त्याचे रक्त होते. आकाश त्याचे पोट होते, वायू त्याचा श्वास होता. अग्नी त्याची वास्तविक शक्ती होता. सूर्य व चंद्र त्याचे डोळे वाटत होते. त्याला कोणी मोठा ज्ञानीसुद्धा निटपणे समजू शकत नव्हता. कांहीं ऋषी त्यास अनंत म्हणून बोलत होते. तो म्हणजे साक्षात चैतन्यमय जागृती आहे. त्याच्या इच्छेतून सगळे  तयार होत असते व त्यातच नष्ट होत असते".

भारद्वाज पुढे विचारतात, "त्याने तयार केलेल्या आकाशाच्या दिशांची मर्यादा पृथ्वीच्या सापेक्ष काय होती"?

भृगू सांगतात, जे आकाश तुला दिसते ते अथांग आहे. त्याचे मोजदाद करता येणार नाही. त्यात सगळे पुण्यवंत रहात असतात. सूर्य व चंद्रसुद्धा त्या पर्यंत पोहोचत नाहीत. त्या आकाशात अनेक सूर्य व तारे आहेत ज्यांची गणती शक्य नसते. जमिनीच्या पलिकडे जल सागर आहे व त्याच्या पलिकडे आहे केवळ अंधार. जेथे नागलोक आहे. अंधार व पाणी असे आलटून पालटून आढळतात त्यांत चराचरांची बीज आहेत. त्या पलिकडे काय आहे ते कोणालाच माहीत नसते. मोठे ऋषी त्याची मर्यादा तपासण्याचा प्रयत्न करतात पण ते कोणालाही समजलेले नाही. कारण ते अमर्याद आहे, अनंत आहे. मनसाची मर्यादा कोणालाच काढता आलेली नाही. आकाश कधी वाढत असते व कधी लहान होत असते. सृष्टीतील पाप पुण्याच्या प्रमाणानुसार ते होत असते. चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ज्यामुळे पुण्य वाढते ती मनसाची लक्षणं असे कांहीं ऋषी समजतात. हा मानसा ऋषी हेंच तुझ्या प्रश्नाचे उत्तर आहे.

भारद्वाज विचारतात, "जर मनसाने कमळ तयार केले व त्यातून ब्रह्म अवतरले असे असेल तर कमळ प्रथम समजले पाहिजे ब्रह्म नाही, ह्यावर आपले काय म्हणणे आहे"?

भृगू बोलतात, पृथ्वीला कमळ समजतात. ती तयार केली कारण अव्यक्त मनसाला स्थीर होण्यासाठी ती आवश्यक होती. त्यातच मनसा ब्रह्म रुपाने व्यक्त झाला. त्यात सुमेरू त्या कमळाचा देठ झाला. त्यात नंतर सगळे सृष्टीचे देव व इतर चराचर तयार होत गेले.

मोक्ष धर्म पर्व भाग नववा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग दहावा

भारद्वाज पुढे विचारतात, "सुमेरू पर्वतावर रहाणारे ब्राह्मण हे इतर प्राणी कसे उत्पन्न करतात ते मला समजून घ्यावयाचे आहे, तरी ते मला सांगा".

भृगू सांगू लागतात, "तो महान मनसा जो पूर्वी अव्यक्त होता, त्याच्या नव्या ब्रह्माच्या व्यक्त अवतारात त्याच्या विचारांतून (कल्पनांतून) ह्या सृष्टीची रचना साकार करू लागतो. तो प्रथम पाणी तयार करतो कारण त्याची तो इच्छा करतो. तो म्हणतो पाणी असावे व पाणी तयार होते. अशारितीने तो एक एक करून गोष्टींची कल्पना करत जातो व त्या त्या गोष्टी त्याच्या इच्छेने तयार होत असतात. पाण्यातून तो जीवांची निर्मिती करतो".

भारद्वाज विचारतात, "पाणी त्यानंतर अग्नी आणि वायू असे कसे क्रमाने उत्पन्न होतात त्या मागे कोणती गोष्ट कारणीभूत होती ते सांगा".

भृगू सांगतात, "अरे ब्राह्मणा, तो ब्रह्मकल्प (ब्रह्मकाळ) होता. त्या काळी परिस्थिती फार वेगळी होती. ब्रह्माने रचना तत्त्वाची कल्पना केली व त्यामुळे विविध चीजा ब्रह्माच्या विचारांतून तयार होत होत्या. ते सगळे अध्यात्मिक उर्जेतून तयार होत होते. पहिला वास्तविक उर्जा तयार झाली. त्यातून असंख्य प्रकारचे कण तयार झाले, त्यांच्या विविध रचनांतून वस्तुमात्र उत्पन्न होत होते. ते कसे तयार व्हावेत त्याचे नियम ब्रह्माच्या प्रज्ञेतून ठरत होते. ब्रह्मकल्पातून अनेक ऋषी उत्पन्न झाले ते त्या रचना तत्त्वाचे व्यवस्थापन करत होते. त्यातून जड वस्तू तयार होत होत्या. हे सगळे किती काळ होत होते ते कोणी सांगू शकत नाही. ते सात मुलभूत ऋषी त्यांच्या विचाराच्या शक्तीने ते साध्य करत होते. निर्माण झालेल्यांच्या व्यवस्थापनासाठी अनेक देवता उत्पन्न होत होत्या त्या त्यांची घालून दिलेली कामं करत होत्या ज्यामुळे एक व्यवस्था उभी होत होती. त्यातून हलणारे व न हलणारे असे सगळे तयार होत होते. त्यांच्यात विविध बदल होत होते ज्यातून मृत्यूची संकल्पना निश्चित झाली. संपर्कासाठी ब्रह्माने वाणी निर्माण केली. त्यात परा वाणी प्रथम होती व ती सगळ्या चराचरांच्या परस्पर संपर्कासाठी काम करत होती. त्यानंतर त्याहून स्थूल वाणी जसे पश्वंती, मध्यमा आणि वैखरी कार्यरत झाल्या. त्या ब्रह्मकल्पाच्या काळात

ते ऋषी फक्त वायूचे सेवन करत होते. त्याला प्राण म्हणतात. त्या कल्पाच्या शेवटच्या काळात वेद सांगितले गेले. ज्यांत ह्या सृष्टीच्या व्यवस्थापनेत कार्यरत असलेल्या देवतांच्या संपर्काच्या (आगम विद्या, म्हणून वेद समजण्यासाठी आगम विद्या माहीत असणे आवश्यक असते.) सुचना दिल्या आहेत. त्यांच्यामुळें मनुष्य त्यांच्या मदतीने त्या देवतांशी संपर्क करू शकत होता. म्हणून वेद हे सर्वात श्रेष्ठ ज्ञान समजले जाते. आगम विद्येमुळे कर्मकांड पुढे प्रचारात आले. पंचमहाभूत (पृथ्वी, आकाश, वायू, अग्नी आणि पाणी) कार्यरत झाल्यानंतर जो अंधार होता तो गेला व त्याची जागा प्रकाशाने घेतली, सगळे दिसू लागले कारण त्याच सुमारास ब्रह्माने सगळ्या प्राण्यांना दृष्टी बहाल केली होती. प्रथम वाणी व त्यानंतर दृष्टी प्राप्त झाल्याने सृष्टीतील विविध गोष्टींशी संपर्क करणे प्राण्यांना शक्य झाले होते ज्यामुळे वेद (ज्ञान) सांगितले जाऊ शकत होते. वास्तविक उर्जेमुळे गति, उष्णता, ध्वनी, गुरूत्वाकर्षण, प्रकाश आणि विद्यूत उत्पन्न झाली ज्यामुळे आकाशातील वस्तू हलू लागल्या. पंचमहाभूत त्यांचे व्यवहार सामान्यपणे करू लागले. त्यातून अनेक ग्रह गोल तयार झाले. त्यांना ते निर्माण होतांना जी गति मिळाली त्यामुळे ते वेगांने फिरू लागले. त्यात जे असंख्य गोल कार्यरत होते त्यात आपली पृथ्वी मुख्य आहे कारण तिच्यावर सगळे केंद्रीभूत झाले होते ब्रह्माच्या इच्छेनुसार. तेथे रुची, गंध आणि स्पर्श हे ज्ञानाचे मार्ग उपलब्ध झाले माणसाला व इतर प्राण्यांना ज्यांमुळे ते त्यांचे जीवन स्वस्थपणे व्यतित करू शकत होते".

मोक्ष धर्म पर्व भाग दहावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग अकरावा

भारद्वाज पुढे विचारतात, "मला सांगा अहो भृगू, जेव्हां ब्रह्माने प्राणी (चर) आणि वनस्पती (अचर) जीव उत्पन्न केले, त्याच्या आधी तयार झालेल्या पंचमहाभूतांना सर्वात जास्त महत्व कां दिले आहे"?

भृगू सांगतात, "कारण उघड आहे कीं, त्यांच्या शिवाय ते चराचर उत्पन्न होऊ शकले नसते. सगळे चराचर ह्या पंचमहाभूतांच्या पासून तयार झाले आहेत. प्रत्येक चराचरात ते असतात म्हणून त्यांना महाभूत (मोठे किंवा महत्वाचे) प्राणी (भूत) असे समजले जाते.

प्राण्यांची ज्ञानेंद्रिये त्यांच्या मदतीने त्यांची कामं करत असतात. कानांमुळे ध्वनि (आकाश) समजतो, नांकामुळे गंध समजतो जो पृथ्वीचा गुण आहे. स्पर्शामुळे पाणी आणि वायू समजतात, डोळ्यामुळें प्रकाश (अग्नी) समजतो".

भारद्वाज पुढे विचारतात, "चरांत ते व्यक्त होतात हे समजले परंतु, अचरांत (वनस्पती) ते सगळे व्यक्त होत नाहीत, जसे वनस्पतींत अग्नी आढळत नाही, त्यांत गति आढळत नाही. त्यांना दृष्टी नसते, त्यांत गति नसते. त्यामुळें त्या चरांच्या इतक्या संपूर्ण कां नसतात, ते समजावून द्या. त्यांच्यात असलेले ते पांच व्यक्त होत नसल्यामुळे त्या सजीव नसाव्यात असा अज्ञानी लोकांचा समज होत असतो".

भृगू त्याला सांगतात, तुझा प्रश्न रास्त आहे पण तो तुझ्या अज्ञानामुळें झाला आहे. माणसाच्या आकलन क्षमतेच्या मर्यादांमुळे असे प्रश्न तू विचारत आहेस. आपल्या आकलन क्षमतेच्या मर्यादां जर तू ओलांडू शकलास तर तुला त्यांत असलेले अग्नी, ध्वनि, आकाश, वायू आणि पृथ्वी कसे काम करत असतात ते लक्षात येईल. ते लक्षात येण्यासाठी तुला जास्त सुक्ष्म दृष्टी वापरावी लागेल. वनस्पती वाढतात त्यात गति व्यक्त होते, त्यांना पाने व फुलं येतात त्यातून त्याची उर्जा (अग्नी) व्यक्त होत असते. त्याना किटकांची बाधा होते (त्यांना व्याधी होतात) त्यातून त्यांचे सजीव असणे समजू शकते. जे निर्जीव असते त्यांना कधी रोग बाधा होत नाही. त्यांतून त्यांचे सजीवत्व सिद्ध होते. त्यांच्या स्पर्शज्ञानात व आपल्या चरांच्या (सजीवांच्या) सुक्ष्म फरक असतो हे खरे व त्यामुळे अज्ञानी माणसे त्या

सजीव नाहीत असे समजतात. वनस्पती मरतात हे तू जाणतोस त्याचा अर्थ त्या त्याआधी सजीव होत्या हे सिद्ध होते. वेल वाढतांना त्यांच्यासाठी आधार शोधत असतात ते त्यांच्या स्पर्श आणि दृष्टी आकलनाने त्या करत असतात, आपल्याला त्या समजत नाहीत म्हणून त्यांच्यात त्या नाहीत असे समजणे मूर्खपणाचे ठरेल. वाढणे हे सजीवतेचे एक प्रमुख लक्षण असते त्यावरून वनस्पती सजीव असतात म्हणून त्यांना अचर (न हलणारे जीव) असें म्हणतात. दगड माती ह्यांना अचर म्हणत नाहीत कारण ते निर्जीव असतात. असे मान्य झाले आहे की, चांगल्या संगीताच्या वातावरणात झाडं चांगली वाढतात. पवित्र सुगंधाच्या प्रभावात वेली चांगली फुलं देतात हेसुद्धा मान्य झाले आहे त्यातूनच वृक्षवेदाची निर्मिती झाली आहे. त्या व्यवस्थापनेने मनुष्य कृषी साधना करत असतात हे तू जाणतोस. वनस्पतीला पाणी लागते, त्यांना खत द्यावी लागतात ज्यांतून त्या त्यांचे पोषण घेत असतात. ही सगळी त्यांच्या सजीव असण्याचीच लक्षणं आहेत. दगड तोडला तर तो तसांच रहातो पण वृक्षाची छाटणी केली तर थोड्याच काळात तो पुन्हा वाढून पुर्ववत झालेला दिसतो ही सगळी त्यांच्या सजीवतेची लक्षणं असतात म्हणून त्यांचा उल्लेख अचर (न हलणारे सजीव) म्हणून केला आहे. ह्यावरून त्यांत पंचमहाभूत कार्यरत असतात हे सिद्ध होते. त्यांची कार्यपद्धती चरांपेक्षा भिन्न असते एवढेच. आता चराच्या कार्यपद्धतीचे पाहू. तसेंच त्यांतील होणार्या बदलातून ते चैतन्यमय आहेत हे सिद्ध होते. म्हणजे त्यांच्या प्रत्येक पेशींत एक स्वतंत्र चैतन्य देणारा आत्मा आहे हे समजते. त्यांची अभिव्यक्ती भिन्न प्रकारची आहे म्हणून ते निर्जीव आहेत असे समजणे अज्ञानीपणाचे लक्षण समजले पाहिजे. चर एका जागेतून दुसर्या जागी जाऊ शकतात म्हणून त्यांना चर (हलणारे जीव) असें म्हणतात. त्वचेमुळे त्याला स्पर्शज्ञान होते, मांस, चरबी, रक्त त्यांना वाहणार्या नसा, ज्ञानतंतू, हाडं असे वेगवेगळे भाग त्यांना विविध प्रकारे मदत करत असतात. त्यांच्यामुळें ते चर प्राणी हालचाली करू शकतात. त्यांच्यामध्ये वायूचे भ्रमण विशेष प्रकारे होत असते त्यात विविध तर्हा असतात. त्यांचे अन्न पचवणे उदरात होते तेथे जठराग्नी कार्यरत असतो. त्याशिवाय त्यांच्या शरीरात अनेक असे भाग असतात ज्यांमुळे हालचाली करणे शक्य होते. त्यांना पाय असतात ज्यांमुळें ते एका जागेवरून दुसर्या जागी जातात. त्यातील कांहीं शरीराने उष्ण असतात व कांहीं नसतात. त्याना सूर्याची उष्णता कामी येते. त्यांच्या

घडण्यात आणि रचनेत पंचमहाभूत असतात. खाणे पचवण्यासाठी व जगण्यासाठी त्याना वायू लागतो. तो पाच प्रकारचा असतो. प्राण ह्या प्रकारचा वायू जीवंत रहाण्यासाठी असतो, व्यान प्रकारचा वायू त्यास शक्ती देतो ज्यामुळे तो खर्या अर्थाने चर होतो. अपान वायूमुळे अन्न पचत असते. समान वायू त्याच्या हृदयाच्या स्पंदनाचे काम करतो. उदान वायूमुळे तो बोलू शकतो. असें पांच वायू चराचे वैशिष्ट्य असतात. हे पांच वायू असणे हे चराचे लक्षण समजले जाते. पाणी ह्या महाभूतामुळे त्याला खाता येते व खाद्याच्या रुची समजतात. अग्नी तत्त्वामुळे तो पाहू शकतो व पचन करू शकतो. पृथ्वीमुळे त्याला गंध समजतात, स्पर्श समजतात, आकाशामुळे ध्वनि समजतो. अशी सगळी चरांची लक्षणं असतात. गंधात अनेक प्रकार असतात. कांहीं मधूर असतात, कांहीं तीव्र दर्प असतात, कांहीं घाण असतात. त्या गंधामुळें त्या गोष्टी त्या चरासाठी योग्य कां अयोग्य ते तो समजू शकतो. गंध हे पृथ्वीतत्त्वाचे एक प्रमुख लक्षण आहे. आता रुचीचे महत्व काय ते सांगतो. त्याची माहिती ईशीस ऋषीने सांगितली आहे. त्या अशा आहेत, गोड, कडू, तुरट, आंबट, खारट, तिखट अशा सहा खाद्य पदार्थांच्या आहेत. त्याशिवाय बेचव हा आणखीन एक प्रकार असतो त्या पदार्थांना जे खाद्य नसतात. रुचीचा संबंध पाणी तत्त्वाशी असतो. प्रकाश अनेक असतात. त्यात दोन प्रकार मुख्य आहेत, एक दिसणारा व दुसरा न दिसणारा असे आहेत, दिसणार्याचे सात प्रकार आहेत व न दिसणार्याचे चार आहेत. दिसणारे आहेत, तांबडा, नारींगी, पिवळा, हिरवा, नीळा, पारवा आणि जांभळा असे ते सात असतात. न दिसणार्यात अतिनील, अतिरक्त, उष्णता आणि आकाश लहरी (रेडीओ लहरी) असें आहेत. ते सगळे ईशीस ने सांगितले आहेत. आकारांचे अनेक प्रकार आहेत, त्यात उंच, छोटे, लांबट, चौकोनी, गोल, वेडेवाकडे असें आहेत. स्पर्श चार आहेत, उबदार, थंड, गरम, फार थंड, असहय्य, चटका असें ते आहेत. आकाश व वायू ह्यांची लक्षणं ध्वनि मुळे समजतात. त्यात सात प्रकारचे कंप असतात. ते असें, शड्ज, ऋषभ, गांधार, मलिध्याम, पंक्लीयम, धैवत आणि निशाद. जे ध्वनि आपण ऐकतो ते सगळे ह्या सात प्रकारात येतात. अगदी ढगांचा गडगडाट सुद्धा त्यात येतो. ध्वनि हवेच्या कंपातून उत्पन्न होत असतो. त्यानंतर ते कंप चौफेर रींगणासारखे (तरंग) पसरतात. त्यानंतर तो ध्वनि विविध माध्यामांतून पसरत रहातो. आपले कान ध्वनि पकडण्यासाठी आहेत. म्हणून

कानाचे तत्त्व वायू समजले जाते. अग्नी तत्त्व, जल तत्त्व आणि वायू तत्त्व सर्व पशूंच्या शरीराचे आधार असतात. म्हणून त्याना त्या त्या नांवांने देवता म्हणून ओळखतात. त्या तीन देवता सगळ्या प्राण्याच्या शरीरात असतात. म्हणून त्यांना लोकपाल असें म्हणतात. इतर तीन लोकपाल देवता आहेत त्या इंद्र, यम, वैश्वानर (कुबेर) म्हणून ओळखल्या जातात. अशा त्या सहा देवतांच्या माध्यमातून सगळ्या चराचरांवर ब्रह्मा लक्ष ठेवून असतो.

मोक्ष धर्म पर्व भाग अकरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग बारावा

भारद्वाज पुढे विचारतात, "जठराग्नी कसा तयार होतो ते मला सांगा. तो का व कसा शरीरात रहातो, वायू कसा शरीरात काम करतो, शरीरातून तो कसा बाहेर पडतो"?

भृगू सांगतात, "मी तुला सांगतो वायू कसा त्याचे कार्य शरीरात करत असतो. वायूमुळे आपले शरीर कार्यरत असते. शरीरातील विविध हालचाली वायूमुळें काम करत असतात. ते सगळे डोक्यात असलेल्या मेंदूच्या सुचनानुसार होत असते. शरीराची उष्णता मेंदूच्या सुचनानुसार नियंत्रित होत असते. प्राण हा वायूसुद्धा मेंदूच्या सुचनेनुसार काम करत असतो. तो पहिला वायू आहे ज्यामुळे आपण व इतर प्राणी जीवंत असतात. त्याच्या शरीरातून होणार्या हालचालींमुळे प्राणी त्यांचे जैविक व्यवहार करत असतात. म्हणून त्याला प्राण असें म्हणतात. वातावरणातील वायू श्वासोंश्वासामुळें शरीरात शिरतो व त्याचे प्राणवायूत रुपांतर होते. तो रक्तात जिरतो व त्या माध्यमाने तो सबंध शरीरात संचार करू लागतो. त्याच्यामुळें इतर वायूंचे प्रकार शरीरात निर्माण होतात. प्राण्याचे मन व बुद्धी प्राणवायूमुळे व्यवस्थितपणे काम करत असतात. शरीरातील सर्वच क्रिया प्राणवायूमुळें काम करू शकतात. प्राणवायूचे कार्य पूर्ण झाल्यावर त्याचे समान नांवाच्या वायूत रुपांतर होते. ते होत असतांना शरीरातील अवयव त्यांची ठरलेली कामं करत असतात. प्राणवायूचे उदरात अपान वायूमध्ये रुपांतर होत असते. तो खाद्य जे प्राण्याने खाल्ले आहे ते पचवण्याच्या कामात मदत करतो. त्याचा संचार प्राण्याच्या आतड्यांत असतो. त्यामुळें शरीरात जीवाला आवश्यक ती उष्णता उत्पन्न होत असते. त्याच्या दाबामुळें खाद्य पचत असतांना आतड्यांतून पुढे सरकत असते. अशारितीने काम करणार्या वायूला उदान असे एक समाईक नांव शास्त्रात दिले आहे. त्याशिवाय शरीराच्या विविध हाडांच्या जोडांचे कार्य सुकर करणारा वायू असतो त्याला व्यान असें म्हणतात. जेव्हां त्याचे व्यवहार बिघडतात तेव्हां प्राण्याला सांधेदुखी सारख्या व्याधी होत असतात. शरीरात उत्पन्न होणारी उब ज्या वायूमुळे होते त्याला समान असे नांव दिले आहे. तोंडापासून गुदद्वारापर्यंत असलेल्या पचन संस्थेतील सगळे व्यवहार तो अपान वायू करत असतो. त्यानंतर तो गुदद्वारातून

आतड्यातील सगळे अशुद्ध द्रव्यं घेऊन बाहेर पडतो. अशारितीने संपूर्ण शरीरात संचार करणारा प्राणवायू अखेरीस पुन्हा मेंदूकडे जातो. आतड्यात शरीराच्या पोषणाची सर्व कामं होत असतात. अशारितीने प्राणवायूची विविध रुप शरीरात त्यांचा संचार होत असतांना दिसून येतात जी त्यांच्या कार्याप्रमाणे असतात. रक्ताचे अभिसरण सुद्धा त्या प्राणवायूमुळे होत असते. म्हणून प्राणवायू सगळ्या वायूत श्रेष्ठ समजला जातो. योगी त्या प्राणवायूचे नियंत्रण करून शरीराचे व्यवहार सुव्यवस्थित करत असतात. चरांच्या शरीरात अशारितीने प्राण वायू काम करत असतो. त्याच्या शरीरात होणार्या विविध क्रियांमुळें शरीरात उब तयार होत असते म्हणून बहुधा चर जीवांची शरीरं उबदार असतात.

मोक्ष धर्म पर्व भाग बारावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग तेरावा

भरद्वाज पुढे विचारतात, "जर हवा आपल्याला जीवंत ठेवत असेल, जर हवा आपल्यात हालचाली करण्याची क्षमता आणत असेल, जर हवेमुळे आपण बोलू शकत असलो, तर माझ्या मते आपवे जीवन निरर्थक आहे. जर प्राणी हवेच्या मदतीने त्यांचे खाद्य पचवत असतील, तर त्या जीवनात कांहीं अर्थ मला दिसत नाही. जर प्राणी मेला तर त्यातील फक्त हवा निघून जाते असे असेल तर आपण केवळ एक हवा आहोत, दुसरे कांहीं नाही. अशी हवा शरीरातून गेली म्हणजे बाहेरील हवेच्या (वातावरणातील हवेच्या) साठ्यात आपण जाऊन मिसळत आहोत. असे होत असेल तर त्याचा अर्थ मेल्यावर आपले स्वतंत्र अस्तित्व संपुष्टात आले असे समजले पाहिजे. जर जीव म्हणजे केवळ एक हवेचा प्रकार असे असेल तर इतर शरीराच्या भागांना कांहींच महत्व उरत नाही. तसेंच जर आपण श्वास रोकला तर त्यामुळे जीव अडवला गेला असे होईल. पांच तत्त्वांपैकी एक जरी गेला तरी इतर तत्त्व निकामी होतात असा त्याचा अर्थ होतो. जर ती पांच तत्त्व अशारितीने विभक्त झाली तर जीव कोठे जातो? त्याचे काय होते? तो त्यानंतर काय करतो? त्याला ऐकावयाला येते कां? त्याला बोलता येते कां? असे सांगतात की, ब्राह्मणाला दान केलेली गाय माझे मरणानंतर संरक्षण करते असे सांगतात त्यात कांहीं तथ्य मला दिसत नाही. कारण जी गाय दान केली ती स्वतः मारली जाते कारण ब्राह्मण तिला मारून खातात. मग अशी मेलेली गाय माझे कसे संरक्षण कराणार? अशा परिस्थितीत त्या मेलेल्या गाईला कोण संरक्षण देतो? दान देणारा, घेणारा व दिलेले दान (गाय) असे सगळेच जर यथावकाश मरणार असतील तर हे सगळे कसे शक्य होईल ते मला समजत नाही. मेलेले पुन्हा परत येतात कां? जर प्राण्याला दुसर्या प्राण्याने खाल्ले अथवा तो इतर कारणाने मेला तर ते पुन्हा दुसरा अवतार घेतात कां? असे समजतात कीं, ही सृष्टी एका बिजातून उद्भवली आहे मग त्या बिजाचे काय होणार, जर ते सगळे यथावकाश मरणार असतील"?

मोक्ष धर्म पर्व भाग तेरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग चौदावा

भृगू सांगतात, "हे कसे होते ते सांगतो तू नीट ऐक, मनसा ऋषी जसा अव्यक्त आहे पण त्याचे व्यक्त रुप आहे ब्रह्मा तसेच ते असते. आत्मा मनसाचेच एक रुप आहे. फक्त ते अंशात्मक असते. त्याला शरीराचे माध्यम मिळालेले असते एवढेंच. जो आत्मा कधींच नष्ट होऊ शकत नाही, फक्त तो वेगळे रुप धारण करत असतो. तो देह टाकून नवीन देह घेत असतो त्याचा पंचमहाभूतांशी कांहीं संबंध नसतो".

भारद्वाज पुढे विचारतात, "जसे इंधन संपले कीं, अग्नी विझतो तसे झाले म्हणजे तो अग्नी नष्ट झाला असे स्पष्ट होते तरी तुम्ही म्हणता कीं, आत्मा नष्ट होत नाही जरी देहातील अग्नी नष्ट झाला हे कसे काय शक्य आहे"?

भृगू बोलतात, "ते खरे आहे कीं, इंधन संपले कीं, अग्नी विझतो व तो दिसेनासा होतो. त्यामुळे तो वास्तविक अग्नी रहात नाही. त्याप्रमाणे आत्मा प्राणवायू संपल्या नंतर देह सोडतो हे खरे आहे. शरीराची उष्णता हे केवळ त्याचे एक लक्षण असते तो स्वतः नसतो. त्या लक्षणाचे इतके महत्व नसते कीं, त्यावर तू जास्त विचार करावास. लक्षणं म्हणजे ती गोष्ट नव्हे".

भारद्वाज पुढे विचारतात, "ती लक्षणं जसे आकाश, पृथ्वी आणि पाणी सगळ्या प्राण्यात आणि वनस्पतीत असतात. त्यामुळे त्यातील आत्मा सिद्ध होत नाही. मला आत्म्याचे निश्चित लक्षण कोणते ते सांगा. असे काय आहे ज्यामुळें चराचरात चैतन्य निर्माण होते व तो आत्मा गेला कीं, ते चैतन्य नाहीसे होते. केवळ ती पांच तत्त्वं असण्याने ते चैतन्य त्यात येत नाही. मेलेल्या प्राण्यात सुद्धा ती पांच असतात एक अग्नी सोडून, ह्या अग्नीचे व आत्म्याचे काय नाते आहे ते मला सांगा. जो अग्नी कोळशाच्या जळण्याने उत्पन्न होणार्या अग्नीपेक्षा वेगळा असतो. तरी त्याला प्राणवायू आवश्यक असतो हे कशाचे कारण असते ते सांगा. ज्यामुळे तो प्राणी ऐकू शकतो, बोलू शकतो, चालू शकतो अशी विविध कामं करतो जी त्याच्या चैतन्याची लक्षणं म्हणून आपण समजतो तो आत्मा कोण आहे ते सांगा. प्राण्याला वेदना होतात त्या शरीराच्या माध्यमाने होत असतात. त्याला आनंद होतो

तोसुद्धा शरीराच्या माध्यमाने होत असतो परंतु, मेल्यावर ते सगळे थांबते जरी तो देह तेथे असतो. त्या चैतन्यहीन देहाला वेदना अथवा आनंद होत नाही हा फरक कसा होतो, त्याला जबाबदार कोण ते मला सांगा. अहो महाऋषी मला सांगा, जेव्हां मन दुसरीकडे असते, आपण कित्येक गोष्टी आपल्या समक्ष घडत असताना त्यांची दखल घेत नाही. म्हणजे त्या गोष्टी घडूनही त्या न घडल्या सारखे असते आपल्यासाठी. तसेंच जेव्हां मनुष्य झोपलेला असतो तेव्हां त्याला कांहीं दिसत नाही अथवा ऐकू सुद्धा येत नाही. त्याची ज्ञानेंद्रियें तेव्हां कार्यक्षम कां नसतात? आपल्याला आनंद होतो अथवा दुःख होते ते कोणाला होते ते समजत नाही कारण, त्या गोष्टी शरीराच्या असतात कां आणखीन कशाच्या असतात ते सांगा"? आपल्याला इच्छा होते म्हणजे कोणाला इच्छा होते ते सांगा. जसे मी जास्त विचार करतो माझा आणखीनच गोंधळ होत आहे. आपल्याला एकादी गोष्ट आवडते अथवा आवडत नाही म्हणजे ते कोणाला होत असते. आपल्याला दोन मन असतात असे आढळते कारण आपल्या मनात दोन परस्पर विरोधी विचार येत असतात. आपण बोलतो, विचार करतो म्हणजे कोण ते करतो ते मला स्पष्टपणे समजावून द्या".

भृगू बोलतात, "मन हे विचारांचे एक स्वरुप असते. त्याप्रमाणे बुद्धिसुद्धा विचाराचे एक स्वरुप असते. त्यांची सुद्धा उत्पत्ती पंचमहाभूतांतूनच होत असते. कारण ते (मन व बुद्धि) शरीराचे भाग असतात आणि त्यांचे विचार अर्थातच शरीराचेच असतात. परंतु, ते ज्या व्यवस्थेत असतात त्या व्यवस्थेला जीव असे म्हणतात. म्हणून जीव हा शरीराचा भाग असतो व जेव्हां शरीर मरते तेव्हां जीवसुद्धा मरतो (कार्यहीन होतो). शरीराच्या सगळ्या ज्ञानेंद्रियांवर आणि कर्मेंद्रियांवर जीवाचा ताबा असतो. जीव शरीराची कार्यकारी व्यवस्था असते. परंतु, तो मी नसतो, म्हणजे मी कोणीतरी वेगळा आहे. तो मी म्हणजे आत्मा जो मनसाचा अंश असतो, त्या मनसाकडे अध्यामिक उर्जा असते. मनसा हा अध्यात्मिक उर्जेचा स्रोत आहे. त्या उर्जेमुळें शरीरात ते चैतन्य उत्पन्न होते ज्यामुळे ते शरीर जीवंत असते. जेव्हां आत्मा शरीराला सोडतो तेव्हां शरीराला अध्यात्मिक उर्जेचा आधार उरत नाही. त्यामुळें ते चैतन्यहीन होते म्हणजे मरते. त्याबरोबर त्यातील जीवसुद्धा निष्क्रिय होतो. जीवाला त्या सगळ्या इच्छा होतात ज्यांचा मोह आत्म्याला असतो. कारण जीव व

त्याचे शरीर आत्म्याच्या इच्छापूर्तीसाठी असते. जर आत्मा नसेल तर त्यांत कांहीं अर्थ उरत नाही. ह्याचा अर्थ शरीर, त्याचा जीव आणि आत्मा हे तीन प्राण्याच्या जीवाचे प्रमुख भाग असतात. आत्मा जेव्हां शरीरात असतो तेव्हां त्याला क्षेत्रज्ञ असे म्हणतात. त्यात क्षेत्र म्हणजे शरीर व जीव एकत्र असे असते. त्या क्षेत्राचा मुख्य म्हणून असें नांव ऋषींनी त्या अवस्थेतील आत्म्याला दिले आहे. जसा आत्मा त्या शरीराच्या बंधनातून मुक्त होतो तो परमात्मा समजला जातो जे मनसाचे दुसरे नांव आहे. म्हणजे क्षेत्रज्ञाचे परमात्म्यात रुपांतर होत असते. शरीराच्या बंधनात असलेला आत्मा अर्थात क्षेत्रज्ञ, अंधार (अज्ञान), मोह आणि चांगुलपणा अथवा वाईटपणा ह्याने धरलेला असतो. जीव आणि आत्मा हे वेगळे असतात कारण जीवाचा संबंध त्या शरीराशी असतो व तो त्या शरीराबरोबर येतो व त्या बरोबर नष्ट होतो. तसे आत्म्याचे नसते. आत्मा त्या शरीराचा आधार असतो व ते शरीर आणि जीव त्या आत्म्याकडून मिळणार्या अध्यात्मिक उर्जेने उत्तेजित होत असतात. एका अर्थी आत्मा त्या शरीराचा व जीवाचा मालक असतो. कांही ऋषी सांगतात कीं, शरीर रथासारखे असते त्याचा चालक असतो जीव आणि आत्मा त्यातून प्रवास करणारा प्रवासी आहे. ह्या रुपकांने त्या तिघांचे परस्पर संबंध जास्त चांगले समजता येतात. ज्यांना समज नसतो त्यांना ते संबंध समजत नाहीत व ते जीव आणि आत्मा ह्यांत गोंधळ करतात. जीव शरीराच्या विविध कामांतून व्यक्त होत असतो परंतु, आत्मा त्या सगळ्यांपाठी असूनही अव्यक्तच तठस्थ रहातो कारण, तो त्या नेहमी अव्यक्त रहाणार्या मनसा ऋषीचा अंश असतो. तरी साधक तपस्येच्या (ध्यानधारणा) मदतीने त्याचे अस्तित्व जाणू शकतो. तपस्या योग जीव करत असतो व त्या योगे तो आत्म्याचे अस्तित्व जाणत असतो. त्या कामात त्या जीवाला त्याचे शरीर मदत करत असते. तशा ध्यानधारणेने तू तुझा आत्मा समजू शकतोस. त्याने तुझे त्याबद्दलचे अज्ञान संपुष्टात येईल. त्याकरता तुला सात्त्विक प्रवृत्तीचे व्हावे लागेल. त्यानंतर तुला ह्या सृष्टीच्या उत्पत्तीचे रहस्य समजता येईल. कारण तू तुझ्यातील मनसाचे दर्शन घेत असशिल".

मोक्ष धर्म पर्व भाग चौदावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग पंधरावा

भृगू पुढे सांगतात, ब्रह्माने सुरूवातीला कांहीं ब्रह्माचे अंश उत्पन्न केले त्यांना ऋषी म्हणून ओळखतात. जे विचारातून तयार झाले होते म्हणून ते मानसाप्रमाणे अव्यक्त होते. ते पूर्णज्ञानी व तेजस्वी होते. त्यांना प्रजापति असें म्हणातात. त्यांतून त्याने सत्य, कर्तव्य आणि तपस्या हे मुलभूत गुण निर्मिले. त्यानंतर वेदांची निर्मिती झाली. सगळ्या पुण्यकारक लक्षणांची निश्चिति झाली. ज्या कारणाने अध्यात्मिक उर्जा वृद्धीगत होईल ते सगळे पुण्यकारक ठरले व ज्यामुळे ती कमी होते ते पापकारक ठरले. त्यानंतर सकारात्मक शक्तींसाठी (पुण्यकारक) देवता, गंधर्व, अप्सरा आणि यक्षा प्रमाणे नारात्मक शक्तींसाठी (पापकारक) दैत्य, दानव, असुर, राक्षस अशा शक्तींची निर्मिती झाली. त्यानंतर त्याखालील शक्ती जशा पिशाच्च, नागदेवता, वास्तुदेवता, ब्रह्मराक्षस वगैरे असे उत्पन्न झाले. त्यानंतर माणसांची चार वर्णानुसार व्यवस्था करण्यात आली. ब्राह्मण जे उच्च दर्जाची विवेकशक्ती धारण करून होते, त्यापेक्षा कमी ते क्षत्रिय व त्यापेक्षा कमी ते वैश्य आणि त्याहून कमी ते शद्र असे मनुष्य उत्पन्न झाले. ते विवेक शक्तीच्या कमी जास्त पणावरून निश्चित झाले. मानवांत ब्राह्मण गौरवर्णी, क्षत्रिय रक्तवर्णी, वैश्य पितवर्णी आणि शुद्र कृष्णवर्णी असे निर्माण झाले.

ते ऐकल्यावर भारद्वाज पुढे विचारतात, "मनुष्याचे चार वर्णानुसार रंगाने विभाजन केले परंतु, त्यांच्यात वर्णसंकर झाल्यानंतर त्यांचे ते रंगाने केलेले वर्गीकरण व्यर्थ झाले आहे. वासना, क्रोध, भय, मोह, दुःख, चिंता, भूक, कष्ट, जे त्या सगळ्या माणसांत होते त्यामुळें त्या चार वर्णांचे मिश्रण झाले असणार. त्यामुळे बाह्य गुणानी त्यांची लक्षणं सिद्ध होणे दुरापास्त झाले आहे. सगळे अनेक प्रकारचे द्रव्य उत्सर्जन करतात जसे, घाम, मुत्र, विष्ठा, ओकारी, पित्त, शेंबूड आणि रक्त. ते सगळ्या चारही वर्णाचे करत असल्याने त्यावरून त्यांची लक्षणं सांगणे शक्य नाही. त्या चराचरांची संख्या अगणित आहे. असे असतांना त्यांचे वर्गीकरण कसे केले गेले"?

भृगू त्यावर बोलतात, "सुरूवातीला फक्त ब्राह्मण होते त्यांच्यात भेद होत गेले त्यांच्या कर्तृत्वामुळें व त्यातून इतर तीन वर्ण उत्पन्न झाले आहेत. मुलतः सगळे ब्राह्मण आहेत. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर ह्या सहा दोषांच्या विविध प्रमाणात होणार्या प्रभावामुळे सत्त्व, रजस आणि तमस असे आणखीन तीन वर्गीकरणाचे प्रकार पुढे आले. त्यानुसार चार वर्णाच्या लोकांच्ये स्वभाव गुण तयार झाले. जे सत्त्व गुणी होते त्यांतून ब्राह्मण वर्णाची लक्षणं ठरत गेली. लोभ आणि मोह क्षत्रियांचे गुण दोष ठरले. जे ब्राह्मण त्यांच्या सात्त्विक गुणापासून ढळले ते क्षत्रिय समजले गेले. ते त्याप्रमाणे त्याचे जीवन जगू लागले. त्यांना रजोगुणी ठरवले गेले ज्यामध्ये लोभ आणि मोह विशेष होते. त्यांच गुणाच्या इतर कांहींना वैश्य ठरवले गेले. त्यांचे कर्तृत्व विशेष लक्षणं होते. दोघे समाजाच्या समृद्धीसाठी समसमान कार्य करत होते. त्याहूनही कमी प्रतीचे जे ब्राह्मण होते त्यांना इतरांची मदत करण्याचे काम सोपवले गेले जे त्यांच्या स्वयंबुद्धीने कोणतेही निर्णय घेऊ शकत नव्हते. त्याच्यात आत्मविश्वासाची कमी होती ते शुद्र समजले गेले. त्यांच्या त्या कमीपणामुळें ते तामस समजले गेले त्यांचा वर्ण कृष्ण ठरवला गेला. हे गुणकर्मशः ठरवले गेले होते व एकाच कुटूंबाचे सदस्य त्या चार प्रकारचे असू शकत होते. परंतु, पुढे त्या व्यवस्थेचा विपर्यास पुरोहित वर्गाच्या ब्राह्मणानी केला आणि जन्मानुसार जाती व्यवस्था रुढ केली. त्यामुळें ब्राह्मणांचा नालायक पुत्रसुद्धा ब्राह्मण म्हणून ते हक्क मागू शकला. कृतयुगात हि व्यवस्था चांगली काम करत होती परंतु, त्रेतायुगात त्यात दोष उत्पन्न झाले व चार वर्ण त्यांच्या ठरवलेल्या पद्धतीने काम करण्याचे बंद होवू लागले. परिस्थिती द्वापार युगात आणखीन बिघडली ज्या युगाला रजोगुणी युग समजले जात होते. म्हणजे रजोगुण त्या युगात प्रधान होता. त्यानंतर कलियुग येणार आहे ज्यात तमोगुण प्रधान असेल. म्हणजे कृत युगात लोक प्राधान्याने सात्त्विक होते, त्रेता युगात प्रामुख्याने सात्त्विक व रजोगुणी असे मिश्र होते तरी सात्त्विकांची संख्या जास्त होती. द्वापार युगात रजोगुणी जास्त व सत्त्वगुणी कमी झाले. पुढे येणार्या कली युगात ब्राह्मण रहाणार नाहीत. फक्त क्षत्रिय, वैश्य आणि प्रामुख्याने शुद्र असतील. त्या युगाला अंधाराचे (ज्ञानाच्या अंधाराचे) युग समजले गेले आहे. कृतयुगात ब्राह्मण तपस्या करत व सृष्टीची अध्यात्मिक उर्जा त्यामुळे वाढवत होती जशी ती तपस्या कमी होत जाईल जगाच्या गुणामध्ये र्हास होऊ

लागेल व खालच्या दर्जाची युगं कार्यरत होतील. अरे ब्राह्मणा, एकाच वेळी जगाच्या निरनिराळ्या भागात कृत, त्रेता, द्वापार आणि कली युग अस्तित्वात असू शकतात व ते त्या देशातील लोकांच्या गुणांवर अवलंबून असेल. आपल्या देशात कृतयुग असावे कां कलीयुग ते त्या देशाचे लोक त्यांचे गुण सुधारून शक्य करू शकतील. म्हणजे माणसासाठी ती चार युग ब्रह्मदेव ठरवत नाही, ते त्या त्या देशाचे लोक ठरवत असतील.

महान ऋषी जे ब्रह्माच्या इच्छेतून उत्पन्न झाले त्यांनी त्यांच्या तपस्येने जी अधिक अध्यात्मिक उर्जा वाढवली त्यातून अनेक लोकोत्तर ऋषी जन्माला घातले जे मनुष्य जातीच्या कल्याणासाठी मार्गदर्शन करत आहेत व पुढे करत असतील तरी ते अव्यक्त होते. त्या वास्तविक विकासाबरोबर मनःशक्तीने आणखीन अव्यक्त (न दिसणारी) प्रगती मनसाच्या कृपेने होत आहे. तो योगशास्त्राचा भाग आहे.

मोक्ष धर्म पर्व भाग पंधरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग सोळावा

भारद्वाज पुढे विचारतात, "ब्राह्मण होण्यासाठी माणसाने काय केले पाहिजे? मनुष्य क्षत्रिय कसा ठरतो? वैश्य व शुद्र कसा ठरतो"? ते समजावून द्या.

भृगू सांगतात, "ब्राह्मण प्रामुख्याने बुद्धीनिष्ठ असतो. तो सात्त्विक असतो. तो वेदांचा अभ्यास करणारा असतो म्हणजे तो ज्ञानपिपासू असतो. त्याला व्रतबंधाने समाजात व्रतस्थ जीवन (वेदांचा अभ्यास करणे, ब्रह्मचर्य पाळणे (सर्व स्त्रियांकडे माता, भगिनी व कन्या ह्या दृष्टीने व्यवहार करणे), सत्त्यनिष्ठ असणे) जगण्यासाठी बांधले जाते. ब्राह्मण अग्नी सांभाळतो, त्यात नियमितपणे संविधा (इंधन) देऊन त्याला सचेतन ठेवत असतो. सकाळी ब्रह्माला (आणि इतर देवतांना) अर्घ्य देऊन त्यांच्या कृपेची अपेक्षा करत पुजा करत असतो. तो समाजात माणूसकी, चांगुलपणा व भूतदया ह्या त्रिसुत्रीने त्याचे व्यवहार करत असतो. समाजात अध्यात्मिक जागृती करण्यासाठी प्रयत्न करतो. तो स्वतः खाण्या आधी विश्वदेवांना शिधा (घास) देतो. जगाचा कारभार सांभाळणार्या सामान्य देवतांना विश्वदेव असें म्हणतात. तो त्याचे जीवन पवित्र राहिल (पापहीन) असें जगतो. त्यामार्गाने तो त्याची अध्यात्मिक उर्जा वृद्धींगत करत असतो. असे जीवन जगणार्याला ब्राह्मण असे म्हणतात.

जो समाजाच्या संरक्षणासाठी जीवावर उदार होऊन लढतो, त्याशिवाय ब्राह्मणासारखे ते व्यवहार करतो आणि न्याय व्यवस्था समाजाच्या उद्धारासाठी सांभाळतो तो क्षत्रिय समजला जातो. जो शेती, गुरं पाळणे, व्यापार असे समाजाची आर्थिक उन्नती करणारे उद्योग करतो व समाजाला व स्वताला समृद्ध करतो तो वैश्य समजला जातो. ज्याला ज्ञानसाधना (ब्राह्मणाचे मुख्य लक्षण) जमत नाही, न्याय व्यवस्था सांभाळण्याची क्षमता नाही तसेंच व्यापार, शेती स्वताच्या नियोजनाने करणे जमत नाही अशा विविध प्रकारच्या निर्णयक्षमता नसलेला, अकार्यक्षम बुद्धीहीन माणसांचा शुद्र म्हणून उल्लेख केला जातो. अशा अकार्यक्षम माणसाचे काम ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य ह्यांना त्यांच्या कामात मदत करण्याचे सांगितले आहे. अशारितीने ते चार वर्णाचे लोक समाज व्यवस्था सक्षम करत असतात. निर्णयक्षमता असलेले पहिले तीन वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य ह्यांना

शिक्षण घेण्याचे बंधन असते. त्यांचा उल्लेख द्विज म्हणून केला जातो. असे असले तरी सगळ्या चारही वर्णाच्या लोकांना त्यांच्या विकासासाठी देवतांना आळवण्याचा हक्क असतो. त्याशिवाय पापात्मे असतात जे पुण्यमार्गाची अवहेलना करतात ते ह्या चारही वर्णात येत नाहीत. म्हणजे जे पुण्य मार्गी आहेत तेंच त्या चार वर्णात येतात. जर कोणी चार वर्णातील त्याचे वर्णाच्या मर्यादा पाळत नसेल तर तो दस्यू (चार वर्णा बाहेरील) समजला जातो. सगळ्या चारही वर्णाच्या लोकांना पाळावयाचे नियम असे असतात, ब्रह्मचर्य, माणूसकी, चांगुलपणा व भूतदया, इष्ट देवतेची पुजा करणे, यज्ञ करणे, अतिथीचा सन्मान करणे, मोक्षमार्गाची साधना करणे, पुण्य मार्गाने जीवन व्यतीत करणे असे आहेत.

जे आपल्या ज्ञानेंद्रियांनी समजते त्यांना व्यक्त गोष्टी समजले जाते. जे ज्ञानेंद्रियांच्या कक्षेत नसते ते समजण्यासाठी (अंध) श्रद्धा, गुरूवरील विश्वास, संकल्पना सामर्थ्य आवश्यक असते. शरीराच्या किमान गरजांव्यतिरीक्त त्याच्या इच्छा वाढणार नाहीत असे त्या चारही वर्णाच्या लोकांना व्रतस्थ रहावयाचे असते.

मोक्ष धर्म पर्व भाग सोळावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग सतरावा

भृगू पुढे सांगतात, जेव्हां आपण सत्य म्हणतो तेव्हां ते ब्रह्माबद्दलचे असते. कारण ते एकमेव सत्य आहे. बाकी सगळे जे आपण अनुभवतो ते मित्थ्या आहे. त्या सत्याच्या आधारावर सगळे मित्थ्या उभे असते. ते मित्थ्या जग मायेच्या प्रभावाखाली काम करत असते. त्याला अज्ञान असें सुद्धा म्हणतात. जे सूज्ञ ते समजून विचार करतात ते त्या मायेच्या प्रभावाने फसत नाहीत. अज्ञानाला अंधार असेसुद्धा म्हणतात. असे सांगतात कीं, जे पुण्य कर्मात आपले जीवन घालवतात ते स्वर्गात जातात मेल्यानंतर व जे पाप कर्मात त्यांचे जीवन घालवतात ते नरकात जातात, परंतु, ह्या सगळ्या कल्पना आहेत प्रत्यक्षात स्वर्ग आणि नरक दोनही अनुभव ह्या पृथ्वीवरच माणसाला घ्यावयाचे असतात त्याच्या पुढच्या जन्मी. चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया हे पुण्याचे मार्ग आहेत व त्या विरुद्ध वर्तणूक पाप कारक समजली जाते म्हणजे त्यामुळे त्याची अध्यात्मिक उर्जा कमी होते. त्याशिवाय अध्यात्मिक साधना म्हणजे ब्रह्मचर्य पाळणे, ध्यानकरणे (ह्यात सोहम साधना, विपाशना, त्राटक करणे असे प्रकार येतात) हे सुद्धा पुण्यकारक असते. त्या अध्यात्मिक साधनेबद्दल घृणा बाळगणे पापकारक असते. अध्यात्मिक साधनेने पुण्य मिळविण्याचा तीव्र मार्ग (पुण्य झपाट्याने वाढते) असतो त्याउलट नितीशास्त्रात दिलेल्या चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ह्या त्रिसुत्रीने पुण्य सावकाशपणे वाढत असते. त्याकरतां जे शहाणे असतात ते त्यासगळ्या गोष्टींचा हव्यास धरत नाहीत ज्यामुळें अंति दुःख किंवा आनंद अशा अवस्थांमध्ये ते अडकतील. आनंद मनाचा आणि शरीराचा असें दोन असतात. वेद सांगतात कीं, खरा आनंद नितीशास्त्रात दिलेल्या त्रिसुत्रीच्या पालनाने प्राप्त होतो तो अध्यात्मिक दृष्ट्या नित्य स्वरुपाचा असतो. इतर सगळे आनंद क्षणभंगूर असतात कारण त्या इतर आनंदा नंतर लागलीच दुःख अनुभवास येत असते अपेक्षाभंगाचे. त्यातून क्रोध, मोह, मद आणि मत्सर असे दोष उभाळून येतात व मनुष्य दुःखात जातो. पुण्य म्हणजेच अध्यात्मिक बळ हे सगळ्या चिरंतन सुखाचे मूळ असते.

भारद्वाज विचारतात, "अहो महाऋषी तुम्ही सांगता कीं, आनंद हे अंतिम उद्दीष्ट असते परंतु, मी पहातो कीं, सगळे ऋषी नेमके त्या विरुद्ध वर्तन करत असतात, ते बहुधा सुख, आनंद ह्यांच्या मागे नसल्याचेच आढळून येते त्याचे कारण काय असावे असें तुम्हाला वाटते"? स्वतः ब्रह्मदेव ब्रह्मचर्य पालन करून सगळ्या त्या (लैंगिक) सुखांपासून दूर असतात. तेंच इतर ऋषीसुद्धा करत असतात. तसेंच महादेव कामदेवाला शिक्षा करतात व त्याचे नियंत्रण करतात त्यामुळे ती सुख रहात नाहीत. त्या त्यांच्या वर्तणुकीमुळे असें वाटते कीं, शरीराची सुख अनुभवण्या विरुद्ध ब्रह्मा व महादेव आहेत. त्याबद्दल मला विशेष सांगा. कारण मला ते पटत नाही. माझ्यामते सुख हे अंतिम असते व त्यासाठी मनुष्य सगळे कांहीं करत असतो. तेंच सोडावयाचे हे मला योग्य वाटत नाही.

भृगू सांगतात, खरे सुख अध्यात्मिक उर्जेच्या वृद्धीने मिळत असते. शरीराची सुखं सापेक्ष असतात. त्या सुखात अज्ञानी माणसें रमणे शहाणपणाचे मानतात. खरे सूज्ञ त्या क्षणभंगूर सुखात रमणे अयोग्य समजतात. कारण शरीराचे सुख त्याच्या कार्यापुरते ठेवणे श्रेयस्कर असते. त्यात जास्त रमण्याने अंतिम दुःखच मिळत असते. शरीराची दुःख बरीच असतात (रोगराई, इतर संकट, अपघात, थंडी, वारा, गरमी इत्यादि) तीसुद्धा माणसाच्या मागे लागतात जर तो शरीराच्या सुखाचा हव्यास धरत असेल. म्हणून शरीराची सुख दुय्यम समजून ती त्या शरीरापुरती ठेवून जो अध्यात्मिक सुखाचा हव्यास धरतो तो अंतिम सुखाचा धनी होत असतो. त्याशिवाय मनाची सुख आणि दुःख आहेत ती वेगळी विचारात घ्यावी लागतील. त्यासगळ्यांचा अध्यात्मिक सुखांशी कांहीं संबंध नसतो. कशाचीच इच्छा नसणे ह्याच्या सारखे सुख नसते ते अध्यात्मिक प्रेरणेने प्राप्त होत असते. असा मनुष्य चिरंतन सुखात असतो. शरीराच्या सुखाचा हव्यास धरणारा ते सुख कधींच प्राप्त करू शकत नाही. शरीराच्या सुखामागे लागणारे, पाप कर्म करण्यास उद्युक्त होत असतात. ज्यामुळें त्यांचा अध्यात्मिक र्हास होत असतो. तो त्यात अडकल्यामुळें पुन्हा पुनः जन्म घेण्याची लालसा बाळगतो व त्यात आणखीन आणखीन अडकत जातो.

मोक्ष धर्म पर्व भाग सतरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग अठरावा

भारद्वाज पुढे विचारतात, "आपले दानाबद्दल काय मत आहे ते सांगा. चांगुलपणा म्हणजे काय? चांगली वर्तणूक अशाला म्हणतात? तपस्या कोणी करावयाची? वेदांचा अभ्यास करण्यासाठी कोणती तयारी असली पाहिजे? अग्नीत अर्घ्य द्यावयाचे कारण काय"?

भृगू सांगतात, "असे समजले जाते कीं, अग्नीत अर्घ्य दिल्याने त्या दिवशीचे केलेले पाप नष्ट होते. वेदाच्या अभ्यासामुळें ज्ञान सुधारते. मनाला शांतता मिळते. दान दिल्याने मनाला आल्हाद प्राप्त होतो. ते दान सत्पात्र असले पाहिजे. दानाबाबत असे समजते कीं, सत्पात्र दान केल्याने दैवते संतुष्ट होतात परंतु, अपात्रास दान केल्याने ह्या जन्मात सुख शांती कदाचित मिळते. दानाच्या प्रकारात आणि प्रमाणावर ते सगळे विसंबून असते. म्हणजे  दान कसेही केले तरी त्यामुळे चांगलेच होत असते. तपस्या केल्याने स्वर्गात प्रवेश मिळतो". पुढे भृगू सांगतात, "कोणाच्याही अज्ञानाचा, गरीबीचा, भोळेपणाचा, कमजोरीचा गैरफायदा न घेणे ह्यालाच **माणूसकी**  असें म्हणतात. *ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो. ह्याच्या विरूद्ध जे वागणे त्याला अमानुषपणा असे म्हणतात.*

मला समाजाने कसे वागवावे असें मला वाटते, तसेंच मी समाजातील लोकाशी वागणे ह्याला **चांगुलपणा** असें म्हणतात. *ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो. ह्याच्या विरुद्ध जे वागणे त्याला वाईटपणा असे म्हणतात.*

सर्व प्राणिमात्रांबद्दल सन्मानाची भावना बाळगून त्या प्रमाणे जगणे आणि सर्व प्राणिमात्रांचा आदर करणे ह्याला **भूतदया** असें म्हणतात. *जे त्या विरुद्ध वागतात ते दुष्ट समजले जातात. हिंदू नितीशास्त्रात ते त्रिसुत्री म्हणून शिकवले जातात. सगळे नितीशास्त्र त्यात सामावलेले आहे.*

जो हे तीन नियम पाळून त्याचे जीवन जगतो तो पुण्यवंत समजला जातो. पुण्य कमावण्याचे हे तीन सोपे मार्ग सांगितले आहेत.

भारद्वाज पुढे विचारतात, "निरनिराळ्या लोकांची कर्तव्ये कोणती सांगितली आहेत ब्रह्माने, किती प्रकारची कर्तव्ये सांगितली आहेत"?

भृगू सांगतात, "शहाण्या लोकांना त्यांने त्यांचे सामाजिक आणि अध्यात्मिक कर्तव्ये योग्य समजून पूर्ण केली तर स्वर्ग प्राप्त होतो असे सांगितले आहे. जे त्यांची कर्तव्ये ते शहाणे असूनही पूर्ण करत नाहीत ते ब्रह्माच्या दृष्टीने मूर्ख ठरतात".
भारद्वाज विचारतात, "ब्रह्माने जी चार कर्तव्ये त्या चार वर्णाच्या लोकांना सांगितली आहेत ती कोणती ते सांगा".
भृगू सांगतात, "प्राचीन काळी, जगाच्या भल्यासाठी व चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया ह्या त्रिसुत्रीच्या प्रचारासाठी चार प्रकारचे जीवन (ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम) सांगितले आहेत. प्रथम ब्रह्मचर्याश्रमाचे पाहू, जे विद्यार्थी (स्नातक) गुरूच्या घरी रहातात ते त्याच्या आज्ञेचे पालन करून तेथे राहून आपले शिक्षण करतील. हे त्या स्नातकांचे कर्तव्य म्हणून सांगितले आहे. त्याची वर्तणूक शुद्ध विचारांची नम्रतापूर्वक आणि शिष्टाचार संपन्न असली पाहिजे. त्यांचे सगळे आचार विचार वेदात दिलेल्या नियमानुसार असतील, ते पवित्र अग्नी सांभाळतील. ते दिवसाचे पांच वेळा प्रार्थना (पहाटेची, सूर्य उगवण्याच्या वेळेची, सकाळची, दुपारची आणि संध्याकाळची (ह्या प्रार्थना इस्लाम मध्ये सांगितल्या आहेत.) करतील. ते संध्याकाळी सूर्य मावळण्याच्या (तिन्हीसांजा) संध्या विधी करतील. हिंच संध्याकाळची प्रार्थना असते. तो ब्रह्मचर्य पाळील त्यासाठी तो सगळ्या स्त्रियांमध्ये माता, भगिनी पाहील. दररोज गांवात फिरून भिक्षा आणिल. ती भिक्षा तो त्याच्या गुरूला विनातक्रार दान करील. त्याबद्दल एक कवन वेदांत आहे ते सांगते कीं, जो वेदाचा अभ्यास गुरूच्या आज्ञेचे पालन करत करील तो स्वर्गात जाईल. अशारितीने त्याने स्नातक व्रत पूर्ण केल्या नंतर तो गृहस्थाश्रमात प्रवेश करण्यासाठी प्रथम त्याच्या घरी (आई वडीलांच्या ठिकाणी) निघून जाईल. तेथे तो योग्य उपवर मुलीशी लग्न करील. त्यानंतर त्याचे दुसरे कर्तव्य ज्याला गृहस्थाश्रम म्हणतात ते स्वीकारेल. त्या मध्ये जी पवित्र कर्तव्ये करावयाची ती सांगतो, तो त्याच्या पत्नीचा आदर करून तिच्या इच्छेचा मान ठेवून त्याचा गृहस्थाश्रम चालविल. पुण्य, धनसंचय आणि सुख अशी त्रिसुत्री ह्या गृहस्थाश्रमात त्यास सांभाळावयाची असते. ते गृहस्थाश्रमाचे प्रमुख लक्षण असते. सज्जन मार्गाने तो त्याचे धन कमावेल. त्याचप्रमाणे तो ते खर्च करील. तो देवतांची पुजा करील त्याचप्रमाणे पितारांची श्राद्ध करील. तो अतिथींचे स्वागत करील.

त्यांची सेवा करून स्वर्गाचा मार्ग सिद्ध करील. पितरांचे ऋण फेडण्यासाठी तो पुत्र जन्माला घालेल. पत्नीच्या इच्छे व्यतिरीक्त तो ब्रह्मचर्य पाळील. भविष्यासाठी तो त्याच्या कुटूंबाच्या हितार्थ योग्य धन संचय करील व भूतांचे ऋण फेडील. त्याच्या मुलांवर योग्य संस्कार करील. ज्यामुळे तो एक सुसंस्कृत परिवार वाढवेल. तिसरे कर्तव्य आहे वानप्रस्थाश्रमाचे. गृहस्थाश्रमाचे कार्य मुलांना मुलं झाली कीं संपत असते. त्या तिसर्या कर्तव्यानुसार तो त्याच्या जीवनसाथी बरोबर (पत्नी बरोबर) वनात जाऊन तेथे असलेल्या ऋषींच्या आश्रमात राहिल. त्याशिवाय उभयता तिर्थयात्रा करतील, त्या काळी तो वेदांचा अभ्यास जीवनाच्या अनुभवाच्या अभ्यासानुसार पुन्हा करू लागेल. कोणालाही दुःख होणार नाही अशी मृदू वाणी त्याची असेल. तो गृहस्थाश्रमातील त्रिसुत्रीचे (पुण्य, धनसंचय आणि सुख) पालन करत असेल जर त्याची पत्नी हयात असेल. जर नसेल तर तो सन्यासाश्रमात प्रवेश करील. त्या त्रिसुत्रीतील सुख भोगतांना त्याच्या मर्यादा, त्याची व्यर्थता ह्याचे तो निरीक्षण करील त्या अनुभवांबद्दल इतर वानप्रस्थींबरोबर संवाद साधेल. (तशा चर्चांतून अरण्यक, उपनिषदं आणि ब्राह्मणं तयार झाली आहेत) जे त्याला संन्यासाश्रमात मोक्षमार्गाच्या उपासनेसाठी उपयोगाचे असते. त्यानंतर तो संन्यासाश्रमात जाईल. तेथे ते सर्वसंग परित्याग करून एकटा राहू लागेल. त्याचे आप्तसुद्धा त्याला भेटणार नाहीत. तो पक्षांप्रमाणे शेतात पडलेले धान्य गोळा करून ते खाऊन त्याची उपजिवीका करू लागेल. तो भिक्षा मागणार ना्ही परतु, कोणी दिले तर ते स्वीकारेल. असे जगणारा स्वर्गात पोहोचतो जेव्हां ते मृत्यू पावतो.

मोक्ष धर्म पर्व भाग अठरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकोणीसावा

भृगू पुढे सांगतात, सन्यासाश्रमात तो तिर्थयात्रा करत असेल. त्यासाठी पवित्र नद्या व पवित्र तिर्थे जेथे मोठे ऋषी रहात असतात त्यांना भेट देईल. त्याशिवाय ध्यान साधना करत असेल. ज्यामुळें त्याची अध्यात्मिक उर्जा वाढत असेल. तो अशा घोर वनांत त्यासाठी राहिल कीं जेथे जंगली पशू वास करतात. जसें हरण, रानबैल, हत्ती, रानडुक्कर, वाघ, सिंह, चित्ता असतील. तेथे नद्या, झरे स्वच्छंदपणे वहात आहेत. मनुष्य वस्ती नसेल. तेथे तो वनस्पती खाऊन जीवंत रहाणार त्यात कंदमुळं, फळ, फुल, पाला असें खात असेल. तो मातीत बसेल व झोपेल, तो दाढी, मिशा कापणार नाही. झाडांच्या सालींचा वस्त्र म्हणून उपयोग करील. तो त्याची नखसुद्धा काढणार नाही. तो जमिनीवर अर्घ्य करून देवतांची आराधना करील ज्यामुळें त्याला त्या देवता मदत करतील मोक्षमार्गासाठी. सर्वकाळ ते अग्नी करण्यासाठी झाडांच्या काटक्या गोळा करत असेल. शक्यतर तो मौन धारण करील. वारा, पाऊस, थंडी व उन्हाळा तो बिनातक्रार सहन करील. त्यामुळे त्याचे शरीर करपून गेलेले असेल पण त्याची तो पर्वा करत नसेल. अशारितीने प्रामाणिकपणे साधना करणार्यांना लोकपाल देवता (इंद्र, वैश्रावण, यम, वरूण, अग्नी आणि वायू) मदत करतात. त्यातील वरुण, अग्नी आणि वायू शरीरातून आणि इंद्र, वैश्रावण आणि यम बाहेरून मदत करतात. अशाप्रकारे तो त्याची साधना विनातक्रार करत असेल. ते साध्य करण्यासाठी मोठी हिम्मत असावी लागतो भारद्वाजा, असें भृगू सांगतात. तशा कठोर तपस्येने तो त्याची सगळी पाप (गेल्या अनेक जन्मांची) धुवून टाकत असतो. त्या कामात त्याला त्याचे शरीर व त्याचा शरीराचा जीव सहाय्यभूत असावा लागतो. नाहीतर तशात तो मरून स्वर्गात जातो.

आता मी सांगतो परिव्राजकांचे बद्दल, ते असे आहे. सर्वसंग परित्याग केल्यानंतर, सगळ्या सुख व दुःखांचा त्याग केलेला, सतत भटकत असतो. त्यांसाठी सोने व दगड सारखेच असतात. त्यांना आनंद होत नाही व दुःखसुद्धा होत नाही. त्यांच्यासाठी कोणी मित्र नसतो व कोणी शत्रू सुद्धा नसतो. ते सर्वथा निरपेक्ष दृष्टीने जगाकडे पहात असतात. ते कोण्या

एका जागी तीन दिवसांपेक्षा जास्त रहात नाहीत, ते देवळांच्या, मोठ्या वृक्षांच्या सावलीत रात्री आराम करतात. जे मिळेल ते खातात व त्यावर गुजराण करत असतात. ते केवळ ब्राह्मणाकडे अतिथी म्हणून जाऊ शकतात. त्यांचा कधी अपमान होत नसल्याने ते त्यांना कशीही वागणूक कोणी दिली तरी ते त्यावर रागवत नाहीत. त्यांना मोह माया नसेल. ते कोणीमुळें घाबरत नाहीत. ते सतत त्यांच्या ध्यानात मग्न असतील. त्यांचा अंतिम उद्देश असेल मोक्ष.

भारद्वाज पुढे विचारतात, "अहो ब्रह्मर्षी, तुम्ही मधून मधून अदृष्य सृष्टीबद्दल सांगता त्याची माहिती मला द्या".

भृगू त्यावर बोलतात, "उत्तरेकडे हिमालयाच्या पलिकडे एक असा प्रदेश आहे, जो पवित्र समजला जातो. त्याला दुसरे जग असे समजतात. तेथे रहाणारे लोक सज्जन (जो नितीशास्त्राच्या नियमानुसार (त्रिसुत्री) प्रमाणे त्याचे वर्तन ठेवतो तो सज्जन) असतात. तो प्रदेश स्वर्गासारखा आहे. तेथील लोकांचा मृत्यू योग्यवेळी येतो व त्या प्रदेशात आजार होत नाही. प्रत्येक पुरूष त्याच्या अर्धांगिनीशी प्रामाणिक असतो. तेथे कोणी पाप करत नाही व कोणी कोणावर संशय घेत नाही ज्यांमुळे कलीचे साम्राज्य तेथे पसरेल. तेथील लोक आनंदमय जीन जगत असतात. तेथील कांहीं मिताहारी असतात. त्यांना विनाकारण (जिभेचे चोचले पुरवण्यासाठी) आहार वाढवत नाहीत. त्या विरुद्ध आपल्या जगातील लोक आधाशा सारखे खात असतात आणि इतरांवर संशय घेत असतात ज्यामुळे कली उत्तेजित होत असतो. त्यामुळें आपल्या येथे आनंद व सुख मर्यादेने प्राप्त होत असते. आपल्या जगात सहा दोष (काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर) माणसाला त्याच्या अतृप्ततेमुळे भेडसावत असतात तसे तेथे नसते. तेथे तपस्या ते लोक सहजपणे करू शकतात जसे येथे करणे सोपे नसते. अनेक प्रकारच्या मोहात येथील माणसें अडकून घेतात तसे तेथील लोक करत नाहीत. त्याचे शरीराच्या गरजांचे नियंत्रण चांगले असते. त्यांत त्यांचा आत्मा गुंतून घेत नाही जसे येथील लोकांचे आत्म्ये करतात. म्हणून ते लोक ब्रह्माला जास्त आवडतात. पृथ्वीचा उत्तरे कडील प्रदेश साधारणपणे स्वाभाविकपणे पावित्र्याकडे झुकणारा असतो. ते स्वाभाविकपणे सज्जन असतात. म्हणून त्या प्रवृत्तीचे

आपल्या येथील लोक पुढच्या जन्मी तेथे जन्म घेतात. जे तसे करत नाहीत ते मात्र पुन्हा पुन्हा येथेच जन्म घेत असतात".
भृगू पुढे बोलतात, "मी तुला माणसाची चार आश्रमातील कर्तव्ये कोणती ते सांगितले आहे. ज्याला नितीशास्त्राची त्रिसुत्री समजली त्याला शहाणा माणूस असें म्हणतात".
एवढे सांगितल्यानंतर भिष्म युधिष्ठीराला बोलतात, "अशा प्रकारे ऋषी भृगू भारद्वजाचे शंका समाधान करतात. ते ऐकल्यावर पूर्ण समाधान झालेले ऋषी भारद्वाज भृगूंची पुजा करतात. मी तुला भृगूच्या तोंडून ह्या जगाच्या व्युत्पत्तिचे रहस्य सांगितले आहे. जे मला समजले आहे. आणखीन काय माहिती तुला माझ्या कडून ऐकावयाची आहे ते सांग".
मोक्ष धर्म पर्व भाग एकोणीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग विसावा

युधिष्ठीर बोलतात, "अहो पितामह, आपण सगळे चांगलेच जाणता, सगळ्या कर्तव्यांचीसुद्धा तुम्हाला माहिती आहे. ते सगळे मला ऐकावयाला फार आवडते. वागणूकी बाबतचे नियम मला समजून घ्यावयाचे आहेत ते सांग".

भिष्म सांगू लागतात, चांगली वागणूक, वाईट (अपमान करण्याची) वागणूक, दुष्टपणाची वागणूक, आततार्इपणाची वागणूक, बेपर्वाईची वागणूक अशा आहेत. त्यातील चांगली वागणूक सोडून इतर प्रकारच्या वागणूकी पापी माणसांच्या असतात. चांगली वागणूक पुण्यवंतांची असते. कांहीं अयोग्य प्रकार सांगतो, रहदारीच्या जागी मुतणे अथवा हगण्यास बसणे हे बेपर्वाईच्या अथवा मूर्खपणाच्या वागणूकीत येते. नैसर्गित विधी उरकल्यानंतर तो त्याचे अंग धुवेल व नंतर हात पाय सुद्धा धूवेल. सगळ्या माणसाने हे करावयाचे असते. सूर्याची पुजा प्रत्येकांनी करावयाची असते. सूर्य उगवल्यानंतर म्हणजे दिवसाच्या प्रहरी आजारी नसलेला अंथरूणावर निजणार नाही. दिवसाच्या सगळ्या प्रार्थना तो नित्यनेमाने करेल. त्यातील सकाळची व संध्याकाळची तो न चुकता करील. सकाळची प्रार्थना पूर्व दिशेकडे तोंड करून व संध्याकाळची पश्चिमेकडे तोंड करून त्या प्रार्थना करील. जेवणा आधी, तो त्याचे पांच इंद्रीय (दोन पात, दोन पाय, तोंड) त्या प्रार्थना करण्याआधी नीटपणे धुवेल. पूर्वेकडे तोंड करून तो त्याचे जेवण करील. शांतपणे न बोलता तो ते खाईल. तो कधी अन्नाचा अपमान करणार नाही. त्याच्या पोटापुरते खाईल, आवडेल ते खाईल, जे खाल्याने त्याला त्रास होतो ते खाणार नाही, दुसर्याला खाण्याचा आग्रह करणार नाही. खाणे झाल्यानंतर तो त्याचे तोंड धुवेल. त्या बरोबर तो त्याचे हात कोपर्या पर्यंत धुवेल, नाक, कान, चेहरा सुद्धा धुवेल. तोंड धुतांना तो जोराने चुळा करील व ते पाणी थुकून टाकील. असे तीन वेळा करील. त्या क्रियेला गंडूशा (मुसलमानात ह्या क्रियांना उजू म्हणतात. अरबांनी अशा बर्याच क्रिया वैदिक प्रथांतून घेतल्या आहेत.) असें म्हणतात. तो ओल्या पायाने कधी निजणार नाही. ह्याप्रमाणे जो करतो तो चांगल्या वागणूकीचा असे नारदांनी सांगितले आहे. तो प्रार्थना करतांना त्या भोवती प्रदक्षिणा करेल. खाणे देतांना

अतिथी, नातेवाईक, नोकर असा भेद तो करणार नाही. दिवसातून दोनदा जेवावे असे शास्त्रात सांगितले आहे. तशा प्रकारे जेवणारा उपवास करतो असे समजावे. योग्य वेळी यज्ञ करावा. जो फक्त त्याच्या पत्नीशी फक्त योग्य समयी तिच्या संमतीने संबंध करतो तो ब्रह्मचारी समजला जातो. तो अतिथीला उपाशी ठेवणार नाही. शिधा मिळाला कीं, तो प्रथम ज्येष्ठांना द्यावा. परस्त्री जर नग्न असेल तर तिला पाहून नये. आपल्या भार्येबरोबर एकांत करावा, त्याचा चवाठा होता कामा नये. एकमेकांना भेटल्यानंतर नमस्कार करून अभिवादन करावे. देवांची याचना करतांना नेहमी उजवा हात पुढे करावा. विद्वान लोकांचा (ब्राह्मणांचा), साधू संतांचा आदर करावा त्यामुळें फायदा होतो. वडील माणसांना आदर पूर्वक बोलावे व त्यांचा मान राखावा. त्यांचे नांव घेऊन त्यांना बोलावू नये. काका, तात्या, आजोबा, दादा अशा सन्मानपूर्वक शब्दात त्याना हाक मारावी. श्राद्धात उरलेले मांस यजमानाने खाण्यास हरकत नसते. पापी माणसे त्यांनी केलेल्या पापाचा पश्चात्ताप करत नाहीत त्यांचा नाश होतो. तुम्ही जे करता ते सगळे लोकपाल देवता (इंद्र, यम, वैश्रावण, वायू, अग्नी आणि वरुण त्यापैकी पहिले तीन बाहेरून व नंतरचे तीन शरीरातून) पहात असतात हे लक्षात ठेवून तो त्याची वागणूक ठेवील. आपण एकटे कधीच नसतो ह्याची जाणीव ठेवून तो त्याची सगळी कामं व विचार करेल तर तो पुण्यवंत होईल. बुद्धीहीन मनुष्य त्याच्या पापाचा विचार करत नाही. त्यामुळे तो पाप करत रहातो व त्याची अध्यात्मिक उर्जा संपवत असतो. चांगुलपणा, माणूसकी व भूतदया हे पुण्याचे मार्ग कधी सोडू नयेत. तसे जीवन जगणारे मृत्यूनंतर पिशाच्च योनीतसुद्धा सुखी होतात. त्यांना कशाचाच त्रास होत नाही. तो कोठलेही (शरीराचे अथवा मानसिक) व्यसन करणार नाही.

मोक्ष धर्म पर्व भाग विसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकविसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "पितामहा, मला सांगा ते अध्यात्म म्हणून जे विचार असतात ते काय असतात, ते कशाबद्दलचे असतात. प्रत्येक माणसाने पुरूष व स्त्री अशा दोघांनी त्यात गुंतावे असे सांगितले आहे त्या बद्दल मला आणखीन समजून घ्यावयाचे आहे. आपण ब्रह्माबाबत सगळे जाणता तेव्हां तुमच्या पेक्षा अधिक योग्य कोण असू शकतो जो मला ते समजावून सांगू शकेल. ती चराचरानी भरलेली सृष्टी कशी कार्यरत झाली व केव्हां, त्याचप्रमाणे ते होण्या मागील कारणं कोणती ते सुद्धा मला सांगा. जे निर्माण झाले ते केव्हातरी संपणार हा सृष्टीचा नियम आहे, तेव्हां ते सगळे केव्हां संपणार तेसुद्धा सांगा. आधीच्या काळात अनेक शहाणे लोक होऊन गेले त्यांनी त्यांच्या कल्पना सांगितल्या आहेत, तुम्हाला जे समाधान कारक कारण व्युत्पत्तीचे वाटते ते मला सांगा. भिष्म सांगतात की, पृथ्वी, हवा, आकाश, पाणी आणि प्रकाश हे मोठे भूत (चैतन्यशील अस्तित्व) आहेत. त्यांच्या अनेकविध रचनांतून सृष्टीची विविधता तयार झाली ते मला माहीत आहे. त्यांच्या निर्मितीत त्यांच्या नाशाची कारणं लपलेली असतात तेसुद्धा मला माहीत आहे. त्या नाशा नंतर पुन्हा त्या भूतांतून नवीन रचना उत्पन्न होत असतात. असा सृष्टीचा नित्यक्रम असतो हेसुद्धा मला माहीत आहे. परंतु, सामान्य बुद्धी असलेले लोक ते समजत नाहीत. त्या पांचांतून पुढे मन व बुद्धि तयार झाले ती विचार परिमाणाची अंगं असतात. कारण विचार हे मनाचे व बुद्धिचे एकमेव लक्षण असते. त्यात दोन प्रकारचे विचार असतात, एक असे विचार जे भावनांवर आधारीत असतात व दुसरे ते विचार जे तर्कावर आधारीत असतात. तर्कावर आधारीत विचारांना बुद्धी असें म्हणतात. त्यामुळें मनुष्याच्या मनात व बुद्धीत प्रत्येक विषयांवर किमान दोन मतं आढळून येतात. शहाणे लोक बुद्धीला जास्त मानतात व सामान्य लोक मनाला जास्त महत्व देऊन भावनांच्या गोंधळात अडकून घेतात. पांच ज्ञानेंद्रीयांनी जी माहिती गोळा केली त्याचा अर्थ काढण्याचे काम मन व बुद्धी करत असतात. त्यांच्या विशिष्ट स्वभावानुसार. मन भावनिक रित्या अर्थ काढते व बुद्धी तर्कशुद्ध प्रकारे काढण्याचा प्रयास करते. अशारितीने मनुष्य सृष्टीला

समजून घेण्याचा प्रयत्न करत असतो. त्यात त्याचे मन व बुद्धी त्याला चुकीचे निकस देऊन भ्रष्ट करू शकण्याची मोठी शक्यता असते. हे जे सृष्टीचे व्यवहार समजण्याचे कार्य मन व बुद्धी करत असतात त्यातून अध्यात्म सुरू होतो. अध्यात्म ह्याचा अर्थ आहे, स्वताला समजण्याची विचार पद्धती. मन आणि बुद्धी ह्यांच्या प्रयत्नातून मनुष्य जगाला समजण्याचा सतत प्रयत्न करत असतो. त्यात तो चुकत चुकत सुधारत सुधारत त्याचे सृष्टीबद्दलचे ज्ञान वाढवत असतो. शेवटी येतो आत्मा जो सगळ्या सृष्टीच्या निर्मितीचे प्रमुख कारण आहे. ज्याने मनाचे कार्य, बुद्धीचे कार्य नीट समजून घेतले तो त्यातील विचारांचे व्यवस्थित विश्लेषण करून जगाला समजू शकतो. त्यासाठी चुकीचे विचार मग ते मनाचे असतील अथवा बुद्धीचे असतील, तो त्यांबद्दल प्रतिष्ठेचा विषय न करता सुधारत जातो, त्यासाठी तो इतर शहाण्यांच्या मतांची योग्य दखल घेत असतो. त्यासाठी त्याची बुद्धी त्याला मदत करत असते. ह्या अभ्यासात त्याचा आत्मा म्हणजे तो स्वतः त्यात भाग घेत असतो. जरी आत्म्याला स्वताचे रंग रुप नसले तरी त्याला वेढणारा त्याच्या बरोबर सतत वावरणारा त्याचा लिंगदेह त्याला विशिष्ट रंग रुप देत असतो. तो लिंगदेह म्हणजे त्या आत्म्याच्या गत जन्माच्या कर्माचा व विचारांचा लेखाजोखा असतो तो त्या आत्म्याला लिंग (स्त्री अथवा पुरूष किंवा इतर) देत असतो. ह्या जन्मातील मन व बुद्धी त्या लिंगदेहामुळे सतत प्रभावित होत असते. लिंगदेह सुद्धा त्याचे मन व बुद्धी घेऊन आलेला असतो, त्यामुळे एकाच माणसात दोन मनं आणि दोन बुद्धी कार्यरत असण्याची शक्यता असते. त्याचा परिणाम स्वरुप माणसाच्या मनात अनेक विचारांचे काहूर माजलेले असते. त्यातून त्याला जी बुद्धी मदत करते ती प्रज्ञा म्हणून ओळखली जाते. प्रज्ञा वाढवणे हे योग्याचे काम असते. ज्याला त्याची प्रज्ञा प्राप्त झाली तो त्याचा (आत्म्याचा) उद्धार सहजपणे करू शकतो. माणसाच्या गतजन्माच्या प्रभावाखाली तो त्याची ह्या जन्माची बुद्धी वापरत असतो. त्याच्या आवडी निवडी त्याप्रमाणे ठरत असतात. म्हणून दोन माणसांचे वागणे सारखे कधीच नसते त्यांत फरक आढळून येतो. त्यात आणखीन भर पडते ती त्या जन्माच्या शरीराच्या गरजांची व त्यातून उत्पन्न होणार्या वासनांची. एकाच वेळी माणसाला ते सगळे सांभाळून त्यातून योग्य निर्णय घेऊन जगावयाचे असते. भिती हे असमर्थतेचे

लक्षण समजले जाते. खूषी समाधानाचे लक्षण असते. असमाधान, मनाची तडफड, दुःख, मनाची अस्थिरता, हट्टीपणा, वासनामयतेचे लक्षण असते. दैव फिरल्यामुळे भ्रमावस्था, गोंधळ, शरमिंदीपणा, झोप, आळस असे दोष प्राप्त होतात. ते सगळे आत्म्याच्या गतकर्माचे परिणाम असतात ते लिंगदेहामुळें व्यक्त होतात ह्या जीवनात. आत्मा देहाच्या माध्यमातून त्याची अभिव्यक्ती करत असतो, त्या कामात त्याला जीवाचे मन आणि बुद्धी मदत करत असतात. ह्या जन्मात तो जे घडवतो ते सुद्धा लिगदेहात नोंदले जात असते व एक नवीन कर्मांचा लेखाजोखा तयार होत असतो. अशारितीने लिंगदेहाची रचना सतत आवृत्त होत असते. तपस्येमुळे आत्म्याचा अध्यात्मिक उद्धार होतो. शरीराच्या विविध गरजांच्या पूर्ततेसाठी आत्म्याची अध्यात्मिक उर्जा वापरली जात असते त्याची भरपाई तपस्या, ब्रह्मचर्य, व्रतस्थता अशा योगांतून करावयाची असते. तसे नाही झाले तर त्या आत्म्याचा अध्यात्मिक र्हास होतो. त्यामुळे त्याला मृत्यूनंतर अनेक दुःखदायक अनुभव घ्यावे लागतात. म्हणून प्रत्येकांनी तपस्या, ब्रह्मचर्य, व्रतस्थता अशा योगांचा विनियोग करावयाचा असतो. नाहीतर त्याचा पुढचा जन्म खालच्या योनीत होतो. प्रत्येक योनीच्या आत्म्याची अध्यात्मिक धारणा किमान व कमाल ठरलेली असते. त्याप्रमाणे तो प्राणी अथवा ती वनस्पती उत्पन्न होत असतात व जगत असतात. माणसाची अध्यात्मिक योग्यता सर्व जीवांत सर्वोच्च असते. ती आणखीन वाढवणे त्याचे जिवित कार्य असते. इतर प्राणीसुद्धा त्यांच्या परीने अध्यात्म साधना उपजत बुद्धीने अजाणता करत असतात. पापमय जीवन जगणारा त्याच्या पापमय जीवनामुळें त्याचा अध्यात्मिक र्हास झपाट्याने करत असतो. त्यामुळें तो कदाचित त्याचा पुढचा जन्म पशूयोनीत अथवा किड्या माकोड्याच्या नीच योनीत घेत असतो व त्यालाच नरक असें म्हणतात. त्या उलट पवित्र जीवन जगणारा, त्याशिवाय तपस्या, ब्रह्मचर्य, व्रतस्थता असे सगळे करणारा त्याची अध्यात्मिक योग्यता वृद्धीगंत करत असल्यामुळे पुढच्या जन्मी उच्च दर्जाच्या मनुष्य कुळात अवतरतो. त्याला अनेक सुख प्राप्त होतात. तशाप्रकारे एका मागोमाग एक असे पवित्र जीवन जगणारा ब्रह्माला जाऊन मिळतो. त्याचे देवांत रुपांतर होते व त्याला ब्रह्मदेव कांहीं दैवी काम सोपवतो. पुढे तो मोक्ष प्राप्त करतो.

अध्यात्म साधना माणसासाठी एक स्वाभाविक गोष्ट असली पाहिजे. माणसाचा जन्म त्यासाठीच असतो हे जो समजला त्याला पुढचा मार्ग समजणे सोपे असते.

मोक्ष धर्म पर्व भाग एकविसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग बाविसावा

भिष्म पुढे बोलतात, मी ह्यापुढे तुला ध्यान योग कसा करावा त्याबद्दल सांगणार आहे. महान ऋषी त्या मनसाचे ज्ञान प्राप्त करतात ह्या ध्यान योगाच्या मदतीने. तो योग योग्यप्रकारे कसा करावा ते समजणे जरूरीचे असते. ज्याने तो साध्य केला तो दोषमुक्त होतो. त्याला पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही. तो जीवनमुक्त होतो. असे योगी त्यांच्या परिवारापासून दूर रहाणे पसंत करतात. कोणाही कडून भेटवस्तु घेत नाहीत. ते आनंद, दुःख, थंडी व वारा, उष्णता अशा शरीराशी संबंध असलेल्या गोष्टीचा विचार करत नाहीत. तो कोणाचे चांगले करत नाहीत व वाईट सुद्धा करत नाहीत. कोणाशी बोलत नाहीत, वाद करत नाहीत, कोणत्याही प्रकारची चर्चासुद्धा करत नाहीत. निर्जीव असल्यासारखे त्यांचे अस्तित्व असते. त्याचे सगळे लक्ष आत्म्यावर असते. कोणताही विचार ते करत नाहीत, विचारहीन अशा शांत मनस्थितीत ते सतत रहातात. त्यांचे एकचित्त त्यांच्या श्वासोंश्वासावर असते. त्यालाच ध्यान साधना असे म्हणतात. त्या अवस्थेत असतांना त्याला स्पर्श केला तर तो त्याला समजत नाही. कान ऐकत नाहीत, डोळे उघडे असले तरी पहात नाहीत, नाकाला गंध समजत नाहीत. अशाप्रकारे त्याची सगळी ज्ञानेंद्रिये बंद झालेली असतात. अशा अवस्थेत तो बराच काळ रहातो. कदाचित कित्येक वर्षेसुद्धा तो तसा असतो. त्याला कसलीच इच्छा नसल्यमुळे त्याची भोग इंद्रियेसुद्धा निष्काम झालेली असतात. त्यामुळें त्यांचे नियंत्रण करावे लाग नाही. ती भोग इंद्रीये आपसुकपणे शांत झालेली असतात परंतु, तो त्या अवस्थेत जागृत असतो. त्याची सगळी जागृतता केवळ ब्रह्माशी जुडलेली असते. अशा अवस्थेत त्याला फक्त एकच इच्छा असते की, आत्मज्ञान प्राप्त व्हावे. त्यासाठी त्याला शरीराच्या इंद्रियांची गरज नसते केवळ मन आणि बुद्धी ह्यांच्या मदतीने तो ते साध्य करत असतो. मन हे सवयप्रधान असल्याने त्याला ती अवघड साधना प्रयत्नानंतर सोपी होते. मनाला तसे करण्याची सवय लावावी लागते त्यानंतर त्याची बुद्धी त्यात त्याला सहाय्य करू लागते. त्याचे विचार, विवेक आणि तर्कबुद्धी त्या कामात त्याला सहाय्यभूत होतात. केवळ तीव्र इच्छेच्या जोरावर तो ते

साध्य करत असतो. त्याला त्याची सवय होते व ते त्याचा स्वभाव होते. त्या अवस्थेत तो कधी निर्वाण प्राप्त करतो त्यालाच समजत नाही.
मोक्ष धर्म पर्व भाग बाविसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग तेविसावा

युधिष्ठीर त्यानंतर विचारतो, "आपण चार आश्रम आणि त्यांची कर्तव्ये व जीवन पद्धती ह्याबद्दल सांगितले आहे. राजाची कर्तव्ये कोणती तेसुद्धा सांगितले आहे. ते सगळे मला ऐकल्या नंतर कांही शंका उपस्थित होतात. त्यांच्याबाबत मला जर सांगितले तर बरे होईल. मला सांगा, मनातल्या मनात जप करणार्याला कोणते फायदे होतात? मृत्यू नंतर तो कोणत्या लोकांत जातो"? "मला ते सगळे नियम सांगा जे मनातल्या मनात जप करणार्यांना मार्गदर्शक आहेत. जप करणारा म्हणजे काय तेसुद्धा सांगा. मंत्रोच्चार करणारा म्हणजे कोण ते सांगा. तो कोण असतो, कोणी सांख्य विचारप्रणालीचा योगी असतो कां? कां कोणी मनाच्या संयमाचे योग करणारा असतो"? आपण सगळे जाणता म्हणून मी ते सगळे तुम्हाला विचारत आहे".

भिष्म सांगू लागतात, ते समजण्यासाठी मी तुला तो इतिहास सांगतो जो यम, काळ आणि कौशिक वंशाचा ब्राह्मण ह्यांच्यात घडला होता. मोक्षाचे ज्ञान असलेले ऋषी दोन मार्ग सांगतात. एक आहे सांख्य मार्ग आणि दुसरा आहे योग मार्ग. त्यातील पहिल्याला वेदांत असें सुद्धा म्हणतात. त्याप्रमाणे सांख्य मध्ये म्हणजे वेदांतात मनातल्या मनात जप करण्याची शिफारस आहे. त्याप्रमाणे कोणतेही विधी करण्याची, पुजापाठ करण्याची आवश्यकता नसते. त्याचा जोर असतो केवळ मनातल्या मनात ब्रह्मावर ध्यान करण्यावर. ज्याची जी प्रवृत्ती त्याप्रमाणे तो त्याचा मार्ग ह्या दोनांतून निवडत असतो. त्या दोनही मार्गाने मोक्ष साध्य होतो. माणसाचे कर्तृत्व आणि दैव असें दोन त्याला मदत अथवा विरोध करत असतात. योग साधनेत कर्तव्याला जास्त वाव असतो. सांख्यात दैव मदतगार असते. केवळ मनात जप करून तेवढे पुरेसे नसते, त्या आधी तो साधक पूर्णतया सात्त्विक मनोवृत्तीचा असणे आवश्यक असते. एकांतात रहाणे, तपस्या करणे, वासनांबाबत उदासिन असणे, क्षमाशिल असणे, मितभाषी, मिताहारी, जास्त करून मौन पाळणे, आजूबाजूच्या गोष्टाबाबत निरुत्साही असणे, असे त्याचे वागणे असले पाहिजे. ब्रह्मचर्य त्याचा स्वभाव असला पाहिजे. तो विचारशून्य अवस्थेत जाईल. त्या निर्विचारी अवस्थेत

तो मन एकत्र करून फक्त श्वासावर ध्यान करत असेल. तो कोणत्याही कार्यकारी देवतेचा (कर्मकांडाच्या पुजनीय देवता) जप करणार नाही. त्याचे ध्यान केवळ त्याच्या श्वासोंश्वासावर असेल. त्या अवस्थेत तो जास्तात जास्त काळ घालवेल. कांहीवेळा गायत्री मंत्र जपण्याने कांहींना मदत होते. तसे करत असतांना त्याचे ऐहिक जीवनातून लक्ष पूर्णतया नाहीसे होते. त्याला कशाचीच गरज रहात नाही. त्याला मान, अपमान, सन्मान, स्तुती, अवहेलना हे सगळे सारखेच असतात. तो निरिच्छ मनाने सगळे पहात असतो. त्याचे सगळे ध्यान त्याच्या सोहम् जपावर असेल. ते होत असतांना पुढे त्याचा जपसुद्धा थांबतो कारण तो त्याहीपेक्षा पलिकडील अवस्थेत (समाधी अवस्था, एक प्रकारची गाढ निद्रा) गेलेला असतो. तो ब्रह्माशी मिळून गेलेला असतो. त्या अवस्थेत तो असतांना विविध देवतां त्याच्या संपर्कात येतात व त्याला सृष्टीचे ज्ञान देत असतात. तो ज्ञानी होत असतो. त्या ज्ञानाचा त्याला अनुभव येत असतो. त्याशिवाय त्यापैकी कांहीं देवता त्याला सिद्धी देतात व तो सिद्ध होतो. हे सगळे यथावकाश होत असते. स्वाभाविकपणे ते होत असते. त्यानंतर तो मृत्यू गाठतो त्याच्या स्वेच्छेने. तो मृत्यू त्याच्यासाठी आनंद देणारा असतो. कारण तो तत्वतः मृत्यूंजय झालेला असतो. तरी त्याच्या गतकर्मांचे ओझे (लिंगदेह) विरून गेलेले नसते. त्यालाच मोक्षसिद्धीच्या जवळ आला, असें म्हणतात. परंतु अजून तो मोक्षसिद्धी प्राप्त केलेला नसतो.

मोक्ष धर्म पर्व भाग तेविसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग चोविसावा

युधिष्ठीर विचारतो, "आपल्या सांगण्याप्रमाणे तो जप करणारा त्या उच्च पदाला पोहोचतो. मला सांगा काय तो त्याचा अखेरचा प्रवास असतो, कां कांहीं आणखीन व्हावयाचे बाकी असते"?

भिष्म सांगतात, "ऐक मी काय सांगतो ते, जप करणारा जरी त्या उच्च पदाला पोहोचला तरी त्याच्या मागे असलेले गतकर्माचे ओझे म्हणजे लिंगदेह पूर्णतया विरून गेलेला नसतो. तो जप करणारा त्यानंतर कांहीं विधी करणे आवश्यक असते. त्या जर त्याने केल्या नाही तर तो मोक्ष प्राप्त करू शकत नाही त्या ऐवजी तो पुन्हा जन्म घेतो त्याला नरक असे म्हंटलेले आहे प्राचीन ऋषींनी. कारण तो जन्म माणसाचाच असेल असें नाही. त्याच्या गतकर्मानुसार तो इतर प्राण्यांच्या योनीत जन्म घेण्याची शक्यता असते. म्हणून अशा जन्माला नरक असें सांगितले आहे. त्या जन्मात तो पुन्हा भ्रष्ट होण्याची शक्यता असते. कारण त्याला त्याच्या कमावलेल्या ज्ञानाचा विसर पडण्याची शक्यता असते. म्हणून तो त्या दिलेल्या विधी करणे आवश्यक असते ज्या त्यांनी त्या ज्ञान प्राप्तीच्या जीवनाच्या जन्मात केल्या पाहिजेत. तेथे सद्‌गुरू उपयोगाचा असतो. बर्याच वेळा त्याचा छुपा अहंकार त्या वेळी वाढतो आणि त्यामुळें तो भ्रष्ट होतो. तो काळ मोठा जिकीरीचा असतो. फार काळजी पूर्वक त्याने त्याचा अहंकार नियंत्रित केला पाहिजे. नाहीतर सगळी साधना व्यर्थ गेली असे म्हणावे लागेल. जो ती साधना कांहीं ऐहीक मतलब साध्य करण्यासाठी करतो त्याचा ते सगळे त्या प्रसन्न झालेल्या देवतां देतात पण तो पुन्हा मनुष्य जन्माकडे वळतो. त्याला मोक्ष प्राप्त होत नाही. पापबुद्धीने प्रेरीत होऊन जर तो ती साधना करत असेल तर तो त्यात यशस्वी झाला तर तो त्यानंतर नरकात फेकला जातो. त्याचा दैत्य अथवा दानव अशा योनीत जन्म होतो. त्याची साधना व्यर्थ जाते.

युधिष्ठीर पुढे विचारतो, "एवढी कठीण साधना केल्यांनंतर सुद्धा तो साधक पुन्हा खाली येतो त्याचे कारण काय असते"?

भिष्म सांगतात, "केवळ अहंकाराच्या उद्वेगामुळें तसे होत असते. मिळालेल्या सिद्धीमुळें त्याचा छुपा अहंकार जागा होतो जो त्या साधनेच्या काळात लपलेला होता. परंतु, जर साधकाच्या अहंकाराचा खरोखरच नाश झाला असेल तर तसे होत नाही. अहंकार माणसाच्या अध्यात्मिक उद्धारात येणारी मोठी अडचण असते. तो कसा आणि कोठे लपून बसला असेल ते सांगता येणार नाही. मी तुला जपाचे व ध्यानाचे महत्व सांगितले आहे".

मोक्ष धर्म पर्व भाग चोविसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग पंचविसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "अहंकारामुळे जप करणार्या अधोगती प्राप्त झालेल्याला कशा प्रकारचा नरक भोग प्राप्त होत असतो ते सांगा".

भिष्म सांगतात, "कांहीं तुझ्यासारखे लोक मनसाच्या सकारात्मक हिस्शातून उत्पन्न झालेले असतात. ते ब्रह्माचे कार्यकारी भाग असतात. त्यांची पुन्हा विविध रंगरुप असतात. त्यांचे जे प्रदेश असतात त्यांना नरक असे संबोधन आहे. त्यात शुक्र, बृहस्पती, मरुत, विश्वदेव, साध्य, आश्विनी, रुद्र, आदित्य आणि वसू असे स्वर्गीय दैवतांचे प्रदेश आहेत. त्यांत उत्तमोत्तम वाडे, सोपान, रथ, महाल असे बरेच कांहीं असते पण त्याला स्वर्गाची सर नसते. तेथे दैत्य, दानव ह्यांची निवासस्थानं असतात. त्यातील कांहीं प्रदेशात भय नसते, वेदना नसतात, सत्त्व, रजस आणि तमस ह्या तीन गुणाच्या पलिकडील असे ते असतात. त्यांना त्या आठ जाणीवांचा (पांच ज्ञानेंद्रिये, मन, बुद्धि आणि जीव) संबंध नसतो. त्याच प्रमाणे जाणणारा, जाणण्याचे साधन व जे जाणावयाचे ते असे तीन सुद्धा तेथे नसतात. तेथे त्यामुळे इच्छा उत्पन्न होत नाहीत, ज्यामुळें सुख अथवा दुःख सुद्धा नसते. तेथे वास्तविक (मायेतील) काळ ज्याचे मोजमाप होते तो सुद्धा नसतो. परंतु, तो अतिप्राचीन न मोजता येणारा काळ जो मनसाचा अविभाज्य भाग आहे, तो असतो. अशा निर्विकल्प ठिकाणी तो योगी पोहोचतो ज्याचे जप करणे निर्दोष असते. त्यानंतर तो त्याचे कर्मविपाक संपवण्यासाठी पुनः जन्म घेत नाही. त्याशिवाय जे आहे ते नरक समजले जातात. ते सगळे अव्यक्त जगाचा भाग असतात.

मोक्ष धर्म पर्व भाग पंचविसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग सव्विसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "तुम्ही काळ, मृत्यू, यम, इश्वाकू आणि ब्राह्मण ह्यांच्यातील वादाचा उल्लेख केला आहे त्याचा इतिहास मला सविस्तार सांगा".

भिष्म सांगू लागतात, "राजा इश्वाकू, जो सुर्याचा मुलगा आहे आणि एक ब्राह्मण त्याशिवाय काळ, मृत्यू ह्यांच्यात घडलेला आहे तो सांगतो, त्यांच्यामध्ये जे बोलणे झाले ते सुद्धा सांगतो. त्याचे असे झाले कीं एक जप करणारा मोठा तपस्वी ब्राह्मण होता. तो वेदातील सहा अंग (शिक्षा, आलाप, व्याकरण, निरुक्ती, छंद आणि ज्योतिष) शिकलेला होता. तो कौशिक वंशाचा होता. त्याच्या पित्याचे नांव होते पिप्पलाद. त्याच्या तपस्येने तो वेदातील अंग शिकला होता. तो हिमालयात रहात होता. तो शांतपणे मनातल्या मनात गायत्री मंत्र सतत जपत असे. तो ब्राह्माशी एकरुप होण्या साठी घोर तपश्चर्या करत असे. एक हजार वर्षे तशी गेली. त्यानंतर देवता गायत्री अथवा सावित्री त्याला दर्शन देते. ती त्याला सांगते कीं, ती त्याच्यावर प्रसन्न झाली आहे. तो ब्राह्मण मात्र तिच्या कडे न पहाता त्याचे मंत्रजागरण चालू ठेवतो. त्या देवतेला त्याची दया येते व ती वेदाची जननी देवता त्याची प्रशंसा करू लागते. दिवसाच्या शेवटी त्याची जपजापाची ध्यान साधना तो संपवतो व उठतो त्या नंतर तो गायत्री मातेला सांष्ठाग नमस्कार करतो. तेव्हां ती त्याला विचारते कीं, त्याला काय पाहिजे म्हणून तो अशी घोर तपस्या करत आहे. त्यावर तो कौशिक वंशाचा ब्राह्मण तिला सांगतो कीं, त्याला अशीच घोर तपस्या सदैव करण्याची प्रेरणा व उर्जा मिळावी अशी त्याची तिच्याकडे मांगणी आहे. ते ऐकून सावित्री त्याला बोलते कीं, ते खरे परंतु, त्याशिवाय आणखीन काय तरी त्यांने मांगावे. ते ऐकल्यावर तो नितीमान, कर्तव्य तत्पर ब्राह्मण तिला सांगतो कीं, मला पूर्ण समाधीत जाणे शक्य व्हावे अशी माझी विनंति आहे. गायत्री संतुष्ट झालेली त्याला बोलते, तू आता कोणत्याही प्रकारच्या नरकात जाणार नाहीस. जेथे साधारणपणे इतर ब्राह्मण जे वेदाचे पठण अहंकार सांभाळत करत असतात ते जातात. कारण तुझा अहंकार निमाला आहे. तू ब्रह्मपदी जाणार आहेस. जो सदैव अव्यक्त आणि चिरंतन निर्दोष आहे. तेथे तू सदैव एकचित्ताने माझा जप करत रहाशिल.

तेथे यमदेव प्रत्यक्ष तुला मदत करणार आहे. त्याचप्रमाणे काळ, मृत्यू व धर्म तुझी साथ देतील. तेथे ते तुझ्या बरोबर नितीशास्त्राचे नियम ठरवतील.

भिष्म पुढे सांगतात, "असे बोलून ती अंतर्धान पावते. त्यानंतर तो ब्राह्मण पुढे आणखीन एक हजार वर्षे जपजाप योगात काढतो. त्यानंतर त्या निष्पाप ब्राह्मणाला यम दर्शन देतो. यमदेव त्याला बोलतो कीं, तो त्याला पहावयाला आला आहे. पुढे तो त्याला सांगतो कीं, त्याचा जपजापाचा योग सिद्ध झाला आहे. त्यामुळे तुला कोणते फळ मिळणार आहे ते सांगतो, त्याचे फळ असे आहे कीं, देव लोकात तुझे स्थान अढळ झाले आहे. तेव्हां आता तू हा तुझा योग थांबवायला हरकत नसावी. जर तू आता समाधी घेतलीस तर तू सर्वात उच्च कोटीच्या स्थानी जाशिल". ते ऐकल्यावर ब्राह्मण त्याला सांगतो, "मी त्या लोकांत जाऊन काय करू"? "अहो यमदेव आपण आता जावे कारण मी हे जप करण्याचे थांबवणार नाही. मला स्वर्गाचे आकर्षण नाही. मला माझे हे शरीर टाकून स्वर्गात जाण्याची इच्छा अजिबात नाही". धर्म देव बोलतो, "तुला तुझ्या शरीराचा मोह आहे हे योग्य नाही. तरी तू अशा ठिकाणी जाशिल जेथे तुला वासनांचा त्रास होणार नाही. तेथे दुःख तुला त्रास देणार नाही. नितांत सुखात रहाशिल असा तो लोक आहे". ते ऐकल्यावर ब्राह्मण त्या देवाला सांगतो, "अहो मृत्यूदेव मला तो जपजाप करण्यात आनंद मिळतो त्यासारखे सुख दुसरे नाही, म्हणून ते मी बंद कराणार नाही. मला कोठेही जाण्याची इच्छा नाही, अगदी स्वर्गसुद्धा".

यमदेव त्यावर बोलतात, "जर तुला तसे करावयाचे असेल व माझे ऐकावयाचे नसेल तर लवकरच विश्वदेव, काळ आणि मृत्यू तुझा समाचार घेण्यासाठी येणार आहेत". त्यानंतर यमदेव बोलतो, "मी यमदेव आहे, तुझ्या श्रेष्ठ दर्जाच्या तपस्येमुळे तुझ्यावर संतुष्ट होऊन तुला एक उच्च योग्यतेचे स्थान मिळणार आहे. त्याचा अव्हेर करू नकोस". त्यानंतर काळ पुढे येतो व बोलतो त्या कौशिक वंशाच्या ब्राह्मणाला, "तुझ्या शेकडो वर्षाच्या घोर तपस्येमुळे तुला एक श्रेष्ठ स्थान मिळणार आहे. मी तुला स्वर्गात घेऊन जाण्यासाठी आलो आहे".

त्यानंतर मृत्यू देवता (ही देवता शरीरातून आत्म्याला खेचून काढण्याचे काम करते) बोलते, "तुझा चांगुलपणा पाहून व काळाच्या सांगण्यानुसार तुझा आत्मा तुझ्या शरीरातून

काढण्यासाठी मी आले आहे". ब्राह्मण तिला बोलतो, "तुम्हा सगळ्यांचे मी स्वागत करतो. मी आपल्या करता काय करू शकतो ते सांगा".

भिष्म पुढे सांगतात, "त्या भेटीत तो ब्राह्मण त्या तीन देवतांना पाय धुण्यासाठी पाणी देतो. अर्घ्य देण्यासाठी पवित्र जल देतो. त्याने त्या देवता प्रसन्न होतात. पुढे तो ब्राह्मण त्यांची काय आज्ञा आहे असे विचारतो. त्याच सुमारास एक राजा इश्वाकू घराण्याचा तिर्थयात्रेस निघाला होता. तो तेथे येऊन पोहोचतो. तो राजर्षी इश्वाकू त्या जमलेल्या देवतांना लवून नमस्कार करतो. ब्राह्मण त्याला बसण्यासाठी आसन देतो. अर्घ्यादि विधी संपन्न होतात. त्यानंतर त्यांच्या क्षेमकुशल चौकशा होतात जसे नेहमी होत असते. ब्राह्मण त्याला विचारतो कीं, तो त्या राजाला त्याच्या कामात कांहीं मदत करू शकतो कां?

राजा बोलतो, "मी राजा आहे, तू ब्राह्मण आहेस, म्हणून मी तुला कांहीं दान करण्याबद्दल विचारू शकतो. तरी मला सांग मी तुझ्यासाठी काय दान करावे"?

ब्राह्मण बोलतो, "दोन प्रकारचे ब्राह्मण असतात. नैतिकतेचे सुद्धा दोन नियम आहेत. कामाचे व्यसन असणे व कामांच्या फळांचा त्याग करणे असे ते आहेत. मी दान घेण्याचे बंद केले आहे. ज्या ब्राह्मणांना दानं घेण्याची इच्छा आहे त्यांना तू दानं करावेस. त्याउलट मी तुला काय मदत करावी ते सांग कारण, माझ्या तपस्येने मी जे अध्यात्मिक सामर्थ्य मिळवले आहे ते तुला उपयोगी येऊ शकेल".

राजा बोलतो, "मी क्षत्रिय आहे, आम्ही दान घेत नाही. आम्ही युद्ध करून स्वकष्टाने आमचे मिळवत असतो".

ब्राह्मण त्यावर बोलतो, "तू तुझ्या वर्णाचे कर्तव्य करण्यात धन्यता मानतो आहेस असे दिसते. त्याच प्रमाणे मी सुद्धा माझ्या वर्णाचे कर्तव्य करणारा आहे. म्हणजे आपणात बरेच साम्य आहे. तुला जे योग्य वाटत असेल ते कर".

राजा त्याला बोलतो कीं, "तू प्रथम तुझ्या जपजापाने जे फळ मिळवले आहेस ते मला दे".

ब्राह्मण त्याला बोलतो, "तू गर्वाने बोलतोस कीं, तू क्षत्रिय आहेस व तुला जे हवे ते तू युद्ध करून मिळवू शकतोस तर तू माझे जपजापाने मिळवलेले श्रेय काढून दाखव माझ्या पासून. तरच ते मी तुला देईन".

राजा बोलतो, "असे सांगतात कीं, ब्राह्मणांकडे वाङसिद्धी असते. क्षत्रियांकडे शरीराची ताकद असते. म्हणून अरे ब्राह्मणा, असे वाङयुद्ध आपल्या दोघात सुरू होऊ शकते. म्हणून मीसुद्धा तुला कांहीं देण्याचा निश्चय केला आहे. म्हणून मला सांग, मी तुला काय द्यावे ते. ते मी तुला देणार आहे. त्यात लाजू नकोस". "जर तुला कांहीं मला द्यावयाचे असेल तर तुझ्या तपश्चर्येचे फळ मला देऊन दाखव". "अरे ब्राह्मणा, तुझे कल्याण हो कारण, मला तुझ्या तपश्चर्येचे फळ नको आहे. ते तुझ्या कडेच ठेव. परंतु, एक कुतूहल म्हणून मी विचारतो कीं, ते काय फळ आहे ते मला सांग".

ब्राह्मण त्याला बोलतो, "मी काय फळ मिळवले आहे ते जाणत नाही. तरी जे आहे ते मी तुला दिले आहे. त्याला हे तीन देव काळ, यम आणि मृत्यू साक्षिदार आहेत". राजा त्यावर बोलतो, "जे तुला माहीत नाही असे फळ घेऊन मी काय करणार"? जर तुला ते काय फळ आहे ते माहीत नाही तर ते तुझ्याकडेच राहू दे. मला नको असले फळ ज्याची तुला माहिती नाही.

ब्राह्मण त्यास बोलतो, "आता कांहीं बोलू नकोस कारण एकदा दिलेले मी कधी परत घेत नाही. त्यासाठी आपल्या दोघाची वाणी खरी हो असे मी आशिर्वाद देतो". पुढे तो राजाला सांगतो कीं, जेव्हां त्याने जप जापाची तपस्या सुरू केली तेव्हां त्यातून कांहीं मिळावे अशा अपेक्षेने ते आरंभलेले नव्हते. केवळ आत्मानंद मला त्यातून मिळत होता म्हणून मी ते आरंभलेले होते, हे सत्य आहे. त्यामुळे त्यातून कांहीं मिळते तेसुद्धा मला ठाऊक नव्हते. परंतु, तू दे बोललास व म्हणून मी ते तुला दिले अजाणता. मी जे दिले ते दिले आहे त्यात बदल होणार नाही. जर तू माझे देणे अस्वीकार करशिल तर तुला पाप लागेल व तुझा अध्यात्मिक र्हास होईल ते लक्षात असू दे. म्हणून तू जर सच्चा राजा असशिल तर मी दिलेले तू स्वीकारशिल. तू जेव्हां येथे आलास, तेव्हां तू माझ्या तपस्येच्या फळाबद्दल कांहीं जाणत नव्हतास. म्हणून ते घेणे तुझे कर्तव्य झाले आहे. पाहिजे तर असें समज कीं, तू ते माझ्याकडून युद्ध करून मिळवले आहेस. जर नाही घेतलेस तर तुझे पितर तुझ्यावर नाराज होतील. तुझे पुढे होणारे वंशज सुद्धा नाराज असतील. यज्ञात दिलेले दान, उपवास आणि धार्मिक कर्मकांडे माणसाचे भले करू शकत नाहीत जसे सत्याने होत असते. म्हणून सत्य त्याहून श्रेष्ठ असते. सत्य म्हणजे ब्रह्म असते. त्यापेक्षा श्रेष्ठ कांहीं नाही. म्हणून जे

फळ सत्याला मिळते तेसुद्धा श्रेष्ठ असते. चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया हे ब्रह्माचे लक्षण म्हणून सांगतात तेंच सत्याचे लक्षण असते. जो ते आचरतो तो श्रेष्ठ योगी ठरतो. सगळ्या विश्वाचे सत्य ह्या त्रिसुत्रीत असते. त्यातच सृष्टीच्या आरंभाचे कारण असते. सगळे अध्यात्मिक सामर्थ्य ह्या सत्यात सामावलेले आहे. जो ते आचरतो त्याने साम गाईले, मंत्र जपले अथवा गायत्री जपली असें होत असते. म्हणून तू मी दिलेले माझ्या तपस्येचे फळ स्वीकार. ते नाकारू नकोस अरे राजर्षी, मनापासून दिलेले दान न स्वीकारणे ह्याला खोटेपणा समजले जाते. मग तू कोण आहेस ते महत्वाचे नाही. ब्राह्मण त्या राजाला समजावत असतो.

राजा त्या ब्राह्मणाला सांगतो, "राजाचे कर्तव्य आहे त्याच्या प्रजेचे त्या त्रिसुत्रीच्या तत्वानुसार संरक्षण करणे. आम्ही दान देतो घेत नाही म्हणून मी तुझे दान घेऊ शकणार नाही त्यात कसलाही खोटेपणा होत नाही".

ब्राह्मण बोलतो, " मी त्याबद्दल आग्रही नाही. परंतु, जे प्रेमांने दिले आहे त्याचा अस्वीकार करणे शिष्टाचारात बसत नाही".

ते बोलणे होत असतांना धर्मदेव मध्येच बोलतो, "मी धर्म देव आहे, तुम्ही माझ्या समक्ष वाद करू नका. ब्राह्मणाला त्याचे फळ मिळावे व राजाला ते घेण्याने सत्य राखल्याचे श्रेय मिळावे अशी मी आज्ञा करतो".

असे बोलून झाल्यावर स्वर्ग तेथे देह धारण करून येतो व राजाला बोलतो, तुमचा वाद संपवा. तुम्ही दोघे सारखेच श्रेष्ठ ठरला अहात.

ब्राह्मण राजाला सांगतो कीं, त्याच्या तरूणपणी अज्ञानामुळे तो दान घेत असें परंतु, आता तो त्यापासून मुक्त झाला आहे जेव्हांपासून तो गायत्री जप करत आहे. मी वेदाचा अभ्यास करण्यात आणि गायत्री जप करण्यात माझे जीवन देत रहाणार आहे. तींच माझे तपस्या आहे. मी दान घेण्याचे कधीच सोडले आहे.

राजा त्याला बोलतो कीं, जर तू निर्धार केला आहेस कीं, मी ते घ्यावे तर तू सुद्धा माझी विनंती मान्य कर की, त्या फळातील अर्धा भाग तुझा असेल. आपण दोघे समसमान भागिदार होऊ त्या फळांचे. जर अर्धे घेणार नसशिल तर तुला मी ते सगळे दान करीन व ते तुला घ्यावे लागेल. त्यातच तुझा चांगुलपणा असेल.

भिष्म पुढे सांगतो, ते त्यांचे संभाषण होत असतांना तेथे विचित्र दिसणारे दोन येतात. त्यांचे हात एकमेकांच्या खाद्यावर होते. त्यांच्या अंगावर अव्यवस्थित कपडे होते. ते एकमेकांना सांगतात कीं, ते एकमेकांना कांहीं देणे लागत नाहीत. त्यावेळी दुसरा बोलतो कीं, तू मला देणे लागत आहेस. असे त्यांचे बोलणे होत असतांना एक त्या राजाकडे पहात म्हणतो हा पहा राजा आहे त्याला निवाडा करू दे कोण खरे बोलतो. तरी त्यातील एक बोलत असतो कीं, तो कोणाचे देणे लागत नाही. पुढे तो राजाकडे पहात म्हणतो पहा राजे, हा खोटं बोलत आहे. त्यामुळे त्याला व त्याच्यमुळे मला पाप लागणार आहे. त्यातील एक विरुपा, राजाकडे पहात बोलतो, "हा माझा मित्र विकृता आहे, अहो राजा, गाईच्या दानाचे श्रेय आहे, ते मी फेडण्याला तयार आहे. त्यावर विकृता बोलतो, हा विरुपा मला कांही देणे लागत नाही. तो जे ऋण फेडण्याचे बोलत आहे ते साफ खोटे आहे. तो मला कांहीं देणे लागत नाही. अहो राजा, मी जे सांगतो तेंच खरे आहे".

ते ऐकल्यावर राजा इश्वाकू बोलतो, "मला सांग विरुपा, तुझ्या मित्राला तू किती देणे लागत आहेस? हे माझे कर्तव्य आहे कीं, मी तुमचे गार्हाणे ऐकावे व योग्य काय ते ठरवावे".

विरुपा बोलतो, "नीट लक्ष देऊन ऐका राजे, जे घडले ते मी सांगतो. मी कसे माझ्या मित्राला देणे लागतो, ते समजावून सांगत आहे. हा विकृता एके काळी केवळ श्रेय मिळवण्यासाठी एक गाय दान करतो. ते एका ब्राह्मणाला दान करतो. जो ब्राह्मण वेद शास्त्र संपन्न होता. तो ब्राह्मण मोठा तपस्वीसुद्धा होता. त्याच्याकडे जाऊन मी त्या दानाचे श्रेय मागतो पवित्र मनाने. विकृता एक दान करतो मला त्याबद्दल, त्यानंतर माझ्या शुद्धीसाठी मी कांहीं पुण्य कर्म करत होतो. त्यामध्ये मी दोन कपीला गाई खरेदी केल्या होत्या त्यांच्या वासरा सकट. दोनही गाया भरपूर दूध देत होत्या. त्यानंतर मी योग्य विधीने त्या गाई एका गरीब ब्राह्मणाला दान केल्या. तो ब्राह्मण उच्छ विधीने (शेतात पडलेले धान्य वेचून त्यावर गुजराण करणे) त्याचे गुजराण करत होता. आधी माझ्या मित्राकडून दान स्वीकारलेले होते, म्हणून मी ते आता त्याला परत करण्याचे सांगत आहे. ते दुप्पट करण्याचा माझा विचार आहे. अशी एकंदर परिस्थिती आहे. आता सांगा आमच्यापैकी कोण बरोबर आहे व कोण चूक आहे. आम्ही दोघे तुमच्याकडे न्याय करण्यासाठी आलो आहोत. तुम्ही जो निवाडा

कराल तो आम्हाला मंजूर आहे. जर माझ्या मित्राला दान परत घ्यावयाचे नसेल तर तो मला काय देणार ते आपण ठरवावे.

राजा ते ऐकल्यावर बोलतो, "तू अरे विकृता, तो देत असतांना ते दान कां परत घेत नाहीस". उगाच वेळ फुकट घालवू नका, तो जे देत आहे ते घे आणि हा मामला संपवून टाक.

विकृता उत्तर देतो, तो म्हणतो कीं, तो मला देणे लागतो, पण मी सांगतो कीं, एकदा दिले ते दिले ते परत घ्यावयाची रित नाही. तो ते घेऊन कोठेही जाऊद्या.

राजा बोलतो, "तो तुला देण्यास तयार आहे, पण तू ते घेण्यास तयार नाहीस. त्याकरता तुला मी शिक्षा करणार आहे".

विकृता बोलतो, "माझे ऐका, मी त्याला दान केले आहे ते परत घेण्यासाठी नाही".

विरुपा बोलतो, "जर तू ते घेतले नाहीस तर हा राजा तुला शिक्षा करणार आहे. ती शिक्षा तुला मान्य करावीच लागेल.

विकृता  बोलतो त्याने मागितले म्हणून मी दिले आहे, जे दिले ते माझे होते, ते घेऊन तो कोठेही जाऊ शकतो.

ब्राह्मण बोलतो, तू ऐकलेस कां राजा हा वाद कशाबद्दल आहे ते. त्याप्रमाणे तू जो निर्णय दिलास तो तुलासुद्धा लागू होतो. मी माझे फळ देत आहे जे माझे आहे तेव्हां तू ते घेतले पाहिजेस.

राजा चक्रावून जातो व बोलतो हा वाद खरोखरच मोठा बिकट आहे. तो जपजाप करणारा कांहीं केल्या मागे हटणार नाही असें दिसते. त्याने दिलेले मी घेतले नाही तर मला पाप लागणार हे निश्चित. असा विचार केल्यानंतर तो राजा त्या दोघा विचित्र दिसणार्यांना बोलतो, तुम्ही तुमच्या योजनेत कामयाब झाला अहात. तुमचे जे आहे ते घेऊन जा. मी माझे राजाचे न्याय देण्याचे काम केले आहे. त्याप्रमाणे ब्राह्मणांचे दान मला भारी जात आहे. ब्राह्मण त्यावर बोलतो, "अहो राजे मान्य करा कीं, मी तुमचे देणे लागत आहे. कारण तसे तुम्ही ह्या निवाड्यात सांगितले आहे. पण जर तू ते नाही स्वीकारलेस तर तुझ्याच न्यायाने तुला मी जे करीन ते मान्य करावे लागेल. ते पुन्हा माझ्या प्रमाणेच होणार आहे. त्याप्रमाणे तू जे देशिल ते मी घ्यावयाला बांधलेला आहे. त्याप्रमाणे दोघे एकमेकांना त्यांची

दानं घेण्यासाठी बांधलेले आहेत. मी कधी दान स्वीकारत नसे पण आता तुझे दान मला घ्यावे लागेल. जे द्यावयाचे आहे ते तू मला दे. राजा ब्राह्मणाला सांगतो.

ब्राह्मण बोलतो, "मी गायत्रीचा जप केल्याने जे मिळाले आहे ते मी तुला देत आहे". राजा बोलतो, "हे पाण्याचे थेंब माझ्या हातांवर ब्राह्मण सोडत आहे ते दान करण्यासाठी. ते मी घेत आहे.

विकृता व विरुपा ते पहात असतात. ते त्या ब्राह्मणाला व राजाला सांगतात कीं, ते इच्छा आणि क्रोध ह्यांचे व्यक्त रुप आहेत. आम्हाला ब्रह्माने पाठवले होते तुमचा वाद मिटवण्यासाठी. आता तू त्याला (राजाने ब्राह्मणाला) परत दान करून हा हिशोब पूर्ण करावा. विकृता विरुपाला कांहीं देणे लागत नव्हता, ते एक नाटक ते करत होते तुम्हाला सावध करण्यासाठी.

काळ, धर्म, आणि मृत्यू आणि आम्ही दोघे तुमचा वाद बंद करण्यासाठी बोलत होतो. आता तुम्हाला जो लोक मिळाले आहेत तेथे खुषाल जा आणि मजेत रहा.

भिष्म पुढे सांगतात, मी तुला जप जाप करणार्याचे बळ काय ते सांगितले. गायत्रीचा जप करणारे ब्रह्मपदी जातात. कदाचित अग्नी लोकात सुद्धा जातात. कधी सूर्य लोकात जातात. कधी तो देव लोकात जातो व ब्रह्मदेव त्याला कांहीं जबाबदारी सोपवतो. त्याप्रमाणे तो नंतर मानवांना मदत करत असतो त्यांच्यात अध्यात्मिक प्रवृत्ती वाढवण्यासाठी. त्यासाठी सोम अथवा वायू अशा लोकांत तो जात असतो. जे नरक समजले जातात. त्यात त्याची जबाबदारी योग्य प्रकारे निभावल्यानंतर तो आणखीन उच्च स्थानी जाऊ शकतो. त्यास अमृत प्राप्त होते. तेथे तो पूर्ण मोक्ष प्राप्त करत असतो. निरंतन शांती त्याला मिळत असते. त्यालाच ब्रह्म म्हणतात. तेथून तो पुन्हा जन्म घेत नाही कारण त्याचा लिंगदेह निवळलेला असतो. त्याला तहान, भूक, भ्रम, आजार,  दुःख, सुख आणि मृत्यू बाधत नाहीत. कारण हे होण्याचा अर्थ असतो कीं, त्याचा लिंगदेह अजून कार्यरत आहे. परंतु जर त्या मुक्त आत्म्याला कांहीं उद्देश असेल जसे कांहीं कार्य करण्याची इच्छा असेल तर तो त्यासाठी मोकळा असतो. देवता त्याला त्या कार्यात मदत करण्यास तयार असतात. असा मुक्तात्मा कोठे तरी अवतारी पुरूष म्हणून येत असतो. मी तुला गायत्रीचा जपजाप करणार्याचे काय होते ते सांगितले आहे. मोक्ष धर्म पर्व भाग सव्विसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग सत्ताविसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "विरुपा बोलल्यानंतर ब्राह्मण आणि राजा त्याला काय सांगतात ते मला सांगा".

भिष्म सांगतात, "ब्राह्मण त्यानंतर यम, काळ, स्वर्ग आणि मृत्यूची पुजा करतो. ते सगळे पुज्य होते. तेथे त्यांचा वाद ऐकण्यासाठी आलेल्या सगळ्या इतर ब्राह्मणांचा तो नमस्कार करून आदर करतो. त्यानंतर तो ब्राह्मण राजाचे अभिनंदन करतो कीं तो आता ते फळ मिळाल्यामुळे उच्च कोटीचा झाला आहे. त्यानंतर तो सांगतो कीं, आता तो पुन्हा त्याच्या जपजापात मग्न होणार आहे. तो सांगतो कीं, सावित्रीने त्याला आशिर्वाद दिला आहे कीं, तो सतत गायत्रीचे जपजाप व त्या द्वारा ध्यान करत राहिल.

राजा त्याला बोलतो, तू तुझे फळ मला दिल्यामुळे ते तुला आता प्राप्त होणार नसले तरी त्याचे तुला कांहीं वाटत नाही, तू आता पुन्हा तुझे जप जाप करत रहाणार आहेस. ह्यापुढे जे फळ तुला मिळणार आहे त्यातसुद्धा माझा अर्धा वाटा असेल.

ब्राह्मण बोलतो राजाला, "तुझ्या आग्रहामुळे मलासुद्धा ती फळ मिळाली आहेत. मला ती बहुधा पुढच्या जन्मी प्राप्त होतील. त्यांचा निश्चय पाहून संतुष्ट झालेले ब्रह्मा, लोकपाल, साध्य, नद्या, विश्वदेव, मंत्र, असें सगळे देवता सुमधून संगीताच्या तालावर नांचत तेथे त्यांचे कौतुक करण्यासाठी येतात. त्याच्या बरोबर पवित्र जल देवता, समुद्र देवता, योगाच्या देवता, वेद, असे बरेच सांम गात होते, त्यांना साथ देत होते सरस्वती, नारद, पर्वत, विश्ववसू, हहा आणि हूहू, गंधर्व, त्यांचा राजा चित्रसेन, त्यांच्या सगळ्या परिवारासह आले होते. त्या दोघांचे कौतुक करण्यासाठी. त्यांच्या बरोबर नाग देवता, मुनी, प्रजापति, सहस्त्र मुख असलेले विष्णू सुद्धा तेथे आले होते. ढोल ताशा अशा गाजणार्या वाद्यांनी आसमंत दणाणून गेला होता. स्वर्गीय फुलांचा छडा पडला होता त्या दोघांवर. अप्सरा नाचत होत्या आणि त्यांच्या कौतुकाची गाणी गंधर्व गात होते. स्वर्ग व्यक्तिगत रुपाने तेथे आला होता. तो ब्राह्मणाला उद्देशून बोलतो, "तुझे यश कौतुकास्पद आहे". त्यानंतर तो राजाला बोलतो, "तुझे यश कमालीचे आहे. कारण तू केवळ ब्राह्मणाला शब्दात पकडून ते

श्रेय मिळवले आहेस". तुम्ही दोघे तुमचे वायू (प्राण, अपान, समान, उदान आणि व्यान) हृदयात बंद करून व मनाची एकाग्रता करून प्राण, अपान व उदान एकत्र करता अहात. त्यानंतर ते त्यांचे श्वास पोटात खेचून घेतात. त्यांची दृष्टी नाकाच्या अग्रावर केंद्रीत करतात. त्यानंतर ते ती नजर डोळ्याच्या वरच्या भागाकडे वळवतात. त्यानंतर ते दोनदा खोल श्वास घेतात. त्यानंतर ते त्यांची दृष्टी दोन भुवयांमध्ये आणतात. पुन्हा खोल श्वास घेऊन ध्यानाला सुरूवात करतात. ते समाधीत जातात तरी त्यांची दृष्टी अनंतात स्थीर झालेली असते. ते झाल्यानंतर त्या ब्राह्मणाच्या ब्रह्मरंध्रातून एक तेजस्वी ज्योत निघते व ती थेट आकाशात निघून जाते. ते पाहून तेथे जमलेले सगळे प्राणी मोठ्याने गलका करतात. त्यानंतर ब्राह्मणाच्या स्तुतीची कवन गंधर्व भाट गाऊ लागतात. तेव्हां साक्षात ब्रह्मदेव तेथे अवतरतात. ते ब्राह्मणाला व राजाला बोलतात कीं, त्यांचे स्वागत असो. त्यानंतर ते त्यांना सांगतात कीं, जपजाप आणि ध्यानयोग ह्यांची फळ साधारणपणे सारखीच असतात. फक्त फरक असा कीं, ध्यान योगाने अध्यात्मिक उत्कर्ष वेगांने होतो. परंतु आणखीन एक फरक असा असतो कीं, जपजाप करणार्याचे स्वागत स्वतः ब्रह्मदेव त्याच्या मृत्यूनंतर करतात. ते सांगतात कीं, असे साधक त्यांच्या मृत्यूनंतर ब्रह्मात विलीन होतात. त्यानंतर तो कौशिक ब्राह्मण ब्रह्माच्या मुखात प्रवेश करतो. त्याच्या नंतर राजा इश्वाकूसुद्धा तसाच ब्रह्माच्या मुखात प्रवेश करतो. त्यावेळी तेथे जमा झालेले सगळे देव देवता त्यांचे अभिनंदन करतात. ते आनंदमय अवस्थेत जातात. आता ते अव्यक्त रुपात सृष्टीमध्ये कोठेही जाण्यास मुक्त असतात.

भिष्म पुढे सांगतात, "त्यानंतर तो पहिला देव अंतर्धान पावतो. जमलेले सगळे देव देवता सुद्धा त्यांच्या ठिकाणी जातात. असा जपजाप करणार्याचा मोक्ष मोर्ग मोकळा होतो. मी तुला सांगितले मला जे समजले ते त्या जपजाप करणार्यांच्या व योग्यांच्या मुक्तीची माहिती. जी तुला समजून घ्यावयाची होती. ह्या कथेचे तात्पर्य असे आहे कीं, तपस्या करणार्याला त्याच्या तपस्येची निष्पत्ती (चांगली अथला वाईट) स्वीकारावीच लागते. आणखीन काय तुला ऐकावयाचे आहे माझ्याकडून ते बोल".

मोक्ष धर्म पर्व भाग सत्ताविसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग अठ्ठाविसावा

युधिष्ठीर पुढे विचारतात, "मला सांगा ज्ञान मार्गी योगी होण्याचे काय फायदे असतात. त्याशिवाय त्या सगळ्या व्रत वैकल्यांचे काय फायदे असतात? आणखीन एक प्रश्न आहे तो असा कीं, आत्म्याचे लिंग कसे ठरते"?

भिष्म सांगू लागतात, त्या संदर्भात मी तुला तो संवाद सांगतो जो जीवांचा कर्ता आहे त्या मनु व ऋषी बृहस्पती ह्यांच्यामध्ये झाला होता. अतिप्राचीन काळी बृहस्पती जो मनुचा शिष्य होता त्याच्या गुरूला विचारतो, "ह्या सृष्टीच्या निर्मिती मागील उद्देश कोणता आहे? ते मला सांगा कारण, वेदांतसुद्धा त्या बाबत कांहीं दिलेले नाही. पृथ्वीचे ज्ञान असणारे एवढे वेदांचे कौतुक करत असतात त्यातील मंत्राना, यज्ञाला, गाईच्या दानाला एवढे महत्व कां दिले आहे? मला पुन्हा सांगा ती पंचमहाभूतं का तयार झाली आहेत"? माणसाला ज्याचे कुतुहल असते त्याचा शोध तो घेत असतो. मलासुद्धा त्यासाठी ते सगळे तुमच्याकडून समजून घ्यावयाचे आहे. मला त्या बद्दल कांहींच माहिती नाही कारण मी जरी वेदांचा अभ्यास केला असला तरी त्या त्याबद्दल त्यात कांहींही दिलेले नाही. मला जे समजले नाही त्याची साधना करणे मिथ्याचार ठरेल व तो मी करू इच्छित नाही. वेदांतील साम, यजु, छंद, ज्योतिष, निरुक्ती, कल्प, व्याकरण, शिक्षा ही सगळी अंग मी शिकलो आहे. (साम आणि यजु वेदाचे कवन प्रकार आहेत, ज्योतिष भविष्य ओळखण्याचे तंत्र आहे, निरुक्ती वेदातील मंत्रांचे अर्थ सांगणारे आहे, कल्प वेदातील तंत्र समजावून सांगणारे असते, शिक्षा वेदातील कवनं कशी गावयाची ते सांगणारे अंग आहे, व्याकरण वेदातील मंत्रांचा उद्धेश कोणता ते सांगणारे अंग आहे.) परंतु, तरीसुद्धा मला त्या सृष्टीच्या उत्पत्तीबाबत कांहीं समजलेले नाही. तरी ते मला सांगा कारण तुम्ही ते सगळे जाणता. साध्या सोप्या बालबोध वाणीत ते मला सांगा. कारण मी त्या बाबत बाळ बुद्धीचा आहे. त्या ज्ञानाचे फळ कोणते व त्यांच्या यज्ञाचे कोणते फायदे असतात, तसेंच मेल्यानंतर तो आत्मा पुन्हा कसा जन्म घेतो व त्याचे गतकर्म त्याला कसे चिकटून असते ते सुद्धा सांगा.

मनु सांगू लागतो, ज्याला तू मान्यता देतोस ते समजल्यावर त्यामुळे तुला संतोष प्राप्त होत असतो. ह्या एका तत्त्वावर बहुतेक नियम आधारलेले असतात. जे ज्याला पटते ते त्याला योग्य कारण वाटत असते म्हणून ह्या सृष्टीच्या उत्पत्तीच्या विविध गोष्टी निरनिराळे ऋषी सांगत असतात. मी माझी गोष्ट सांगतो, वेदात जे नियम दिले आहेत दान आणि यज्ञाबद्दल ते दुःख निवारण्यासाठीचे आहेत. परंतु, ज्याला दुःखापासून मुक्तता प्राप्त झाली आहे त्याला दान आणि यज्ञ करण्याची आवश्यकता नसते. तो ब्रह्माच्या जवळ गेलेला असतो. परंतु, जे दुःख निवारण्यासाठी दान आणि यज्ञ करतात ते कधीच दुःखापासून मुक्त होत नाहीत त्याउलट ते नरकात जाऊन पडतात. बृहस्पती विचारतात, मनुष्य त्याला जे हवे ते मिळवण्यासाठी अनेक गोष्टी करत असतो, त्या करण्याने व न करण्याने त्याला दुःख प्राप्त होत असते कारण त्याच्या इच्छा कधींच संपत नसतात.

मनु सांगतात, म्हणूनच त्यांतून मुक्ती जो मिळवतो तोंच ब्रह्माला मिळत असतो जे माणसाच्या जन्माचे अंतिम उद्दीष्ट असले पाहिजे. मोक्ष प्राप्त करणे हे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे पण ते साधारणपणे नसते व मनुष्य ऐहिक गोष्टींमध्ये अडकून घेण्यात शहाणपणा समजत असल्यामुळें तो सदैव अस्थिर अवस्थेत रहातो व कर्मकांडा सारख्या भ्रष्ट कार्यात अडकत असतो. त्यामुळे त्याचे दुःख वाढतच रहाते. सुखाच्या मागे धावणार्यांच्या मागे नेहमी दुःख धावत असते हा निसर्गाचा नियम आहे. माणसाचे जीवन त्याचे मन व बुद्धी ठरवत असते. आपण जे जगत असतो तो आपल्या कल्पनांचा प्रभाव असतो. त्यासाठी मनाच्या आणि बुद्धीच्या कल्पनांत न रमता जो त्यांपासून मुक्त राहून ध्यान करण्यातच रमतो तो ब्रह्माच्या स्वरुपाला समजू शकतो. माणसाच्या मनात त्याच्या अध्यात्मिक योग्यते नुसार कल्पना येत असतात. चांगल्या अध्यात्मिक योग्यतेच्या माणसाच्या मनाची अवस्था सात्त्विक समजली जाते. त्यापेक्षा कमी असलेल्या अवस्थेतील मनाला रजस आणि त्याहूनही खालच्या पातळीच्या अवस्थेला तमस असे सांगतात. जशी माणसाची अध्यात्मिक अवस्था सुधारत जाते तो सात्त्विक मधून पुढे त्याहूनही उच्च दर्जात जात असतो ते अगदी ब्रह्मावस्थेपर्यंत. तसेंच अध्यात्मिक अवस्था आणखीन खालच्या पातळीला जाते तसा तो दुर्जन अवस्थेत जातो. वेदातील मंत्रांनासुद्धा तेंच तीन निकस (सत्त्व, रजस आणि तमस) लागतात. ह्या सृष्टीतील सगळ्याच गोष्टी ह्या तीन अध्यात्मिक

अवस्थांच्या माध्यमाने समजून घेता येतात. निसर्गातील प्रत्येक गोष्ट तिच्या अध्यात्मिक अवस्थेने ठरत असते. माणसाची सगळी कर्मं त्या तीन अवस्थांच्या निकषाने पारखता येतात.

मोक्ष धर्म पर्व भाग अठ्ठाविसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकोणतिसावा

मनु पुढे सांगतात, अध्यात्मिक उर्जेच्या स्फोटातून प्रथम आकाश तयार झाले. त्यात जी पोकळी झाली ती भरण्यासाठी वायू, पाणी, अग्नी आणि जमीन (पृथ्वी) तयार झाली. अध्यात्मिक तेजातून तारे व सूर्य असें प्रखर शक्तीचे स्त्रोत उत्पन्न झाले. अध्यात्मिक उर्जेतून वास्तविक उर्जा उत्पन्न झाली. त्यातून उष्णता, ध्वनि, गति, कंप, गुरूत्वाकर्षण, प्रकाश असे भेद उत्पन्न झाले जे एकमेकात रुपांतरीत होऊ शकत होते. हे सगळे कां होत होते ते कोणालाच सांगता येत नाही म्हणून ते रहस्य नेहमीच रहाणार आहे. अध्यात्मिक उर्जेची दोन अंग (परिमाण) आहेत, एक विचार व दुसरे रचना. त्यांच्या माध्यमाने हे सगळे घडत होते. त्यात दृष्य व अदृष्य अशा दोन जगांची निर्मिती झाली. तेंच सगळे भ्रमावस्थेत होते. म्हणून त्याला मायावी जग असें म्हणतात. ज्याला त्या अध्यात्मिक उर्जेचा ठाव लागला तो मुक्त झाला असें समजले जाते. केवळ जप करण्याने तसेंच कोणत्याही देवतेचे ध्यान करण्याने ते साध्य होत नाही. मोक्ष मिळवण्यासाठी योग्याला त्या भ्रमयुक्त जगाच्या पलिकडे त्याच्या मनाने व बुद्धीच्या मदतीने अध्यात्मात जावे लागते. जेथे ते पंचमहाभूत नाहीत. तेथे कोणतेही परिमाणं नाहीत. त्यासाठी खरा मोक्ष शरीराच्या त्यागा नंतरच प्राप्त होत असतो. त्या अध्यात्मिक उर्जेच्या शुद्ध रुपाला आत्मा व त्याच्या पूर्णरुपाला परमात्मा असें प्राचीन ऋषी म्हणतात. आत्म्याला एकच गुण असतो व तो म्हणजे अस्तित्व त्यातून असंख्य विचार निघत असतात त्या विचारांच्या समुद्राला दुग्धसागर म्हणतात ज्याचा स्वामी आहे विष्णू. आपले मन व बुद्धी जे विचार करते ते सगळे त्या विश्वव्यापी विचार सागरातूनच आपले मन किंवा बुद्धी घेत असते. वेदाचे मंत्रसुद्धा त्या विचार सागरातून आलेले असतात. कोणताही विचार त्याच्या पलिकडून येत नाही. म्हणजे ह्या विश्वातील सगळे विचार केवळ त्या विचारसागरातूनच येत असतात. त्यात सत्त्व, रज आणि तमोगुणाचे असे सगळे चांगले व वाईट विचार त्या विचारसागरातून येत असतात. पाप आणि पुण्य ते सगळे त्यातूनच सुरू होत असते. सगळे ज्ञान त्यात आहे. त्या बाहेर कांहीं नसते. नवीन शोध लावणारे ते विचार त्या सागरातून घेत असतात. ज्यांच्याकडे तशी

विचार खेचण्याची क्षमता असते तो महान ज्ञानी, प्रतिभासंपन्न वैज्ञानिक म्हणून समजला जातो. श्रेष्ठ दर्जाचे साहित्यिक, कवी, संशोधक ह्यांच्यात अशी क्षमता असते म्हणून ते मोठे काम करत असतात. तर्क, विवेक, संकल्पना असे सगळे त्या विचारसागरातून येत असतात. त्याच्या बाहेर कांहीं नसते. प्राण्याचे मन व बुद्धी ते विचार पकडण्याचे काम करत असतात त्यासाठी माणसाच्या मेंदूतील (संवेदना) ज्ञानतंतू ते काम करत असतात. जसे रेडीओची अँटेना करते. आपल्या सगळ्या संवेदना त्या विचार मंथनातून व्यक्त होत असतात. एका जन्माचे कार्य झाल्यावर तो आत्मा तो देह सोडतो व दुसर्या देहात यथावकाश प्रवेश करतो. त्याने टाकलेले शरीर पंचमहाभूतात निरनिराळ्या प्रकारे विलीन होत असते. तो शरीर टाकलेला आत्मा अदृष्य जगात जातो. त्याच्या बरोबर त्याच्या गतकर्माचे कर्मफलांचे ओझे त्याला चिकटलेल्या अवस्थेत असते. किंबहुना ते ओझे असल्यामुळे तो अज्ञानी आत्मा पुनः पुन्हा जन्म घेत असतो त्या ओझ्यापासून मुक्ती मिळवण्यासाठी. त्याच्या नवीन देहात ते सगळे गुणदोष असतात जे त्या आत्म्याच्या आधीच्या जीवनात त्याने संपादन केलेले असतात. त्याचे कारण त्याच्या बरोबर असलेले ते कर्मविपाकाचे ओझे असते. त्या ओझ्याला लिंगदेह असें नांव ऋषींनी दिले आहे. कारण त्यात सुक्ष्म देह असतो ज्याचे मुख्य लक्षण असते त्याला लिंग (*स्त्री अथवा पुरूष साधारणपणे असते. आधुनिक संशोधन सांगते कीं, तो लिंगदेह विशिष्ट प्रकारचे प्रकाश तरंग (इन्फ्रारेड, रक्तातीत) नित्य सोडत असतो जे कांहीं कँमेरा टीपू शकतात त्यामुळे तशा कँमेरातून लिंगदेहाचे चित्रीकरण करता येते. ते लिंगदेहाचे चित्र असते आत्म्याचे नाही.*) असते.

मोक्ष धर्म पर्व भाग एकोणतिसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग तिसावा

मनु पुढे सांगतो, मन त्या शरीराच्या ज्ञानेंद्रियांना समजत असते. त्या मनाला आत्म्याच्या गत आयुष्यातील गोष्टी लिंगदेहाच्या माध्यमाने समजू लागतात. त्याला आपण अंतःप्रेरणा असें म्हणतो. कारण आत्म्याचा लिंगदेह त्या नव्याने प्राप्त झालेल्या देहाच्या ज्ञानेंद्रियांशी आणि भोगेंद्रियांशी संपर्क करत असतो. त्याला कांहीं जाणकार उपजत बुद्धी असेसुद्धा म्हणतात. अशा माणसांना कांहींवेळा त्यांचा गतजन्म आठवला असे आपण म्हणतो. त्या व्यवहारात आत्मा प्रत्यक्ष गुंतलेला नसतो. शरीराच्या अवस्थेनुसार तीन अवस्था मनाच्या असतात त्या अशा जागृती, स्वप्न आणि गाढ निद्रा असतात. जागृत अवस्थेत आत्मा शरीरात निष्क्रिय असतो परंतु त्याचा लिंगदेह सक्रिय असतो. स्वप्नाच्या अवस्थेत आत्मा वेगळ्या प्रकारे सक्रिय असू शकतो. गाढ निद्रा अवस्थेत आत्मा कांहीं वेळा शरीरातून इतरत्र संचार करून येत असतो. जी अवस्था समाधी अवस्थे सारखी असते. आत्मा केव्हांही अदृष्य असतो कारण तो अध्यात्मिक उर्जेचा असतो. जी कधींच व्यक्त होत नाही. आत्मा मनसाचा अंश असल्याने त्यात त्याचा गुण असतो. त्याच्यातील अथक अध्यात्मिक उर्जेच्या प्रेरणेने शरीर व त्याचे भाग जसे मन, बुद्धी आणि जीव काम करत असतात. जेव्हां आत्मा ते शरीर सोडून जातो तेव्हां ते शरीर मृत झाले असें समजले जाते. सर्वच चराचरांसाठी हा नियम आहे. उपजत बुद्धीने मनुष्य आत्म्याची कल्पना करू शकतो पण त्याचा अनुभव तो प्रत्यक्षपणे घेऊ शकत नाही. कांहीं तर्काच्या मदतीने त्याचे अस्तित्व सिद्ध करता येते पण त्याला न स्वीकारणारे चार्वाक सुद्धा बरेच असतात.

मनु सांगतो, अध्यात्मिक उर्जा मनसाचे खरे रुप आहे तरी त्याचा अंश लिंग कसे धारण करतो ते सांगतो, मनसाला लिंगभेद नाही परंतु, जेव्हां त्यातून त्या स्फोटाच्या काळी जे आत्मांश फेकले गेले ते मानसाच्या अंतर्भूत असलेले स्त्री व पुरूष गुण घेऊन ते निघाले होते. मानसात दोनही गुण असतात. त्यामुळें त्याचा उल्लेख अर्धनारी नटेश्वर असा केला जातो. कांहीं आत्मे नर गुण घेऊन निघाले त्यांच्या बरोबर जे सुक्ष्म शरीर (देह) तयार झाले ते नरलिंगी म्हणून त्याचे लिंगदेह झाले. तसेंच कांहीं आत्मांश स्त्री गुण घेऊन निघाले

त्यांचे लिंगदेह झाले. आता स्त्री लक्षणं कोणती ते सांगतो, ती आहेत, काळजीपूर्वक, नीटनेटके, ममतापूर्वक, नम्र, प्रेमळ, शांत, सावध, प्रामाणिक, मेहनतू. ती असलेले आत्मे स्त्री लिंगदेह धारण करतात. पुरूष लक्षणं आहेत, थोडा बेपर्वा, उद्धट, घमेंडखोर, कमी दयाळू, अस्वस्थ, शंकाखोर, आगाऊ आणि आळशी असा असतो. त्याप्रमाणे त्या आत्म्याचा लिंगदेह पुरूषी असतो. त्याप्रमाणे त्या त्या आत्म्याने धारण केलेले देह त्या लिंगाचे असतात. असे असले तरी तो आत्मा स्वतः अर्धनारी नटेश्वर असतो हे विशेष लक्षात घ्यावे लागेल. मृत्यूनंतर देहातून बाहेर आलेला आत्मा त्याच्याबरोबर असलेल्या लिंगदेहामुळें कदाचित पहाता येतो. विशेष करून जे लोक मनुष्य गणाचे असतात ते मृतात्मे पाहू शकतात. देवगणाचे तसे पाहू शकत नाहीत. राक्षस गणाचे कदाचित पाहू शकतात. असें मृतात्मे बर्याच वेळा कांहीं सांगण्याचा प्रयत्न करत असतात. परंतु, माणसाच्या त्या विषयाच्या अज्ञानामुळें तो ते समजू शकत नाही. कांहींवेळा असे बेचैन झालेले मृतात्मे स्वप्नात सुद्धा येऊन त्यांचे संदेश देत असतात. माणसाच्या जीवन काळात तो जे करतो त्याची नोंद त्याच्या लिंगदेहात होत असते म्हणून जन्मण्याच्या वेळी असलेला लिंगदेह मृत्यूच्या वेळी बदललेला असतो. आत्मा मात्र तसा बदलत नाही. आधुनिक संशोधन सांगते कीं, माणसाच्या डीएनेमध्ये त्याची नोंद होत असते. त्यावर अजून संशोधन होत आहे.

मोक्ष धर्म पर्व भाग तिसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकतिसावा

मनु पुढे सांगतो, गाढ निद्रेच्या वेळी आत्मा मन व बुद्धी घेऊन त्या शरीरातून बाहेर पडण्याची शक्यता असते व तसा बाहेर पडलेला आत्मा कांहीं वेगळे अनुभव त्या मनात आणि बुद्धीत नोंदवू शकतो. ज्याची नोंद त्याच्या लिंगदेहात असते. शरीराच्या नित्य (नैमित्तीक) आणि प्रासंगिक गरजांच्या माध्यमातून आत्मा विविध इच्छांत अडकत असतो. असे होते जेव्हां आत्मा म्हणजे "मी", त्यांत गुंततो. खरा साधक त्याच्या शरीराच्या त्या गरजांमध्ये गुंतत नाही. शरीराचा कर्ता जीव, त्यांची व्यवस्था पहात असतो आणि त्यांचे मर्यादात नियंत्रण करत असतो. पण जेव्हां "मी", त्यात लक्ष घालतो व त्या इच्छा वाढवतो सगळे प्रश्न एकामागोमाग उपस्थित होतात. जीवाला त्याचे काम करू द्यावे व आपण त्यात गुंतणार नाही असे पहावे असे ऋषी सांगतात. जो त्याप्रमाणे शरीराच्या विविध नित्य आणि प्रासंगिक गरजांपासून दूर रहातो त्याला सात्त्विक प्रवृत्ती सहज संपादन करता येते. नित्य गरजांत येतात भूक, तहान, निद्रा, आराम, लघवी करणे, शौंच करणे, खाणे, पिणे, शरीराची स्वच्छता, जे शरीराच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक असतात. प्रासंगिक मध्ये येतात, करमणूक, विरंगुळा, खेळणे, उद्योग करणे, उपजिवीकेसाठी काम करणे, छंद जोपासणे इत्यादी. त्यांच्या शरीराच्या गरजेच्या मर्यादा असतात त्यात त्या असल्या तर त्यांचा "मला", त्रास होत नाही. त्या सुरक्षित मर्यादा समजून त्यात जीवाने आपले काम जर केले तर त्या "मला", अध्यात्म साधना करणे सहज असते. अशारितीने त्या गरजा त्या मर्यादेत ठेवण्याने एक प्रकारचा आनंद मिळत असतो. तसेंच त्यामुळें "माझी", अध्यात्म साधना सुरक्षित होत असते. ते करण्यासाठी मनाचे नियंत्रण करावे लागते त्यात जीवाचे सहकर्य आवश्यक असते. ते मिळाले कीं, शरीराच्या गरजांत तो आत्मा गुतत नाही. त्या मनाच्या व बुद्धीच्या धोरणातून ब्रह्माची साधना सहज सोपी होत असते. मन आणि बुद्धी दोनही सवय प्रधान असल्यामुळे तो प्रयत्न प्रामाणिकपणे केला असेल तर ते शक्य होत असते. अशारितीने आत्मा सगळ्या प्रकारच्या मोह माया ज्यामुळे इच्छा उत्पन्न होतात, पासून मुक्त होऊ शकतो. शरीराच्या गरजांना त्या शरीराचे काम करण्यात सोडून तो आत्मा

निर्विकल्प अशा अवस्थेत सदैव राहू लागला कीं, त्याची अध्यात्मिक उर्जा वृद्धिंगत होत असते. कालांतराने त्यामध्ये शरीरसुद्धा सामील होते व त्यामुळे त्याच्या शरीराच्या गरजासुद्धा किमान पातळीवर येऊन ठेपतात. त्यासाठी वेगळी मेहनत घ्यावी लागत नाही. ब्रह्म फक्त कल्पनेने समजून घ्यावयाचे असते. विचार सागरातून त्यासाठी जे विचार आवश्यक असतात ते त्या मनाला अथवा बुद्धीला सुचू लागतात. त्यातून ब्रह्माचे साक्षात्कार होऊ लागतात. असा योगी जास्त काळ ध्यान समाधीत राहू लागतो. त्याला (त्याच्या मनाला व बुद्धीला) त्या अवस्थेत जे ज्ञान (विचार सागरातून) अनुभवास येते ते त्याच्या ज्ञानेंद्रीयांच्या पलिकडले असते म्हणून, तो त्याबद्दल कोणालाही कांहीं सांगू शकत नाही. त्या ज्ञानाला अनुभवसिद्ध ज्ञान असे समजले जाते.

मोक्ष धर्म पर्व भाग एकतिसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग बत्तिसावा

मनु पुढे सांगतो, जीवनात शारिरीक आणि मानसिक दुःख अनुभवले कीं, त्याच्या प्रभावामुळे माणसाची अध्यात्म साधना कुंठीत होण्याची शक्यता असते. मग ती जपजापाची असो अथवा ध्यान साधनेची असो. त्याला असा तोडगा सांगतात कीं, त्या अनुभवाचा जास्त विचार करावयाचा नसतो. एकाद्या गोष्टीचा जास्त विचार केला कीं ती माणसाला व्यसना प्रमाणे चिकटून रहाते त्याचे कारण मन सवयप्रधान असते. त्याला दुःखाचा घोर करणे अथवा सुखाच्या विचारात रमणे ह्याचे व्यसन लागण्याची शक्यता असते. असे कोणतेही व्यसन घातक असते. दैहिक व्यसनांत, दारु, वीडी सिगरेट, गांजा, अफु, तंबाखू, सुपारी, जुगार खेळणे, वेश्यागमन अथवा संभोगाचे व्यसन इत्यादि येतात. अशा व्यसनांमुळे ते पुरुष अशुद्ध ठरतात. स्त्रीस ही दैहिक व्यसने बहुधा नसतात. ह्यांबाबत त्या बहुधा शुद्ध असतात.

मानसिक व्यसनांत मात्र पुरुषांपेक्षा स्त्री जास्त अडकलेली असल्याचे आढळून येते.

मानसिक व्यसने अशी आहेत, सतत काळजी करीत रहाणे, दुःखी रहाणे, संशय घेत रहाणे, काल्पनिक चिंतेत रमणे, रडणे, भांडखोरपणा, मत्सर करणे, जर स्त्री ह्या मानसिक व्यसनातून मुक्त झालेली नसेल तर त्या स्त्रीचे मृत्यूनंतरचे जीवन नरकासमान असेल.

पुरुषाला ही मानसिक व्यसनेसुद्धा सतावत असतात. दुःख असो अथवा सुख असो त्याचा विचार न करता ते सहजपणे घेण्याची सवय करावी लागते योग्याला तरच तो त्याची साधना यशस्वी करू शकतो. तारूण्य, वैभव, सौंदर्य, उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य अशा मोहात टाकणार्या गोष्टींचा हव्यास त्याला नसावा. त्यांच्या नश्वरतेचा विचार त्याच्या मनात प्रथम आला पाहिजे ज्यामुळे तो त्यांचा नाद लावून घेणार नाही. जीवनात अपेक्षाभंगाचे अनुभव जास्त असतात त्यांकडे पाहून तो त्याचा मोक्षमार्ग कसा जास्त श्रेयस्कर आहे ते स्वताला सांगत असला पाहिजे. ज्याने सुख आणि दुःख ह्यांचा हव्यास सोडला तो ब्रह्मवादी जास्त चांगला होतो. त्यासाठी जीवनातील सगळे अनुभव तो औदासिन्याच्या दृष्टीने पहात असेल. अशा अवस्थेत ज्याचे मन गेले आहे तो चांगला योगी ठरतो.

कशाचीच अपेक्षा नसलेला कांहीं मिळाले अथवा नाही मिळाले ह्याचा घोर करत नाही. त्याच्यासाठी त्या सगळ्या गोष्टी नगण्य असतात. त्यात शरीराची दुःख आणि सुख असे दोनही येतात. अशारितीने सगळ्या ऐहीक गोष्टींची तो अपेक्षा सोडून देतो त्याचे मन ध्यान करण्यासाठी तयार झाले असे समजावे. शरीराच्या सुखाचा अथवा दुःखाचा तो (आत्मा) विचार करत नाही म्हणजे त्यात गुंतत नाही. इतर कोणत्याही गोष्टींच्या कल्पना न करता तो ब्रह्माची कल्पना सदोदीतपणे करत असेल, त्याची सवय त्याला लागली कीं तो फक्त ब्रह्माचाच विचार करत असेल, त्याचाच त्याला हव्यास लागेल, ते सवयीने जमते. असा योगी ब्रह्माची आळवणी करत असेल ज्याची तो फक्त कल्पना करत असतो. त्याच्या ब्रह्माबद्दलच्या कल्पना जरी काल्पनिक (खोट्या) असल्या तरी चालेल. त्या अतिरंजीत कल्पना त्याला सत्याकडे जाण्यास मदत करणार्या असतात. तो कवी मनाचा असेल तर तो त्या कल्पनांवर आधारित कवन करत असतो जशी कवन (साम) वेदात आहेत. विशेष म्हणजे त्याच्या ब्रह्माबद्दलच्या कल्पना पुढे खर्या असल्याचा विलक्षण अनुभव त्याला येतो. ब्रह्म अव्यक्त स्वरुपात असल्याने त्याचे कोणतेही काल्पनिक (व्यक्त) स्वरुप त्या साधकासाठी वास्तविक होत जाते. त्यात तो रमतो व त्याची ब्रह्मसाधना यशस्वी होते. तेथे कांहीं खरे अथवा खोटे नसते. वस्तुतः सगळे ब्रह्मांड भ्रम असल्याने ते शक्य होते. त्यामुळें दहाजणांच्या दहा कल्पना त्यांच्या त्यांच्या साठी खर्या ठरत असतात. ते समजल्यानंतर कोणी जाणकार त्यांतील भेदावर खर्या खोट्याचे वाद घालत नाहीत. ते एकमेकांना सांगतात, तसे तुझ्यासाठी व ते तुझ्यासाठी खरे आहे. कितीही भिन्न असल्या त्या संकल्पना तरी त्या सगळ्या त्यांच्यासाठी खर्याच असतात. त्याने कांहीं बिघडत नाही. कारण वास्तविक पातळीवर ब्रह्माला कोणतेही निश्चित स्वरुप नसते. वास्तविक जगात एकादी गोष्ट समजण्यासाठी त्याचे गुण अथवा त्याची लक्षणं सांगावी लागतात पण जर एकाद्या गोष्टाला (ह्या ठिकाणी ब्रह्माला) कांहींच लक्षणं नसतील ते कसेही केले तरी सांगता येत नाही त्यामुळे त्याच्या अस्तित्वावर संशय घेणारे चार्वाक पुढे येतात. त्यांचे समाधान करणे शक्य नसते, अशावेळी सूज्ञ योगी गप्प बसतात. ब्रह्म अनुभवसिद्ध आहे ते प्रयोगसिद्ध नाही त्यामुळे त्याची ग्वाही कोणी देऊ शकणार नाही. प्रयोगसिद्ध त्या बाबी

असतात ज्यांना गुण लक्षणं असतात. त्यांना वास्तविक स्वरुप असते. ब्रह्माला ते नसल्याने त्याच्या वरून अनेक शब्दवीर वादंग माजवतात. त्यात योग्याने भाग घेऊ नये.

जो योगी समाधी अवस्थेत जाऊ शकतो व नेहमी त्या अवस्थेत जाणे पसंत करतो तो स्वर्गात सदेह जात असतो त्या समाधी अवस्थेत.

सात्त्विक साधकाला ब्रह्मात परमेश्वर दिसतो परंतु, तामसी साधकाला त्या ठिकाणी सैतान दिसत असतो. म्हणजे त्याच्यासाठी सैतान ब्रह्म असतो. प्राचीन काळी जे महाबली दैत्य, असुर देवांना आव्हान देत होते ते अशामुळेंच तयार झाले होते. ते तामसी असतांनाच जपजापाची साधना तीव्रतेने करत होते. असे त्यांच्या कल्पनेचे परिणाम असतात. तसे होऊ नये ह्यासाठी साधकांनी प्रथम सात्त्विक होणे अगत्याचे असते. नाहीतर तो त्याच जपजापाच्या अथवा ध्यान योगाच्या मुळे स्वर्गाऐवजी नरकात जात असतो.

मोक्ष धर्म पर्व भाग बत्तिसावा संपला

# मोक्ष धर्म पर्व

## भाग तेहतिसावा

मनु सांगतो, जेव्हां पंचेंद्रिय आणि मन ह्यांचे एकत्र होणे शक्य होते तेव्हां त्या साधकाला आत्म्याचे दर्शन होते म्हणजे प्रत्यक्ष लिंगदेहाचे स्वरुप समजते. ते दर्शन त्याच्या समजूतीप्रमाणे असते. म्हणून निरनिराळ्या साधकांला निरनिराळ्या रुपात ते होत असते. कांहींना गाय दिसते, कांहीना घोडा दिसतो, कांहींना हत्ती तर कांहींना इतर कोण्या प्राण्याच्या अथवा वनस्पतिच्या रुपात ते दिसते. कधी माणसाच्या रुपात सुद्धा होऊ शकते. मातीत वाढणारी वनस्पति त्या मातीतून तिला जे पोषक द्रव्य पाहिजे ते घेत असते त्याप्रमाणे साधकाच्या मनस्थितीनुसार त्याला ते दर्शन होत असते. म्हणजे असे दर्शन सापेक्ष असते. निरपेक्ष साक्षात्कार होत नाही. त्यावर त्या साधकाच्या लिंगदेहाच्या गतजन्माचे सुद्धा परिणाम होत असतात. असे दर्शन बहुधा गाढ निद्रेच्या अवस्थेत विशेष होत असते. असें म्हणतात कीं, माहितीतून इच्छा उत्पन्न होते, इच्छेतून त्यासाठी कार्य होते, त्यानंतर त्याची फलनिष्पत्ती होते असा क्रम असतो घटनांचा. त्या सगळ्यां मागे आत्म्यच्या प्रेरणा असल्या पाहिजेत. ब्रह्माची प्राप्ती करण्यासाठी इतर सगळ्या कर्मांचा त्याग करावा लागतो. कारण ती करत असतांना ब्रह्मसाधना करणे शक्य नसते. माणसाची सगळी ताकद त्या इच्छा पूर्ण करण्यात खर्ची होत असते.

ब्रह्माच्या प्राप्तीसाठी सगळी इतर कर्मे थांबवावी लागतात. त्याची सगळी अध्यात्मिक उर्जा त्या एका उद्देशासाठी लावावयाची असते. नेहमीच्या साधारण मार्गाने ते साध्य होण्यासारखे नसते. त्यासाठी ज्याला ब्रह्माची उपासना करावयाची त्याला ऐहिक जीवनाचा त्याग करून तो संन्यासी झाला पाहिजे. गृहस्थाश्रमी, वानप्रस्थाश्रमी ते करू शकत नाही. कोणी म्हणेल कीं, तो ऐहिक सौख्य आणि ब्रह्म असे दोनही एकाच वेळी साध्य करेल तर ते शक्य नसते. म्हणून सामान्यता ब्रह्माला मनुष्य केवळ कल्पनेनेच समजू शकतो जर तो अंधश्रद्धा ठेवून त्याची कल्पना करत असेल. ऐहिक जीवनातील बर्या वाईट अनुभवाने त्रासलेला मनुष्य अंतिम ध्येय म्हणून ब्रह्माच्या साधनेत जात असतो

कारण त्याला ऐहिक सुखांचा कंटाळा आलेला असतो. जोवर त्याला ऐहिक गोष्टीत गम्य आहे तोवर तो ब्रह्माच्या साधनेसाठी नालायक असतो.

मोक्ष धर्म पर्व भाग तेहतिसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग चौतिसावा

युधिष्ठीर विचारतो, "अहो पितमहा, तुम्ही बरेच कांहीं जाणता ह्या सृष्टीच्या नियामकाबद्दल त्यात कमलनयनी विष्णू सर्वश्रूत आहे ज्याने सगळे उत्पन्न केले परतु, त्याला कोणी उत्पन्न कलेले नाही. त्याची अनेक नांव आहेत जसे नारायण, हृषिकेश, गोविंद, केशव इत्यादी, मला त्या नियामका बद्दल तुम्हाला जे ठाऊक आहे ते सांगा".

भिष्म सांगू लागतात, "मला त्याची माहिती जमदाग्नीचा मुलगा परशुराम ह्यांने सांगितली आहे, ती मी तुला सांगतो. त्याला त्याची माहिती दैवी ऋषी नारद आणि कृष्ण द्वैपायन ह्यांच्याकडून मिळाली आहे. त्याशिवाय महाऋषी असित-देवल, वाल्मिकी, मार्कंडेय हेसुद्धा केशवाबद्दल नेहमी बोलत असतात. तो सगळ्या शक्तिमान देवतांत सर्वात जास्त प्रभावी समजला जातो. त्यालाच काश्यप ऋषी पुरुष म्हणून बोलतात. त्यातून अनेक ऋषी उत्पन्न झाले आहेत असे समजले जाते. त्या सारंगधारीचे अनेक गुण ते सांगत असतात. प्राचीन कथा जाणणारे लोक अनेक उत्तम गुण त्यात असल्याचे सांगतात जेव्हां ते त्याची स्तुती करतात. तो मनसाचे व्यक्त रुप आहे असें समजले जाते. म्हणजे तो पूर्ण ब्रह्म आहे. तो स्वयंभू आहे तरी अनेक मानवी अवतार घेत तो ही सृष्टी चालवत असतो. त्याच्यातून चैतन्य सगळीकडे पसरले आहे. म्हणून तो सगळ्या चराचरांचा स्वामी समजला जातो. चैतन्याला कार्यक्षम रहाण्यासाठी बुद्धी आणि मन असावे लागते ते त्यानी सगळ्या चराचरांत उत्पन्न केले त्याच्या अमानवी सामर्थ्याने. त्याने वास्तविक काळ उत्पन्न केला ज्यामुळे आज, काल व उद्या असे आपण समजू लागलो. तो विचार सागरात ज्याला कौतुकाने ऋषी क्षीरसागर म्हणतात पहुडला आहे. त्याच्या नाभीतून जे कमळ बाहेर आले त्यावर ब्रह्मदेव विराजमान झालेले दिसत असतात. अरे युधिष्ठीरा, ह्या सगळ्या कवीमनाच्या कल्पना आहेत, खरे कोणालाच माहित नसते. त्यानंतर चांगल्या आणि वाईट गुणांचे अनेक देव व दैत्य तयार झाले. त्याच्यात गुणावरून युद्ध सुरू झाली. त्यामध्ये मधू हा तमोगुणाचा अवतार उत्पन्न झाला होता. त्याचा संहार विष्णूने केला म्हणून त्याच नांव झाले मधूसुदन (मधूचा नाश करणारा). त्यानंतर ब्रह्माने सात मुलगे त्याच्या कल्पनेने तयार

केले त्यांना सप्तर्षी असे म्हणतात. त्यांची नांव आहेत, मरिची, अत्री, अंगिरस, पुलस्त्य, पुलह, कृता आणि दक्ष. त्यातील मरिचीला त्याच्या विचारांतून काश्यप झाला. काश्यपा आधी ब्रह्मच्या पायाच्या आंगठ्यातून दक्ष नांवाचा नकारात्मक उर्जा असलेला तमोगुणाचे लक्षणं असलेला दैत्य तयार झाला होता. त्या दक्षाला तेरा मुली झाल्या. त्या एकत्र झाल्या होत्या. त्यानंतर त्याला आणखीन दहा कन्या झाल्या. दक्षाने त्या दहा मुली यमाला दिल्या. त्यांतून वसू, रुद्र, विश्वदेव, मरुत आणि साध्य जन्मले. दक्षाला त्यानंतर आणखीन सत्तावीस कन्या झाल्या. त्या दक्षाने चंद्राला पत्नी म्हणून दिल्या. काश्यपाच्या इतर बायकांनी गंधर्व, घोडे, पक्षी, गुरं ढोरं, कपुरूष, मासळी, वनस्पति अशा प्रजाती उत्पन्न केल्या. ब्रह्मदेवाची मुलगी अदितीने आदित्य निपजले. जे महत्वाचे देव होते. त्यांच्यामध्ये विष्णूने गोविंद म्हणून जन्म घेतला. त्याच्या सामर्थ्यामुळें देवांची ताकद वाढली. त्यांने दानवांचा पाडाव केला. ब्रह्मदेवाची कन्या दानु पासून दानव उपजले. त्यातून असुर, राक्षस उपजले जे फार शक्तिमान होते. त्याच वेळी ग्रहगोल एकमेकांभोवती फिरू लागले ज्यामुळे दिवस व रात्र ह्यामध्ये काळाचे मोजमोप सुरू झाले. त्याच प्रमाणे मोसम, ऋतू उत्पन्न झाले. त्यानंतर इतर अनेक वास्तविक गोष्टी जसे ढगं, विजांचे कडकडाट, सकाळ आणि संध्याकाळ असे घडू लागले. सगळे जग तो त्याच्या अफाट शक्तितून तयार करत असतो. त्यानंतर तो गोविंद त्याच्या मुखातून शेकडो ब्राह्मण, हातातून शेकडो क्षत्रिय मांडीतून तसेच अगण्य वैश्य तयार करतो. त्यानंतर त्या तीन द्विजांना मदत करण्यासाठी असंख्य शुद्र त्याच्या पायातून उत्पन्न करतो. त्यांचे नियंत्रण करण्यासाठी त्यांनी धात्री तयार केली जी त्यांना मार्गदर्शन करणार होती कीं, ते त्यांचे कर्तव्य कसे पार पाडतील. सगळ्या दैवतांचे व भूतांचे मार्गदर्शन करण्यासाठी त्याने विरुपाक्ष उत्पन्न केला. त्यावेळी त्याने मत्रिका (स्त्री देवता, मातारुपी देवता) उत्पन्न केल्या त्याच्या कल्पनेतून. त्याशिवाय कुबेर अथवा वैश्रावण जो वास्तविक धनाची देवता म्हणून काम करणार असते ती त्यानी उत्पन्न केली. ज्याचे काम राक्षस प्रजातीचे नियंत्रण करावयाचे होते कारण वास्तविक धन ही राक्षसांची जबाबदारी समजली गेली होती. त्याने वरुण देव निर्माण केला जो पाण्याचा देव होता. त्याच्या अधिकारात सगळे जलचर आले होते. सगळ्या देवयोनी तयार झाल्यावर त्यांचा मुख्य म्हणून इंद्र असे एक स्थान तयार केले गेले त्यावर योग्य देवाची नेमणूक होत

असे. त्या कृतयुगाच्या प्रारंभीच्या काळात मनुष्य त्याला हवे तितका काळ जगत असें. त्यांना मृत्यूची भिती नव्हती. त्याकाळात लैंगिक संबंध व त्या द्वारा जनन होत नसे. त्या काळात केवळ इच्छेने प्रजनन होत असे. त्या काळातील माणसाची इच्छा शक्ती फार प्रभावी होती. त्या काळात माणसे बहुधा सात्त्विक गुणाची होती. त्यानंतर माणसाच्या इच्छा वाढत गेल्या व त्रेतायुग अवतरले. त्या युगात पतिपत्नी केवळ इच्छा करून एकमेकांना स्पर्श करत व त्यांना संतति होत असे. त्या युगातील लोकांना लैंगिक वासना नव्हत्या. तो काळ संपला व आता तिसरे युग अवतरले. द्वापार युगात परिस्थिती बदलली. त्या युगात माणसाच्या वासना वाढल्या व लैंगिक संभोगाची आवश्यकता भासू लागली. त्या काळात मद, मत्सर, मोह ह्या दोषांचे प्रमाणसुद्धा वाढले. समाज व्यवस्था असण्याची आवश्यकता भासू लागली व त्याप्रमाणे नियम तयार झाले. मी तुला जगाच्या स्वामीचे कार्य सांगितले. त्याच्या बरोबर समाजाच्या भल्यासाठी राजाची आवश्यकता भासू लागली. आता मी तुला सांगणार आहे पाप कसे वाढत गेले. मी काय सांगतो ते नीट ऐक. भरत भूमीत दक्षिणेकडे अंध्र, गुह, सवर, हुचुक आणि मद्रक असे लोक होते. उत्तरेकडील भागात यवन, कंबोज, पुलिंद. गांधार, किराट आणि बरबर असे लोक रहात होते. ते सगळे पापं करत होते. ते सगळ्या पृथ्वीवर गिधाडांसारखे फिरत असतं व जेथे जात तेथे पापं करत असतं. कृत युगात ते नव्हते. त्यांची निर्मिती त्रेता युगात झाली. ते त्यानंतर सर्वदूर पसरत गेले. त्यांच्यातील क्षत्रिय एकमेकांशी लढू लागले. अशाप्रकारे कृष्णाचे जग सुरू झाले. नारदमुनी सांगतात कीं, कृष्ण सर्वश्रेष्ठ देव आहे. तो पूर्णावतार आहे. तो कमलनयना सामान्य मनुष्य नाही. तो ब्रह्माचा मनुष्य अवतार आहे. त्याला समजणे सोपे नाही.
मोक्ष धर्म पर्व भाग चौतिसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग पस्तिसावा

युधिष्ठीर विचारतो, "प्रजापति कोण आहेत ते सांगा. ते किती आहेत? ते कोठे रहातात? त्यांना कोणी उत्पन्न केले"?

भिष्म सांगतात, "ऐक मी काय सांगतो ते, ते प्रजापति कोण ते सांगतो. त्यानंतर त्या सात ऋषींची माहिती सांगतो, जे हे जग चालवत आहेत. तुला माहित आहे कीं. सुरूवातीला एक ब्रह्मांड होते. त्यांने सात ऋषी त्याच्या कल्पनेने उत्पन्न केले. त्यांना शरीरं नव्हती ते विचाराच्या परिमाणात होते. त्या सात ऋषींची नांव आहेत, मरिची, अत्री, अंगिरस, पुलस्त्य, पुलह, कृत, आणि वसिष्ठ. वसिष्ठ मनूसारखे श्रेष्ठ होते. त्या सात मुलांचा उल्लेख सगळ्या पुराणात आहे. आता मी सांगणार आहे ते सगळे प्रजापति ज्यांना ब्रह्माने उत्पन्न केले. अत्रीच्या कुळात त्याच्या तपस्येतून वर्ही तयार झाला तो पहिला प्रजापति. त्याच्यामधून दहा प्रचेता उत्पन्न झाले. त्यात मुख्य आहे दक्ष. शेवटचे दोन आहेत त्यात दक्ष आणि काश्यप आहेत. मरिचाला सुद्धा एक मुलगा आहे त्याचे नांव सुद्धा आहे काश्यप. त्याची आणखीन नांव आहेत, अरिष्ठनेमी आणि काश्यप. अत्रीला आणखीन एक मुलगा होता तो सोम म्हणून ओळखला जात होता, फार देखणा व तेजस्वी होता. त्याने हजार युग वर्षे तपस्या केली होती. त्याला आर्यमन आणि आणखीन दोन मुलगे होते. ते सृष्टीचे नियम तयार करतात आणि चराचरांचे संरक्षण करतात. ससविंदूला दहा हजार बायका होत्या. त्या प्रत्येकीला त्याच्या पासून एक हजार मुलं झाली होती. अशारितीने ते सगळे एक लक्ष झाले होते. ते सगळे स्वताला प्रजापति समजत होते. त्यांच्या वंशातून वृश्नी कुळ उत्पन्न झाले. हे जे मी सांगितले ते ख्यातनाम प्रजापति आहेत. त्यानंतर मी तुला त्या सगळ्या अधिकृत देवतांची माहिती देणार आहे ज्या ह्या सृष्टीचे व्यवस्थापन करत असतात. भग, अंश, आर्यमन, मित्र, वरुण, सावित्री, धात्री, विवस्वात, त्वश्त्री, पुशान, इंद्र आणि विष्णू बारावा त्यांचा उल्लेख आदित्य म्हणून सुद्धा केला जातो. ते सगळे काश्यपातून निघाले आहेत. नसत्र आणि दस्त्र हे आश्विनी कुमार म्हणून ओळखले जातात. ते मार्तंडाचे मुलगे आहेत असे सांगतात. त्यांना पहिले देव म्हणून ओळखले जाते. त्यानंतर येतात

पितर. त्वश्त्रीला अनेक मुलगे झाले. त्यातील विश्वरुप,. अजैकपात, अही, भ्रद्ध, विरुपाक्ष आणि रैवत असे ते फारच देखणे होते.  त्यानंतर आहेत हर, विहुरुप, त्र्यैंबक, सवित्र्य, जयंत आणि पिनाकी हे अजिंक्य देव आहेत. ती सगळी मार्तंडाची रुप आहेत असे ऋषी सांगतात. त्यानंतर आहेत आठ वसू त्याचा उल्लेख मी आधी केला आहे. ते प्रजापतिच्या बरोबरीचे देव आहेत. सिद्ध आणि साध्य प्रकारच्या दैवतात दोन आहेत त्यांना रूभू आणि मरुत अशी नांव आहेत. त्यातील आदित्य, विश्वास हे क्षत्रिय समजले जातात. मरुत वैश्य समजले जाता, दोनही अश्विनी कुमार शूद्र समजले जातात. म्हणजे ते इतर देवांना मदत करणारे आहेत. ते स्वतः कोणतेही काम करत नसतात. ते सदैव तपस्येत गुतलेले असणार. अंगिरसाच्या तेजातून आलेले सगळे ब्राह्मण वर्णाचे धरले आहेत. अशारितीने देवांचे चार वर्ण तुला सांगितले. प्रातःकाळी उठल्यावर जे त्या देवांचे स्मरण करतात त्यांची त्या दिवसाची सगळी पापं धुतली जातात असें सांगतात मग, ती मुद्दाम केलेली असावीत अथवा अनवधानाने झालेली असतील. यवकृति, रैव, अर्ववसू, पर्ववसू, औसिज, कशिवत, वल ही अंगिरसाची मुलं आहेत. त्याशिवाय कण्व मेधातिथीचा मुलगा, वर्हीशद, आणि ते सात ऋषी असें सगळे पूर्वेकडे असतात. उन्मुख, विमुख, स्वस्त्यात्रेय, प्रमुख, इध्मवह, धृदावर्त, मित्रवरुणाचा मुलगा अगस्त्य, हे दक्षिणेकडे असतात. उपंगु, करूश, धौम्य, परिव्याध, एकत, द्वित, त्रित आणि अत्रीचा मुलगा सारस्वत पश्चिमेकडे असतात. अत्रेय, वसिष्ठ, काश्यप, गौतम, भारद्वाज, विश्वामित्र आणि जमदाग्नी असे सातजण उत्तरेकडे असतात. अशारितीने मी तुला ते ऋषी जे सृष्टी चालवण्याचे काम करतात त्यांच्या दिशा सांगितल्या. त्यांच्या नांवाचे मंत्र गायल्याने तुझी सगळी पापं धुतली जातात.

मोक्ष धर्म पर्व भाग पस्तिसावा संपला,

# मोक्ष धर्म पर्व

## भाग छत्तिसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "मला श्री कृष्णाबद्दल सगळी माहिती ऐकावयाची आहे तुमच्या कडून कारण तुम्ही ते सगळे जाणता. त्याने कांहीं अवतारात प्राण्याचे रुप धारण केले होते त्याचे कारण काय ते मला सांगा".

भिष्म सांगतात, "पूर्वी एके काळी मी शिकार करण्यासाठी गेलो असता मार्कंडेय ऋषींच्या आश्रमात पोहोचलो होतो. तेथे हजारो संन्याशी बसलेले होते. ऋषीनी मला मध आणि दही देऊन माझे स्वागत केले. ते सेवन करून मी त्याना नमस्कार करून बसलो. तेथे जे काश्यप सांगत होते तेथे जमलेल्या बैराग्याना ते मी तुला आता सांगतो. ते नीटपणे ऐकून समजून घेण्याचा प्रयत्न कर. फार प्राचीन काळी प्रमुख दानव जे क्रोध आणि मोहात अडकलेले असतं, त्यांना मद्यादि मादक पेयांचा नाद होता, असें ते हजारो दानव जे अजिंक्यसुद्धा असतं, ते देवांच्या समृद्धीमुळें फार मत्सर करत होते देवांचा. त्यांना शांत करण्यात अपयशी झालेले स्वर्गीय ऋषी त्यांच्यापासून पळून गेले होते. देवांना पृथ्वी एका विषण्णावस्थेत गेलेली दिसत होती. दानवांच्या पापमय कृत्याने भारभूत झालेली पृथ्वी दुःखी झाली होती. असे वाटत होते कीं, जर असेंच होत राहिले तर तिचा नरक होईल. आदित्य देवांना सुद्धा भय वाटू लागले व ते ब्रह्माकडे त्याची त्यांनी दखल घ्यावी म्हणून विनंति करण्यासाठी गेले. ते ब्रह्माला विचारतात, "अहो ब्रह्मा आम्ही हे दानवांचे चाळे आणखीन किती काळ सहन करावयाचे"? त्यांना ब्रह्म बोलतात, "मी त्याचा बंदोबस्त करण्याची व्यवस्था आधीच केली आहे. महादेवाकडून अनिर्बंधपणे मिळणारे आशिर्वाद दानवांची अरेरावी वाढवत आहेत. दानवांची तपस्या करण्याची व अध्यात्मिक उर्जा वाढवण्याची क्षमता त्याला कारणीभूत आहे. ते तपस्या करून जी अध्यात्मिक उर्जा संपन्न करतात ती वाईट कामासाठी ते दानव वापरत असतात. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी विष्णू एका डुकराचे रुप घेऊन त्यांचा परामर्श घेण्यासाठी येत आहे. तो त्या वराह रुपात दानवांच्या जमिनी खालील निवासस्थानी जाणार आहे. त्यांचा तो तेथे नाश करणार आहे. ते ऐकून देव आनंदी झाले. यथावकाश विष्णू वराह रुपात तेथे गेला. तेथे सुरक्षितपणे

लपलेल्या दितीच्या मुलांवर तो हल्ला करतो. त्या विलक्षण प्राण्याला, जो त्यांनी आधी कधी पाहिलेला नव्हता मारण्यासाठी ते सज्ज होतात. ते त्या वराहावर चोहोबाजूने हल्ला करतात. ते प्रचंड आकाराचे त्याला आवरू शकत नाहीत. त्यांना समजते कीं, हा कोणी असा प्राणी आहे ज्याच्या पासून आपण संरक्षण महादेवाकडे मागितलेले नाही . ते लक्षात आल्यावर ते घाबरतात. त्यांना समजते कीं, त्यांचा अंत काळ आला आहे. वराह रुपातील विष्णू योग ध्यानात गेला व मोठ्याने गर्जना करू लागला. त्यामुळे तेथे असलेले सगळे दानव आणि दैत्य आणखीनच घाबरून गेले. त्याच्या गर्जनेने सगळ्या दिशा हादरून गेल्या. त्या आरोळ्याने देवसुद्धा घाबरले. इंद्रसुद्धा भयचकीत झाला. त्या गर्जनेमुळे सगळ्या जगात भितीचे वातावरण पसरले. दानव मरून पडत होते त्या आवाजाने. त्या अवतारातील विष्णूला ऋषी सनातन म्हणून बोलू लागले. विष्णूचे नांव पद्मनाभ झाले. तो सगळ्या योग्यांचा अधिपति झाला. त्यानंतर सगळे देव ब्रह्माकडे जातात, त्याला विचारतात कीं, हा असा कोणता आवाज होत आहे? हा कोणता प्राणी आहे ज्याच्या आवाजाने सगळी पृथ्वी बधीर झाली आहे"? त्या आवाजाने दानवांबरोबर देवसुद्धा बधीर झाले आहेत. ते विचारत असतांना त्यांना विष्णू त्याच्या खर्या रुपात दिसू लागतो. त्याची स्तुती स्वर्गातील ऋषी करत होते. ब्रह्मदेव बोलतात, "ही सर्वश्रेष्ठ देवता आहे, योग्यांचा योगी आहे, त्याने प्रमुख दानव मारले आहेत, त्यामुळे तो सगळ्या चराचरांचा स्वामी झाला आहे. तो सगळ्या बैराग्यातसुद्धा श्रेष्ठ आहे. तो कृष्ण आहे. सगळ्या पाप करणार्यांचा नाश करणारा आहे. त्या पापकर्त्यांचा नाश करून तो त्याचे पवित्र रुप घेऊन तुमच्या पुढे आला आहे. तो सगळी पृथ्वी धरून आहे. ज्या गर्जनांनी तुम्ही घाबरला होता त्या गर्जना हा करत होता दानव आणि दैत्यांना आव्हान देत असतांना. तोंच सगळ्या चराचरांचे उगमस्थान आहे.

मोक्ष मार्ग पर्व भाग छत्तिसावा संपला.

# मोक्ष मार्ग पर्व

## भाग सदोतिसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "मला सांगा, त्या योगसाधनेबद्दल ज्याच्या योगांने मनुष्य मोक्ष गाठू शकतो".

भिष्म सांगतात, "त्यासाठी मी तुला तो संवाद ऐकवतो जो एक गुरू आणि त्याचा मोक्षार्थी शिष्य ह्यांच्यामध्ये झाला होता. ते असे झाले, एका महान ज्ञानी ऋषीच्या चेल्याला मोक्षमार्गाबद्दल ज्ञान पाहिजे होते तो त्याचे पाय धरून बोलला कीं, "अहो तात, जर मी केलेली सेवा योग्य असेल तर मला मोक्षमार्गाची माहिती द्यावी. मला त्यासाठी प्रथम सांगा, मी कोण आहे व त्याचवेळी आपण कोण अहात? वेदाप्रमाणे सगळ्याचा उगम एकातून आहे तरी त्यांत असे भेद का उत्पन्न झाले आहेत? त्याचे कारण काय आहे? आपण सगळे एकाच प्रजातीचे असलो तरी त्यांत चार वर्ण कां तयार झाले? त्यांची कर्तव्ये विविध आहेत व त्याची कर्मकांडेसुद्धा विविध आहेत असें का ठरवले गेले व ते कोणी ठरवले"? ते ऐकल्यावर तो महान ऋषी त्याला सांगतो कीं, "ऐक मी काय बोलतो ते, त्यात मोठे ज्ञान आहे. तू जो प्रश्न विचारला आहेस त्यावर वेदांत मोठी चर्चा झाली आहे. त्यालाच अध्यात्म ज्ञान असे समजले आहे. ते सगळ्या ज्ञानात श्रेष्ठ ज्ञान आहे. सृष्टीच्या प्रारंभी एकच वर्ण होता व तो होता ब्राह्मण वर्ण. परंतु, शरीराच्या नित्य आणि प्रासंगिक गरजा जीव पुरवत असतांना त्यामध्ये कांहीं आत्मे गुंतले त्यांच्या अहंकारामुळे. तेथून त्या आत्म्यांचा र्हास सुरू झाला. त्याप्रमाणे त्यांचे त्यांच्या पुढच्या जन्मात वर्ण बदलत गेले जितका तो आत्मा त्या शरीराच्या वासनांमध्ये गुंतला होता. अशारितीना क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र वर्ण उपजले जसे त्या वासनांत गुंतणे होते. प्रथमतः मूळ स्वरुपात मनुष्य सत्य, ज्ञान, त्याग, संयम, चांगुलपणा, माणूसकी, भूतदया हे गुण घेऊन जगत होता परंतु, त्याचा अहंकार त्यात भेद करण्यास कारणीभूत होता व त्याप्रमाणे त्या त्या व्यक्तीमध्ये निरनिराळे दोष उत्पन्न झाले जे घेऊन तो त्याच्या पुढच्या जन्मी येत होता. ज्यांनी ते सगळे गुण उत्तम प्रकारे सांभाळले ते पुनः पुनः ब्राह्मण म्हणून जन्म होते परंतु, ज्यांच्यात दोष उत्पन्न झाले ते कांहीं क्षत्रिय, कांही वैश्य व कांहीं शूद्र म्हणून जन्मत गेले व ते चार वर्ण तयार झाले. आता

मी तुला त्या भगवंताचे सांगतो ज्याने वृश्नी वंशात जन्म घेतला. जगाच्या उद्धारासाठी त्याने अवतार घेतला होता. त्याच्यातून पितर तयार झाले होते. त्याच्यातूनच देव, ऋषी, यक्ष, राक्षस, नाग, असुर आणि मनुष्य उत्पन्न झाले आहेत. त्यांच्या त्यांच्या अध्यात्मिक योग्यतेनुसार त्या त्या प्रजाती त्याच्यातून तयार होत होत्या. युगाच्या प्रारंभी माया म्हणजे भ्रमसृष्टी त्याने तयार केली म्हणजे त्यामध्ये तो त्याची हि विविध रुप वास्तविक रुपात व्यक्त करू शकेल. निरनिराळ्या युगांच्या गरजेनुसार त्यांची रुपसुद्धा भिन्न होती. युगांताच्या वेळी वेदसुद्धा विसरले जातात. परंतु, कांहीं ऋषी त्यांच्या तपोबळाच्या ताकदीने त्यांचे अस्तित्व राखून असतात त्यात आहेत मार्कंडेय, नारद व ते पुढच्या युगासाठी सगळ्या गोष्टींची तजविज करतात. ते वेद पुन्हा नव्या अवतारात त्या येणार्या युगाच्या रचनेनुसार ते ऋषी पुन्हा सादर करतात.

भृगुचा मुलगा शुक्र प्रथम नैतिक शास्त्राचे पाढे तयार करतो, नारद संगीताचे करतो, शस्त्रांचे आयुधांचे शास्त्र भारद्वाज करतात, स्वर्गाचे नियम ऋषी गार्ग्य ठरवतात, आयुर्वेद अत्रीचा कृष्ण वर्णी मुलगा ठरवतो, इतर ऋषी सगळी तत्त्वज्ञानाची जसे न्याय, वैषेशिक, सांख्य, पतंजल ठरवतात. तरी सुरूवातीला ऋषी व देव ब्रह्माला समजू शकत नव्हते. नारायण ह्या ऋषीने प्रथम ते ओळखले. त्याला दुःखाचे व सुखाचे जीवनाशी असलेले संबंध शोधून काढले. ते आहे इच्छा जे अहंकाराचे लक्षण आहे. त्या मायेच्या माध्यमातून अध्यात्मिक उर्जा असंख्य आत्मे ज्यांना अहंकार आहे ते तयार करते. अध्यात्मिक उर्जा स्वतः चैतन्यमय असल्याने त्यांत चैतन्य असते. पुढे ते आत्मे मायेच्या लिलेने देह धारण करतात. अशारितीने सृष्टीत जीवन सुरू होते. त्या सगळ्या लिलेला प्रकृती असे सांगितले आहे. कांहीं त्यास माया असे म्हणतात. त्यात पंचमहाभूत तयार झाले. अस्तित्व हा सृष्ठीचा गुण आहे तो हे सगळे घडवत असतो. त्यात मनसा ऋषीचा अंश आत्मा बंधिस्त असतो. म्हणून त्याला पुनः पुन्हा जन्म घ्यावे लागतात. असे समजते कीं, लिंगदेहाच्या माध्यमातून आत्मा पहाण्याचे, ऐकण्याचे, स्पर्श करण्याचे, रुची आणि गंध असे सगळे ज्ञानदायी कार्य तो करत असतो. शरीरातील आत्मा योग साधनेच्या माध्यमाने व्यक्त करता येतो. म्हणून योग साधना श्रेष्ठ समजली जाते. जेव्हां प्राक्तन ठरवते कीं, आत्म्याने शरीर सोडावे तेव्हां तो लिंगदेहाने बंधिस्त असलेला आत्मा तो देह सोडून निघतो त्या

अव्यक्त जगात जेथे देव रहातात. जेव्हां लिंगदेहाच्या जोखडातून तो मुक्त होतो तेव्हां तो खर्या अर्थाने मुक्त होतो. ते सगळे त्याच्याच कर्माचा परिणाम असतो. त्याबद्दल मी तुला नंतर सांगेन.

मोक्ष मार्ग पर्व भाग सदोतिसावा संपला.

# मोक्ष मार्ग पर्व

## भाग अडोतिसावा

भिष्म पुढे सांगतो, "सगळे चराचर जे चार प्रकारात धरले आहेत ते व्यक्त आणि अव्यक्त अशा जन्म मृत्यूने ग्रासलेले असतात. आत्म्याचे अव्यक्त रुप मनाच्या व बुद्धीच्या अभिव्यक्तीने समजत असते. परंतु, ते शुद्ध नसते कारण, त्यात लिंगहाचा अविर्भाव असतो. आत्म्याकडून होणार्या अध्यात्मिक उर्जेच्या अविरत पुरवठ्यामुळें शरीर व त्याची इंद्रिय काम करतात ज्यांच्या वास्तविक अस्तित्वासाठी मात्र पंचमहाभूतांचा उपयोग होत असतो. त्यासाठी सगळे चराचर त्यांच्या पोषणासाठी कांहीं खात असतात. ज्यांनी उच्च अध्यात्मिक पातळी गाठली आहे असे सिद्ध त्या पंचमहाभूतांच्या पोषणासाठी कांहीं खात नाहीत कारण त्यांसाठी त्याची गरज उरत नाही. असें ज्ञानी केवळ प्राणायाम करून त्यांचे देह सांभाळत असतात. असे ऋषी केवळ हवा खाऊन रहात असतात असे समजले जाते.
त्यांना दुःख सुखाची बाधा होत नाही. कारण त्यांना त्या नसतात. ते कोणत्याही इच्छेच्या आहारी गेलेले नसतात. त्यांना पापक्षालनासाठी पुन्हा जन्म घ्याला लागत नाही. परंतु, ज्याना ते कळत नाही ते त्यांच्या इच्छांच्या पूर्ततेसाठी कर्मकांडात व त्याजोगे रजस अथवा तमस गुणात अडकलेले असतात.
मोक्ष मार्ग पर्व भाग अडतिसावा संपला.

## मोक्ष मार्ग पर्व

## भाग एकोणचाळिसावा

भिष्म पुढे सांगतात, ज्यांना अंतिम ज्ञानाची आस लागली आहे ते त्याशिवाय इतर कोणतीही गोष्ट मानत नाहीत. वेदाची शिकवणूक जाणणारा असा विरळा असतो. बाकीच्यांना ते पूर्णपणे समजलेले नसले तरी ते त्यांना समजले आहे असा समज करून रहात असतात. कर्माच्या फळांची अभिलाषा न बाळगता जे त्यात भाग घेतात त्यांनी ते कर्म केले नाही असेंच समजावयाचे असते. अभिलाषा हे त्यात गुतल्याचे लक्षण असते. आई तिच्या बाळाबरोबर खेळते तरी ती त्या खेळात तशी गुंतलेली नसते जसे ते बाळ त्या खेळात गुंतलेले असते, असे असते त्या ज्ञानी माणसाचे वागणे. अभिलाषा न ठेवता केवळ शरीराची गरज म्हणून अथवा त्या समाजाची गरज म्हणून जेव्हां कार्य केले जाते ते मोक्षाच्या मार्गात अडचण होत नाही. अभिलाषेमुळें मनुष्य त्याच्या कर्मफलात अडकत असतो व त्याच्या प्राप्तीने आनंद व न मिळाल्यामुळे दुःख तो अनुभवत असतो. मोक्षाची अभिलाषा धरणे हे सुद्धा दुःखाचे कारण असते म्हणून तपस्या करतांना त्या कर्माच्या फलाची सुद्धा अभिलाषा बाळगावयाची नसते. इच्छा न धरण्याची इच्छासुद्धा बाधक असते मोक्षसाधनेच्या मार्गात. म्हणून ज्ञानी ध्यान करतो त्याचे कारण तो त्याचा स्वभाव आहे अशी प्रवृत्ती असली पाहिजे. शरीराचे तीन गुण वासना, अज्ञान आणि चांगुलपणा त्याच्या आत्म्याला बाधत असतात. म्हणून शरीराच्या सगळ्या गरजांकडे त्रयस्थाच्या दृष्टीने तो पहातो त्याला मोक्षसाधना शक्य असते. परंतु, जो त्यांत गुंततो तो मोक्षसाधना करू शकत नाही. शरीराच्या पोषणासाठी जे तो खातो त्यात तो रमला तर त्याची साधना भ्रष्ट होते. खाणे आवश्यक असते म्हणून तो ते खात असतो, त्याबद्दल विशेष निवड तो करत नाही. शरीराच्या गरजेपुरते तो खाईल, कमी अथवा जास्त खाणार नाही, जे पचत नाही ते तो खाणार नाही, दुसर्याला खाण्याचा आग्रह करणार नाही. ह्यात गृहस्थ मात्र अपवाद आहे, तो त्याच्या अतिथीला खाण्याचा आग्रह करू शकतो. तो त्याचा अहंकार त्याच्या कोणत्याही कृतीमध्ये येऊ देणार नाही. अहंकाराचे कारण आहे तमोगुण. त्यातून सगळे दोष उत्पन्न होत असतात. समाधान, त्यातून सुख आणि आनंद मिळतो.

समजूतदारपणातून चांगुलपणा तयार होतो. वासनांतून क्रोध, गोंधळ, भिती, थकवा, घमेंड, निराशा, दुःख, बेचैनी, कुकर्म करण्याची तीव्र प्रेरणा असें तयार होतात विविध परिस्थितीनुसार. ते आत्म्याच्या उद्धारात अडथळा करतात. त्यामुळे दुष्प्रवृत्ती वाढत असते".

युधिष्ठीर विचारतो, "मोक्षाची अपेक्षा करणार्याने कोणते दोष टाळावयाचे असतात ते सांगा. कोणते दोष पुन्हा पुन्हा उत्पन्न होता व कां तसे होते ते सांगा".

भिष्म सांगतात, "सात्त्विक मनुष्य त्याचे सगळे दोष संयमाने व जागृकता बाळगून नष्ट करू शकतो. तीव्र प्रेरणेने तो ते साध्य करत असतो, त्याच्या नंतरच्या जन्मात तो मोक्ष प्राप्त करत असतो. वासनांच्या तीव्रतेने ज्या दोषांची उत्पत्ती होते ते त्या वासनांच्या नाशानेच संपवता येतात. त्या वासनांच्या नाशानेच तो मोक्षाकडे जाऊ शकतो. जेव्हां चांगुलपणा वासना (कोणत्याही उद्देश) विरहीत असतो तेव्हां तो जास्त उपयोगाचा असतो मोक्षसिद्धीसाठी. परंतु, त्याकरता वेदात दिलेल्या मंत्रांचा उपयोग करणे मोक्ष प्राप्तीसाठी घातक असते असे कांहीं ऋषी सांगतात. देवतांची मदत घेणे तितकेच घातक असते. जी साधना करावयाची ती स्वताच्या उर्जेने करावयाची असते. ऐहिक सुखासाठी ज्या देवता व मंत्र, यज्ञविधी वेदांत दिले आहेत ते मोक्षासाठी उपयोगाचे नसतात. अज्ञानाने जे तो करत असतो त्यात मोह दोष दडलेला असतो. त्यामुळे तो अधिक वासनांच्या गुंत्यात अडकत असतो. परंतु, जो त्यात अडकलेला नसतो, त्याचा मार्ग सोपा होतो.

## - शांती पर्व खंड पांचवा संपला -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळीराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, अॅप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,